


पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

अमृत ७५ महोत्सव
१९५०-२०२४

epaper.dainikhindusthan.com




■ वर्ष ७५ वे/अंक ३२७ वा ■ ■ अमरावती, मंगळवार, दिनांक १५ जुलै २०२५ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ www.dainikhindusthan.com marathe_vinod1@rediffmail.com ■ भारतीय सौर २५ आषाढ १९४७ ■ ■ पृष्ठे १२ ₹ ४.०० ■




## शिवसेना पक्ष, धनुष्यबाण कुणाचा?

### ३ महिन्यात निकाल : सुप्रिम कोर्टाचे संकेत, २० ऑगस्टला पुन्हा सुनावणी




नवी दिल्ली दि. १४ : राज्यात तीन वर्षांपूर्वी सत्ता बदल झाला. शिवसेना पक्ष तीन वर्षांपूर्वी फुटला. तेव्हापासून शिवसेना पक्ष कुणाचा? निवडणूक चिन्ह कोणाकडे राहणार? या बद्दलची कायदेशीर लढाई सुरु आहे. निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांच्याबाजूने निकाल दिला. आज अधिकृत शिवसेना पक्ष आणि निवडणूक चिन्ह धनुष्यबाण एकनाथ शिंदे यांच्याकडे आहे. या निर्णयाला उद्धव ठाकरे गटाने सुप्रीम कोर्टात आव्हान दिलं. उद्धव ठाकरे गटाकडून कपिल सिब्बल हा खटला लढवत आहेत. आज या संदर्भात सुप्रीम कोर्टात *(पान २ वर)*

### निवडणूक आयोगाला तो अधिकार नक्कीच नाही? : उद्धव ठाकरे

शिवसेना पक्षाचं नाव आणि चिन्हाचं प्रकरण सध्या सर्वोच्च न्यायालयात आहे, शिवसेनेत पडलेल्या फुटीनंतर पक्षाचं चिन्ह आणि नाव हे शिवसेना शिंदे गटाला देण्याचा निर्णय निवडणूक आयोगानं घेतला होता, त्याविरोधात शिवसेना ठाकरे गटानं सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. दरम्यान या प्रकरणावर आता ऑगस्टमध्ये सुनावणी होणार आहे. यावर आता शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे.

'ऑगस्टमध्ये निकाल देणार असतील तर नक्कीच एक समाधानकारक गोष्ट आहे. आणि आमची शेवटची एक आशा आता सर्वोच्च न्यायालयच आहे, *(उर्वरित पान २ वर)*

## विजयी मेळावा हा मराठीच्या मुद्यावर होता राजकारणाशी त्याचा संबंध नाही : राज ठाकरे



नाशिक दि. १४ : राज्यात महापालिका निवडणुकीसाठी ठाकरे बंधू एकत्र येणार अशी चर्चा सुरू असतानाच राज ठाकरे यांनी एक मोठं वक्तव्य केलं आहे. मुंबईतील मराठीचा विजयी मेळावा हा केवळ मराठीच्या मुद्द्यावर होता, विजयी मेळाव्याचा राजकारणाशी संबंध नाही असं राज ठाकरे म्हणाले. नोव्हेंबर-डिसेंबर दरम्यान युतीचं चित्र स्पष्ट होईल, त्यानंतर बघू असं राज ठाकरे म्हणाले. नाशिकमध्ये अनौपचारिक गप्पादरम्यान राज ठाकरे यांनी हे वक्तव्य केलं.

राज्यात महायुती सरकारने हिंदी सक्ती केल्यानंतर त्याच्या विरोधात दोन्ही ठाकरे बंधूंनी आवाज उठवला. त्यानंतर ही सक्ती मागे घेतली गेल्यानंतर दोन्ही ठाकरेंनी मुंबईत विजयी मेळावा घेतला. तब्बल २० वर्षांनी राज आणि उद्धव ठाकरे हे बंधू एकाच व्यासपीठावर आले. त्यामुळे आगामी पालिका निवडणुकीत हे दोन्ही बंधू एकत्र लढणार अशी चर्चा सुरू झाली.

आम्ही एकत्र आलो आहोत ते एकत्र राहण्यासाठीच असं वक्तव्य खुद्द उद्धव ठाकरे यांनी केलं. जे महाराष्ट्राच्या मनात आहे ते होईल असंही ते म्हणाले होते. त्यामुळे मनसे आणि ठाकरेंच्या शिवसेनेची युतीची चर्चा झाल्याचं बोललं जाऊ लागलं. दरम्यान, राज ठाकरे हे मात्र सावधगिरीने पावले टाकताना दिसले. आता त्यांचे ताजे वक्तव्य हे त्याला बळ देणारं असल्याची चर्चा आहे. *(उर्वरित पान २ वर)*

## सरन्यायाधीश गवई इस्पीतळात दाखल

नवी दिल्ली दि. १४ : न्यायमूर्ती भूषण गवई यांनी १४ मे २०२५ रोजी भारताचे ५२वे सरन्यायाधीश म्हणून पदाची शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत राष्ट्रपती भवनात झालेल्या सोहळ्यात त्यांनी या सर्वोच्च पदाची शपथ घेतली. ते सरन्यायाधीशपदी नियुक्त होणारे पहिले अनुसूचित जातीतील न्यायमूर्ती आहेत.



गवई यांचा कार्यकाळ तुलनात्मकदृष्ट्या अल्प असून, ते २३ नोव्हेंबर २०२५ रोजी निवृत्त होणार आहेत. परंतु या सहा महिन्यांच्या कार्यकाळातही त्यांच्याकडून न्यायालयीन प्रक्रियेत *(उर्वरित पान २ वर)*

## मोदी-शाहांची ताकद कमी होणार; राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी संघ मुख्यालयातून मोठे संकेत



नवी दिल्ली दि. १४ : गेल्या काही महिन्यांपासून भारतीय जनता पक्षांकडून नवीन राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडीच्या हालचाली सुरू आहेत. आतापर्यंच अध्यक्षपदासाठी अनेकांच्या नावे समोर आली आहेत. पण अद्याप कोणत्याही नावावर शिक्कामोर्तब झालेले नाही. त्यामुळे भाजप संघटनेत उत्सुकताही शिगेला पोहचली आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, भाजपचे विद्यमान अध्यक्ष जे.पी. नड्डा यांचा कार्यकाळ जून २०२४ मध्येच संपला आहे. पण त्यानंतरही त्यांना काही महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील पाच देशांच्या दौऱ्यावर अससल्यामुळे राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडीला विलंब होत असल्याची चर्चा होती. पण आता तेदेखील दौऱ्यावरून परत्यामुळए आता लवकरच नवीन भाजप अध्यक्षांना मान्यता मिळू शकते असे मानले जाते.

यानिमित्ताने, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या निवडीत किती सक्रिय असेल? संघाची विचारधारा आणि भाजप यांचा जुना संबंध आहे. त्यामुळे संघाचा अप्रत्यक्ष प्रभाव किंवा सल्ला हा अध्यक्षपदाच्या निवडीत महत्त्वाचा असतो. भाजपमध्ये गेल्या काही वर्षांत निर्णयप्रक्रिया ही पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीभूत झाली आहे. त्यामुळे अंतिम निर्णय मोदी-शहा जोडीचाच निर्णायक ठरत असतो, हे अनेक वेळा दिसून आलं आहे. या सगळ्यात नागपूरमधून महत्त्वाची अपडेट समोर आली आहे.

**नागपूरहून काय संदेश आला?**

एका मीडिया रिपोर्टनुसार, भाजपच्या पुढील अध्यक्षांच्या नावांच्या चर्चेदरम्यान, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) कडून नागपूरहून एक स्पष्ट संदेश आला आहे की भाजपचा पुढील अध्यक्ष केवळ रणनीतीकार नसावा, तर वैचारिकदृष्ट्या मजबूत आणि संघटनेशी खोलवर जोडलेला असावा. आरएसएसला भाजपचा पुढचा अध्यक्ष तरुण आणि तळागाळातील असावा असे वाटते. तो थेट शाखा, प्रचारक आणि बूथ लेव्हल *(उर्वरित पान २ वर)*

## शुभांशू शुक्लाच्या परतीचा प्रवास सुरू

### आज आयएसएसवरून २३ तासांच्या प्रवासानंतर पृथ्वीवर पोहोचणार



नवी दिल्ली दि. १४ : भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला यांचे मिशन 'ॲक्सिओम-४'यशस्वी झाले आहे. आता शुभांशू शुक्ला आपल्या पूर्ण टीमसह पृथ्वीवर परतण्यासाठी रवाना झाले आहे. आज १४ जुलै रोजी दुपारी ४.४५ वाजता आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरुन घरी परण्यासाठी त्यांनी उड्डाण केले. सुमारे २३ तांसाच्या प्रवासानंतर ते पृथ्वीवर १५ जुलै रोजी दुपारी ३ वाजता परततील. शुभांशू शुक्ला १४ जुलै रोजी दुपारी ४.४५ वाजता आयएसएसच्या हार्मनी मॉड्यूलमधून अंतराळयान अनडॉक करण्यात आले. १४ जुलै रोजी भारतीय वेळेनुसार दुपारी ३ वाजता कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्यावर हे अंतराळयान स्प्लॅशडाऊन होईल.

केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान, अंतराळ राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांनी याची महिती दिली. त्यांनी एक्सवरील पोस्टमध्ये, शुभांशू तुमचे स्वागत आहे असे म्हटले. तसेच त्यांनी सांगितले की. ॲक्सिओम ४ यशस्वीरित्या अनडॉक झाले आहे. सध्या या मिशनच्या टीमचा परतीचा प्रवास सुरु आहे. त्यांनी म्हटले की, संपूर्ण देश तुमच्या घरी येण्याची वाट पाहत आहे.

याच वेळी शुभांशू शुक्ला यांनी पृथ्वीवर परतण्यापूर्वी आपल्या देशवासियांना एक खास संदेश दिला आहे. त्यांनी म्हटले की, आता आपण लवकरच पृथ्वीवर भेटू. या मोहिमेत *(उर्वरित पान २ वर)*

## गोमांससंदर्भात लवकरच कायदा आणणार

मुंबई दि. १४ : लोणावळा ग्रामीण पोलिसांनी २५ मार्च रोजी दोन संशयित कंटेनर ताब्यात घेतले होते. त्या कंटेनरमध्ये जनावरांचे मांस आढळून आले होते. दोन्ही कंटेनरमधील मांसाचे नमुने हे तपासण्यासाठी पाठवण्यात आले होते. यानंतर त्या कंटेनरमध्ये असलेले मांस हे गोमांस असल्याचे स्पष्ट झाले होते. दोन्ही कंटेनरमध्ये मिळून तब्बल ५७ हजार किलो गोमांस जप्त करण्यात आले होते. यामुळे राज्यभरात खळबळ उडाली होती. आता या प्रकरणी विधान परिषदेत भाजप आमदार श्रीकांत भारतीय यांनी लक्षवेधी मांडली. तर गृह राज्यमंत्री पंकज भोयर *(उर्वरित पान २ वर)*

## आंब्याचा ट्रक उलटून ९ जणांचा जागीच मृत्यू

अन्नामय्या दि. १४ : आंब्याचा ट्रक उलटल्यामुळे भयंकर भीषण अपघात झालाय. या अपघातामध्ये ९ जणांचा जागीच मृत्यू झालाय. तर १२ जण जखमी झाले आहे. आंध्र प्रदेशमधील अन्नामय्या जिल्ह्यात रविवारी रात्री उशिरा हा अपघात झाला. अपघातानंतर महामार्गावर वाहतूक कोंडी झाली. दुर्घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी धाव घेत तात्काळ मदतकार्य सुरू केले. जखमींना जवळच्या रूग्णालयात दाखळ करण्यात आले, तर ९ *(उर्वरित पान २ वर)*

## महिला कर्मचाऱ्याकडे शरीरसुखाची मागणी करणारा अधिकारी निलंबित

अकोला दि. १४ : बाळापूरचे ठाकरे गटाचे आमदार नितीन देशमुख यांचं ठिय्या आंदोलन अखेर सात तासांनंतर मागे घेण्यात आलं. देशमुख यांच्या आंदोलनानंतर अखेर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून शाखा अभियंता राजेंद्र इंगळे यांच्या निलंबनाचे आदेश काढण्यात आले. तर उपविभागीय अधिकारी डी. बी कपिले यांच्या निलंबनाचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे मुख्य अभियंता एस.एस. गव्हाणकर यांनी हे आदेश दिलेत.

अकोला येथील नेहरू पार्क चौकातल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या विभागीय कार्यालयात आमदार नितीन देशमुखांची ठिय्या आंदोलन सुरू केलं होतं. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मूर्तीजापूर कार्यालयातील उपविभागीय अधिकारी डी. बी. कपिले आणि शाखा अभियंता राजेंद्र इंगळे यांनी एका महिला कर्मचाऱ्याला शरीरसुखाची मागणी केल्याचा आरोप करण्यात त्यांनी केला.

यासंदर्भात मूर्तिजापूर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतरही दोन्ही आरोपींवर कारवाई करण्यास प्रशासनानं टाळाटाळ केली होती. त्यामुळे देशमुखांनी *(पान २ वर)*

## महागाईनं गाठला गेल्या ६ वर्षातला नीचांकी स्तर

नवी दिल्ली दि. १४ : महागाईनं मागील ६ वर्षातला नीचांकी स्तर गाठला आहे. अन्नधान्याच्या किंमतीतील वाढ मंदावल्याने महागाई नरमली आहे. जून महिन्यात किरकोळ महागाई दर २.१० टक्क्यांवर पोहोचला आहे. सलग पाचव्या महिन्यात महागाई दर रिझर्व्ह बँकेच्या ४ टक्क्यांच्या उद्दिष्टापेक्षा खाली राहिला आहे. मे महिन्यात किरकोळ महागाई दर २.८२ टक्के राहिला होता.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने (एनएसओ) एका निवेदनात म्हटले आहे की जून २०२४ च्या तुलनेत जून २०२५ साठी सीपीआयवर आधारित वार्षिक चलनवाढीचा दर २.१ टक्के आहे. जून २०२५ साठी मुख्य चलनवाढ मे २०२५ च्या तुलनेत *(उर्वरित पान २ वर)*

## संसदेच्या इतिहासात डिजिटल क्रांती

### संसदेत खासदारांची उपस्थिती आता ऑनलाइन

नवी दिल्ली दि. १४ : आता खासदारांना संसदेत उपस्थिती नोंदवण्यासाठी सायन किंवा रजिस्टरमध्ये स्वाक्षरी करावी लागणार नाही. नव्या संसद भवनात यापुढे खासदार आपापल्या आसनावरूनच एमएमडी (मल्टी मीडिया डिव्हाइस) च्या माध्यमातून आपली उपस्थिती नोंदवू शकतील. लोकसभेच्या चालू अधिवेशनापासूनच ही व्यवस्था अमलात येत आहे.

नव्या प्रणालीनुसार, खासदारांना लोकसभा किंवा राज्यसभेत प्रवेश करण्यापूर्वी फक्त थंब इम्प्रेशन, पिन नंबर किंवा मल्टी मीडिया डिव्हाइस कार्ड वापरून उपस्थिती नोंदवता येईल. यासाठी त्यांच्या आसनावर डिजिटल टॅबलेट स्वरूपातील डिव्हाइस बसवण्यात आले आहे. *(पान २ वर)*

## बडनेरात महिलेची हत्या दोन गंभीर जखमी

अमरावती दि. १४ : शहरात हत्येचे सत्र सुरुच असून आज सोमवारी (ता.१४) रात्री ९ वाजताच्या सुमारास महिलेची हत्या झाल्याची घटना उघडकिस आली आहे. हत्येची ही घटना बडनेरा येथील जुनी वस्ती मध्ये घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार बडनेरा पोलीस स्टेशन हद्दीतील जुनी वस्ती बडनेरा परिसरात इंदिरा नगर येथे शेजारी राहणाऱ्या दोन कुटूंबियांचा वाद झाला. वादाचे पर्यावसन मारहाणीत झाले. दोन्ही कुटूंबांनी एकमेकांना बेदम मारहाण केली. दोन्ही कुटूंबातील सदस्य मारहाणीत जखमी झाले. परंतु एका कुटूंबातील महिला गंभीर जखमी झाली. याशिवाय मारहाणीच्या या घटनेत १६ वर्षीय युवती सुद्धा जखमी झाली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलीसांनी जख्मींना तातडीने रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान गंभीर जखमी झालेल्या महिलेचा मृत्यू झाला. वृत्त लिहोस्तव मृतक व जखमींनी नावे पुढे आलेली नव्हती. दरम्यान या घटनेमुळे बडनेरा जुनी वस्ती परिसरात चांगलीच खळबळ उडाली आहे. घटनास्थळी पोलीसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच बडनेरा पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलीस अधिकारी सुद्धा दाखल झाले आहे.





















### (पान १ वरुन) संसदेच्या इतिहासात...

यामुळे खासदाराचा उभं राहून स्वाक्षरी करावी लागणार नाही, रांगा लावाव्या लागणार नाहीत, आणि वेळेचीही मोठी बचत होणार आहे.

पूर्वीच्या चचक वर्शीळलश पद्धतीत एक खासदार दररोज दोन ते तीन मिनिटं उपस्थितीसाठी खर्च करत असे. संपूर्ण अधिवेशनाच्या हिशोबाने पाहता, एका खासदाराचा तब्बल साडेतीन तास वाचणार आहे. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या पुढाकाराने ही प्रणाली अमलात आली असून, सुरुवातीला ती लोकसभेत लागू केली जात आहे. राज्यसभेत मात्र सध्या पारंपरिक पद्धतीनेच उपस्थिती घेतली जाणार आहे. संसदेच्या कारभारात पारदर्शकता, अचूकता आणि वेळेची बचत साधणारी ही प्रणाली भविष्यात इतरही अनेक सुविधा डिजिटल पद्धतीने आणण्याच्या दिशेने एक महत्त्वाचं पाऊल मानलं जात आहे.

### (पान १ वरुन) निवडणूक आयोगाला तो अधिकार...

जिथे या चोरीच्या प्रकरणाचा न्याय निवाडा होईल. कारण आज आमचे जे चिन्ह चोरलं गेलं आहे. मी नेहमी सांगतो, निवडणूक आयोगाला चिन्ह देण्याचा अधिकार आहे, परंतु पक्षाचं नाव बदलण्याचा अधिकार नाही. कोणाचं नाव उचलून दुसऱ्याला द्यायचं हा अधिकार निवडणूक आयोगाला नक्कीच नाही. त्यांना तो अधिकार असूच शकत नाही, आणि आम्ही तो मान्यही करत नाही. निवडणूक चिन्हाबाबत म्हणाल तर ठीक आहे, आणि त्याबाबत देखील प्रकरण कोर्टात आहे,' असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

दरम्यान यावेळी बोलताना इंडिया आघाडीची बैठक झाली पाहिजे असं देखील त्यांनी म्हटलं आहे. लोकसभा निवडणुकीनंतर इंडिया आघाडीची बैठक झालेली नाही, मला वाटतं लवकरात लवकर बैठक झाली पाहिजे. बिहारमध्ये निवडणूक आहे, इतरही राज्यात निवडणूक आहेत, महाराष्ट्रात देखील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत, त्यामुळे बैठक तर झालीच पाहिजे असं उद्धव ठाकरे यांनी यावेळी म्हटलं आहे.

**न्यायालयात नेमकं काय घडलं?**

न्यायालयात ज्येष्ठ विधितज्ज्ञ कपिल सिब्बल यांनी शिवसेना ठाकरे गटाची बाजू मांडली. यावेळी बोलताना कपिल सिब्बल यांनी या प्रकरणाच्या सुनावणी घेण्याची मागणी केली. त्यावर ऑगस्ट महिन्यात तुम्हाला तारीख देतो असं न्यायालयानं सिब्बल यांना सांगितलं. आम्हाला ही आता याचा सोक्ष मोक्ष लावायचा आहे, असंही न्यायालयानं यावेळी म्हटलं आहे.

### (पान १२ वरुन) ड्रायव्हींग स्कूलचे...

असेही त्यांनी नमूद केले. कार्यशाळेत ड्रायव्हिंग स्कूल संचालकांच्या अडचणींवर चर्चा होऊन त्यांचे निराकरण करण्यात आले. हा उपक्रम प्रथमच राबविल्याबद्दल सर्व संचालकांनी प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन जनसंपर्क अधिकारी अनिल मानकर यांनी केले.

### (पान १२ वरुन) जिल्हा परमिट रुम....

नमूद करण्यात आले आहे. यापुढेही शासनाने निर्णय मागे घेतला नाही, तर राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे.

मोर्चात अमरावती जिल्हा परमिट रूमचे सचिव आशिष देशमुख, सूर्यकांत जयस्वाल, अमरावती जिल्हा देशी विदेशी संघटनेचे अध्यक्ष अंगद देशमुख, विजय जयस्वाल, अमरावती शहर परमिट रूमचे अध्यक्ष गजानन राजगुरे, लकी नंदा, सुरेश चांदवानी, मदन जयस्वाल ,संजय मानकर, अनिल तरडेजा, जयंत वाकोडे, आशिष देशमुख, मदन जयस्वाल, संजय, विनोद रहाटे, दिगंबर गुल्हाने, सतपाल सिंग अरोरा, विनोद भगत, राजू मुळे, आकाश शिरभाते, आशिष भटारिया, रोहित खुराना, प्रशिक पटोरकर , ज्ञानेश्वर ठाकरे यांच्यासह अमरावती डिस्ट्रिक्ट परमिट रूम असोसिएशन चे पदाधिकारी सदस्य व व्यवसायावर आधारित असणारे कर्मचारी बहुसंख्येने सहभागी झाले होते.

### (पान १२ वरुन) अकोली व साईनगर...

गुणवत्ता तपासणी (ऑडिट) करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. तसेच भातकुली अंडरपास संदर्भात स्पॉटवरूनच उपस्थित अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधत तांत्रिक व प्रशासकीय पातळीवर निर्णय घेण्यासाठी तातडीने विशेष बैठक घेण्याच्या सूचनाही दिल्या.इन्फ्राआयटी मनपा शहर अभियंता श्री. पवार, उपअभियंता श्री. तायडे, जेडीपीपी, कार्यकारी अभियंता एम.जी.पी., महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे अधिकारी तसेच युवा स्वाभिमान पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.इपदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये प्रमुख उपस्थित - सुनील राणा, , सचिन भेंडे, उमेश ढोणे,शैलेंद्र कस्तुरे, श्याम कथे, प्रशांत कावरे, राजूभाऊ तेलखडे, नरेश अतकरे, योगेंद्र खोजरे, गणेश गतफने, प्रदीप गडेकर, देवचंद शेंडे, दिनेश ठाकरे, भारत येवले, संजय सोहनी, राजेश मिश्रा, गजानन बोंडे, अजय जयस्वाल, गजेंद्र बोंडे, सतीश मिश्रा, कमलकिशोर मलानी, आशिष कावरे, बंडू डकरे, देवानंद राठोड, अशोक पांडे, गणेशदास गायकवाड, पराग चीमोटे, भूषण पाटणे, अविनाश काळे,शुभम उंबरकर,पद्याकर गुल्हाने आदींचा समावेश होता.

### (पान १२ वरुन) मराठी भाषा विद्यापीठाला....

याकरिता शासनाकडून दिनांक ११.०९.२०२४ रोजी रुपये ४.२५ कोटी तात्पुरत्या स्वरूपात प्रशासकीय इमारत, सभागृह, वर्गखोल्या व वसतीगृह तयार करण्याकरिता प्राप्त झालेले.

त्यानुसार मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर येथे गबीन इमारतीमध्ये दिनांक ०२.०७.२०२५ रोजी कामकाज सुरू झालेले आहे. तसेच विद्यापीठाच्या दैनंदिन खर्चाकरिता रुपये ३.२४ कोटी मंजूर झालेले आहेत. तसेच सहसंचालक, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, अमरावती यांच्यामार्फत वेळोवेळी होणारा किरकोळ खर्च भागविण्यात येत आहे. अशी माहिती विशेष कार्य अधिकारी. मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूर, अमरावती कडून देण्यात आली आहे.

### (पान १२ वरुन) नवोदय विद्यालयाच्या...

समस्या उद्भवते, जी मुलींच्या जीवाशी खेळणारी समस्या आहे, विद्यार्थ्यांची तब्येत खराब असतांना विद्यालयाच्या संबंधित विभागाकडून सहानुभूतीपूर्वक वागणूक मिळत नाही. मुलींच्या मासिक पाळी संबंधित पॅड विल्हेवाटच्या समस्या अजूनही प्रलंबित आहेत. त्यामुळे आजची सभा ही सभा न राहता पालकांसाठी समस्या बनली. ह्या समस्या लवकरात लवकर निकालात आणाव्या अशी पालकांची अपेक्षा आहे.

### (पान १२ वरुन) राजापेठ प्रभागातील...

हेमलता माहुलकर, दिनेश सेठिया, किशोर गोयनका, विनोद येवतीकर, किशोर पिवाल, अनुप अग्रवाल, प्रविण सावले, संदीप गुल्हाने, प्रकाश कठाने, ललित समदुरकर, अविनाश तापडिया, श्री.टवक्रर, स्वप्निल चाफले, अंकुश गोयनका, कवंर नगरचा राजाचे अध्यक्ष राहुल बजाज, निरज सचदेव, राहुल चावला, वेद सेठीया, राजु अग्रुलवार, नाना राऊत, सागर तिवारी, संजय माहुलकर, महेंद्र तुंडलायत, अविनाश मालविय, हरिश नाळे, मनोज अग्रवाल, सुरेश पडोळे, सुरेश चांदवानी, राजाभाऊ बागडे, निलेश मसतकर, कमलेश कारिया, पंकज बोबडे, प्रमोद ठाकर, प्रतिक आडतिया, प्रज्योत जैन, नितीन लोहिया, मुन्ना राठोड, अजय मांडविया, राजेश सनके, भुषण वाजपे, रितेश पांडे, समाधान वानखडे, छोटु आकोटकर, धिरज भेरडे, संतोष घुंडियाल, विनोद शादी, जितेंद्र वरु, माहुरे काका, श्याम चोपडे, मिलींद वैष्णव, अजय भोंगाडे, प्रताप अनासाने, प्रमोद सांभारे, राजु हिरुळकर, सतिश कराळे, शिव मालानी, बाजीराव मालवनकर, राजु शेरेकर, अनिल बैतुले, ऍ?ड. शिरिश जाखड, रवि हरनकर, संतोष पवार, अमोल येवतीकर, प्रविण अनासाने, नवले साहेब, पांडुरंग धामनकर, हरिभाऊ नाईक, गणेश खांडेकर, रोशनी येवतीकर, सिमा येवतीकर, रक्षा सांभारे, अर्चना हरमकर, जया वैष्णव, स्नेहा पवार, रेखा वाघमारे, मिनाक्षी अनासाने, प्रिती कराळे, सुनिता मालानी, वैशाली नाईक, अर्चना खांडेकर, किरण खांडेकर लोंडे काकु, मंदाताई इंगळे, ज्योत्सना हिरुळकर, प्राजक्ता बानुबाकोडे, पद्मा चेडे, उषा कछवे, व असंख्य नागरिक उपस्थित होते.

### (पान १ वरुन) आंब्याचा ट्रक....

मृतदेह पोस्टमार्टमसाठी पाठवले आहेत. मुख्यमंत्र्यांकडून या दुर्घटनेबाबत दुःख व्यक्त करण्यात आलेय.

आंध्र प्रदेशातील अन्नमय्या जिल्ह्यातील रेड्डीचेरुवुजवळ रविवारी रात्री आंब्याने भरलेला एक ट्रक उलटल्याने भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत ९ जणांचा मृत्यू झाला. तर १२ जण जखमी झाले आहेत. ट्रक राजमपेट मंडलातील थल्लापका गावाहून कोडूरला जात होता. ट्रकवर आंब्याच्या पेट्यांवर मजूर बसले होते. रेड्डीपल्ली तलावाच्या बांधावर चढताना ट्रकचा मागचा चाक रेतीत अडकल्याने ट्रक पिकवरवर उलटला अन् अपघात झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली. दरम्यान, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्रबाबू नायडू यांनी या दुर्घटनेवर शोक व्यक्त केला आहे. त्यांनी अधिकाऱ्यांकडून अपघाताच्या कारणांची माहिती घेतली असून, जखमींना योग्य उपचार मिळावेत यासाठी सूचना दिल्या आहेत.

**पोलिसांची माहिती आणि तपास**

अन्नामय्या जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक व्ही. विद्यासागर नायडू यांनी सांगितले, ट्रक डाव्या बाजूला उलटल्याने. आतमध्ये आंब्याच्या पेटीवर बसलेले मजूर खाली पडले. त्यामध्ये ९ जणांचा मृत्यू झाला, तर १२ जखमी आहेत. अपघातामधील जखमींपैकी ४ जणांची प्रकृती गंभीर आहे. त्यांना कडप्पा येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. इतर जखमींवर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पुल्लमपेट पोलीस ठाण्यात बीएनएस आणि मोटर वाहन कायद्याच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**चालकावर गंभीर आरोप**

या अपघातात मृत्यू झालेल्यांच्या नातेवाईकांनी चालकावर निष्काळजीचा आरोप केला आहे. तक्रारदार एन. शिव कुमार यांनी पोलिसांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे, चालकाने वेगाने वाहन चालवल्याने त्याचा ताबा सुटला. यामुळे माझी पत्नी आणि इतर लोक वाहनाखाली अडकले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. बचेलेल्यांनीही चालकाच्या बेजबाबदार वर्तनामुळे हा अपघात घडल्याचा दावा केला आहे.

### (पान १ वरुन) गोमांस संदर्भात...

यांनी या प्रकरणाच्या चौकशीसाठी एसआयटी स्थापन करण्याची घोषणा केली. तसेच यानंतर असा प्रकार समोर आल्यास मोक्काअंतर्गत कारवाई करण्याचा इशारा देखील त्यांनी दिला आहे. तर गोमांससंदर्भात लवकर कायदा आणण्यात येईल, अशी माहिति देखील त्यांनी दिली आहे.

विधान परिषदेत श्रीकांत भारतीय म्हणाले की, ५७ हजार किलो गोमांस लोणवळा येथे पकडण्यात आले आहे. हे गोमांस दुबईला पाठवण्यात येत होते. बेकायदेशीर गोमांस विक्री करण्याचे काम अशा प्रकारे सुरू आहे. यावर एसआयटी स्थापन करून चौकशी करणार आहात का? अशा बाबी करणाऱ्या लोकांवर मोक्काअंतर्गत कारवाई करणार आहात का? असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला.

...तर मोक्काअंतर्गत कारवाई करणार : पंकज भोयर

यावर राज्यमंत्री पंकज भोयर म्हणाले की, ५७ हजार किलो मांस सिंहगड कॉलेज समोर पकडण्यात आले, हे गंभीर आहे. या प्रकरणातील दोन आरोपी अटकेत आहेत. आपण या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एसआयटी स्थापन करुया आणि या प्रकरणाच्या मुळापर्यंत जाऊया. यानंतर असा प्रकार समोर आला तर मोक्काअंतर्गत कारवाई करू आणि लवकरच आम्ही याबाबत कायदा आणणार आहोत, असे त्यांनी म्हटले. तर अनिल परब यांनी ५७ हजार किलो मांस पकडले जात असेल तर तस्करी मोठ्या प्रमाणात होत आहे. म्हणजेच पोलिस खात्याचे हे पूर्णपणे अपयश असल्याचा आरोप केला.

नेमकं प्रकरण काय?

२५ मार्च रोजी लोणावळा ग्रामीण पोलिसांनी दोन कंटेनर (एमएच ४६ बीएम ९१८०) आणि (एमएच ४६ सीयू ९९६६) तसेच त्यांच्या चालकांना ताब्यात घेतले. चालकांची नावे नदीम कलीम अहमद आणि नसीर मोहंमद अहमद (दोघेही रा. न्हावाशेवा, नवी मुंबई) अशी आहेत. हे दोन्ही एअर कंडिशनर कंटेनर मे. एशियन फूड्स मीन अँग्रो, न्यू भोईबुडा, सिकंदराबाद (हैदराबाद) येथून मांस भरून न्हावाशेवा पोर्ट, मुंबई येथे ट्रान्स्पोर्टसाठी रवाना झाले होते. पुण्यातील एका गोरक्षकाने याबाबत माहिती लोणावळा ग्रामीण पोलिसांना दिल्यानंतर, ग्रामीण पोलिसांसह लोणावळा शहरातील गोरक्षक व विविध संघटनांच्या कार्यकर्त्यांनी हे कंटेनर अडवले.

सुरुवातीला चालकांनी कागदपत्रे दाखवत सदर मांस गोमांस नसून म्हशीचे मांस असल्याचे सांगितले. संबंधित कागदपत्रेही पोलिसांना सादर करण्यात आली. मात्र, गोरक्षक संघटनांनी ही कागदपत्रे संशयास्पद असल्याचे सांगून, मांसाची तपासणी झाल्याशिवाय कंटेनर सोडू नये, अशी मागणी केली. त्याअनुषंगाने लोणावळा ग्रामीण पोलिसांनी मांसाचे नमुने घेऊन तपासणीसाठी पाठवले आणि तपासणी अहवाल येईपर्यंत कंटेनर ताब्यात ठेवण्यात येतील, असे आश्वासन दिले होते. २९ मार्च रोजी प्राप्त झालेल्या तपासणी अहवालात, सदर कंटेनरमध्ये असलेले मांस गोवंशीय असल्याचे निष्पन्न झाले होते.

### (पान १ वरुन) शिवसेना पक्ष...

सुनावणी पार पडली. पण तारीख पे तारीखचा सिलसिला सुरु राहिला. आजची सुनावणी ऐकण्यास सुप्रीम कोर्टाने नकार दिला. पुढची तारीख देतो, असं सुप्रीम कोर्टाने म्हटलं. आम्ही ऑगस्टमधील तारीख देतो असं सुप्रीम कोर्टाने सांगितलं.

उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडून आजच सुनावणी घ्या अशी मागणी कोर्टात करण्यात आली होती. मात्र सुप्रीम कोर्टाने ऑगस्ट महिन्यातील तारीख देऊ असं म्हटलेलं आहे. तब्बल दीड वर्षानंतर सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणावर सुनावणी होत होती. स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूका येत आहेत. ऑगस्टमधील तारीख देण्याचा प्रयत्न करुन असं सुप्रीम कोर्टाने सांगितलं. ऑक्टोंबर महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होऊ शकतात. ऑगस्टमध्ये तारीख मिळून सुनावणी पूर्ण झाल्यास शिवसेना पक्ष आणि चिन्ह कोणाचं? याचा निर्णय होऊ शकतो

**'आज खूप मोठं विधान'**

शिवसेना पक्ष आणि निवडणूक चिन्हाच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाने आज खूप मोठं विधान केलेलं आहे. आता अर्ज दाखल करणं बंद करा. दोन वर्षापासून हे प्रकरण जे प्रलंबित आहे, त्याचा निकाल त्याची मुख्य सुनावणी आपण ऑगस्टमध्ये घेऊ. कपिल सिब्बल म्हणाले की, तुम्ही ऑगस्टची एक तारखी द्या. जस्टिस सूर्यकांत म्हणाले की, मी माझं रोस्टर बघतो. ऑगस्टच्या सुनावणीची तारीख एक ते दोन दिवसात कळवतो. ऑगस्टमध्ये सुनावणी होईल. निर्णय राखून ठेवला जाईल. ऑगस्टमध्ये सुनावणी झाली, तर शिवसेना पक्ष आणि चिन्हाचा निकाल सप्टेंबर, ऑक्टोंबर, नोव्हेंबरमध्ये लागू शकतो असं वकीलाने सुनावणीनंतर सांगितलं.

**असिम सरोदे सुनावणीनंतर काय म्हणाले?**

ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात सुनावणी होईल. हस्तक्षेप याचिकेचा उद्देश सफल झालेला आहे. लवकरात लवकर सुनावणी घेतली गेली पाहिजे यासाठी हस्तक्षेप याचिका असते. त्याची कारण दिलेली असतात. त्याचा उपयोग प्रभावीपणे झालेला आहे. त्यामुळे ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात सुनावणी होईल असं वकिल असिम सरोदे म्हणाले.

राहुल नार्वेकर यांनी दिलेला आमदार अपात्रतेचा निर्णय आणि चिन्ह या संदर्भातील दोन सुनावण्या ऐकून घेवून सुप्रीम कोर्ट निर्णय देईल. या दोन्ही याचिकांवर आम्ही सुनावणी घेवू अस कोर्टाने सांगितलं आहे. कोर्टाचा हा निर्णय चांगला आहे की ऑगस्ट महिन्यात काही चांगला निर्णय अपेक्षित आहे. ऑगस्ट महिन्यातील तारीख आम्ही देवू अस कोर्टाने सांगितलं आहे असं असीम सरोदे म्हणाले.

पाहिल्या आठवड्यात यावर सुनावणी होईल. आम्ही सुप्रीम कोर्टात हे अपील केलं आहे म्हणजे सुनावणी लवकर घ्यावी म्हणून. लर्नड वकील पण अशी रस्त्यावर उभ राहून केल्यासारखी वक्तव्य करत असतील तर काय. पण आजचा निर्णय चांगला आहे. दोन वर्ष सुनावणी होत नव्हती ती आता प्राथमिक सुनावणी होवून ऑगस्ट महिन्यात करू अस कोर्टाने सांगितलं आहे असं असीम सरोदे म्हणाले.

# तथागत बुद्धांचा विशुद्धी मार्ग म्हणजेच पंचशील होय : नयन मोंढे



अमरावती दि.१४: माणसाने माणसाशी माणसासारखे वागाव हाच धम्माचा केंद्रबिंदू आहे. जगामध्ये दुःख असून दुःखमुक्ती करणे धम्माचा उद्देश आहे. बुद्धांनी आपल्या पहिल्याच प्रवचनात दुःखमुक्ती करिता विशुद्धी मार्ग सांगितला आहे. तथागत बुद्धांनी सांगितलेला विशुद्धी मार्ग म्हणजेच पंचशील होय,ते बौद्ध उपासक उपासीकांनी आचरणात आणावे असे प्रतिपादन भारतीय बौद्ध महासभेचे पर्यटन सचिव नयन मोंढे यांनी भगवान बुद्धाचे पहिले प्रवचन विशुद्धी मार्ग या विषयावर प्रवचन देताना सांगितले. वर्षावास प्रवचन मालिका२०२५ चे दुसरे पुष्प नयन मोंढे यांनी गुंफले.

भारतीय बौद्ध महासभा बडनेरा अमरावती व नांदगाव खंडेश्वर तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील मोरगाव करुणा बुद्ध विहार येथे रविवारची ३४४ वी बुद्ध वंदना मोठ्या उत्साहात पार पडली. यावेळी मार्गदर्शक म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा पर्यटन सचिव नयन मोंढे, समता सैनिक दलाचे प्रमुख सुरेश दहाटे, नांदगाव खंडेश्वर तालुकाध्यक्ष मदन खंडारे, बडनेरा शहराध्यक्ष शांताराम गेडाम, संघटक आर के भटकर, कार्यालयीन सचिव राहुल शेंडे, महिला आघाडी कोषाध्यक्ष मालती मेश्राम, विलास नागदिवे उपस्थित होते. नयन मोंढे आपल्या धम्म प्रवचन पुढे म्हणाले की,तथागत बुद्ध विशुद्धी मार्ग समजावून सांगतात की, ज्याला चांगला मनुष्य होण्याची इच्छा आहे त्याने जीवनाची तत्वे म्हणून काही तत्वे पाळली पाहिजेत. विशुद्धीच्या मार्गानुसार चांगल्या जीवनाची पाच तत्त्वे आहेत त्यामध्ये कोणत्याही प्राण्याची हिंसा न करणे व त्याला इजा न करणे, चोरी न करणे अर्थात दुसऱ्यांच्या मालकीची वस्तू न बळकावणे, व्यभिचार न करणे, असत्य न बोलणे आणि मादक पेय ग्रहण न करणे. तथागतांच्या शिकवणुकीप्रमाणे या पाच शिलाचे पालन करावे असे आवाहन मोंढे यांनी केले. वर्षावास प्रवचन मालिकेच्या पार्श्वभूमीवर अरुण शेंडे यांनी वर्षावास हे गीत सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले.

संचालन मदन खंडारे तर आभार विलास नागदिवे यांनी मानले. यावेळी धर्मपाल डोंगरे, अरुण शेंडे, खुशाल सांबारे, सतीश गोपनारायण, अरुण मेश्राम, मुकुंद मेश्राम, प्रकाश भोवते, साहेबराव मोहोड, विजय बागडे, लक्ष्मण वरघट, अरुण लोणारे, किसन मोहोड, शामराव बंडकर, भीमराव सुपनेर,हरणदास शहारे, देवानंद बडगे, गोवर्धन रामटेके, अशोक बनसोड, रवींद्र मोहोड, कविता मोडघरे, माया बोरकर, संमेक बंडकार, अर्णव जवंजाळ, आर्यन राऊत यांच्यासह मोरगाव येथील बौद्ध उपासक उपासिका बहुसंख्येने उपस्थित होत्या.

**महापुरुषांनी सांगितलेल्या मार्गावर चालावे:सुरेश दहाटे**

भारतीय बौद्ध महासभा प्रवचन मालिकेच्या माध्यमातून तथागत बुद्धाच्या धम्माचे तत्त्वज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे अविरत कार्य करीत आहे. महापुरुषांचे जीवन चरित्र सांगुण त्यांनी सांगितलेल्या मार्गावर मानवाने चालावे असे प्रतिपादन समता सैनिक दलाचे प्रमुख सुरेश दहाटे यांनी आपल्या समारोपिय भाषणातून केले.

### (पान १ वरुन) शुभांशु शुक्लाच्या...

नासाचे अंतराळवीर आणि अक्सिओम मिशनचे कमांडर पेही व्हिटसन, भारताचे अंतराळवीर शुभांशू शुक्ला, मिशन तज्ज्ञ पोलंडचे स्लावोज उजनांस्की-विस्निव्स्की आणि हंगेरीचे टिबोर कापू यांचा समावेश आहे. या चारही अंतराळवारींचा पारंपारिक निरोप समारंभात सन्मान करण्यात आला आहे.

### (पान १ वरुन) मोदी शाहांची ताकद....

कार्यकर्त्यांशी जोडलेला असावा. त्याच्याकडे वैचारिक स्पष्टता असावी. समान नागरी संहिता (यूसीसी), लोकसंख्या नियंत्रण, शिक्षण आणि सांस्कृतिक राष्ट्रवाद यासारख्या मुद्द्यांवर त्याचे स्पष्ट विचार असले पाहिजेत.

**आरएसएसला खटकतात भाजपच्या या गोष्टी**

याशिवाय आरएसएसने काही गोष्टींची चिंताही व्यक्त केली आहे. जिंकण्याच्या इच्छेपोटी, भाजप अशा अनेक लोकांना पक्षात घेत आहे, ज्यांना सातत्याने विरोध होत आहे. तसेच इतरबाहेरील पक्षातून आलेले नेते आणि तंत्रज्ञांचा वाढता प्रभावही आरएसएसला आवडत नसल्याचे बोलले जात आहे. पक्षाच्या मूळ विचारसरणीला वैचारिकदृष्ट्या बळकटी देईल, असा व्यक्ती पक्षाचा नवा अध्यक्ष असावा, अशी आरएसएसची इच्छा आहे.

### (पान १ वरुन) महागाईनं गाठला...

७२ बेसिस पॉइंट्सने कमी झाली आहे. जानेवारी २०१९ नंतरचा हा सर्वात कमी वार्षिक चलनवाढीचा दर असल्याची माहिती सागंण्यात आली आहे. यापूर्वी, जानेवारी २०१९ मध्ये १.९७ टक्के हा सर्वात कमी दर नोंदवण्यात आला होता. जून २०२५ मध्ये मुख्य चलनवाढ आणि अन्न महागाईमध्ये लक्षणीय घट प्रामुख्याने भाज्या, डाळी आणि उत्पादने, मांस आणि मासे, धान्य आणि इतर उत्पादने, साखर आणि मिठाई, दूध आणि उत्पादने आणि मसाल्यांच्या किमतींमध्ये अनुकूल आधार परिणाम आणि नियंत्रणामुळे झाली आहे, असे एनएसओने म्हटले आहे.

जानेवारी २०१९ नंतरचा हा सर्वात कमी चलनवाढीचा दर आहे. जून हा सलग दुसरा महिना होता जेव्हा महागाई ३ टक्क्यांपेक्षा कमी राहिली. किरकोळ महागाई मे महिन्यात २.८२ टक्क्यांपेक्षा आणि जून २०२४ मध्ये ५.०८ टक्क्यांपेक्षा कमी होती. रॉयटर्सने ५० अर्थतज्ज्ञांच्या सर्वेक्षणात जूनमध्ये किरकोळ महागाई २.५० टक्क्यांपर्यंत कमी होण्याचा अंदाज वर्तवला होता. जर आपण अन्न महागाईबद्दल बोललो तर ती मे महिन्यात ०.९९ टक्क्यांवरून जूनमध्ये -१.०६ टक्क्यांपर्यंत खाली आली. ही घट प्रामुख्याने अनुकूल बेस इफेक्ट आणि भाज्या, डाळी, मांस आणि मासे, धान्य, साखर, दूध आणि मसाले यासारख्या प्रमुख श्रेणींमध्ये कमी किमतींमुळे झाली. ग्रामीण आणि शहरी भागांसाठी महागाई दर अनुक्रमे -०.९२ टक्के आणि -१.२२ टक्के आहेत. अहवालानुसार, जून २०२५ मधील अन्न महागाई जानेवारी २०१९ नंतरची सर्वात कमी आहे.

एमपीसीनुसार, २०२४ च्या अखेरीस सहिष्णुता पट्टा ओलांडल्यानंतर महागाईत लक्षणीय घट झाली आहे. परंतू, जागतिक अनिश्चितता आणि पुरवठा-बाजूच्या जोखमींवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. तरीही, आरबीआयने म्हटले होते की महागाईचा अंदाज समान संतुलित आहे आणि येत्या काही महिन्यांत किमतीवरील दबाव आणखी कमी होण्याची अपेक्षा आहे. आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी त्यांच्या रेपो दर घोषणेनंतर म्हटले होते की गेल्या सहा महिन्यांत महागाईत लक्षणीय घट झाली आहे.

### (पान १ वरुन) सरन्यायाधिश गवई....

कार्यक्षम नेतृत्व अपेक्षित करण्यात आहे.

न्या.गवईंनी सरन्यायाधीश पदाची शपथ घेतल्यावर आठवड्याभरात सर्वोच्च न्यायालयात उन्हाळी अवकाशाला सुरूवात झाली. सरन्यायाधीश पदाची शपथ घेतल्यावर न्या.गवई सातत्याने दौरे करत आहे. मे महिन्याच्या अंतिम आठवड्यात न्या.गवईंनी लंडनचा दौरा केला आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह संविधानाचे महत्व यावर भाष्य केले. गवई यांनी १४ मे रोजी पदभार स्वीकारल्यानंतर केवळ काही आठवड्यांतच न्यायव्यवस्थेच्या इतिहासात मोलाची आणि मूलगामी सुधारणा घडवून आणल्या आहेत.

न्यायालयीन कार्यक्षमतेपासून ते पर्यावरणसंवर्धनापर्यंत विविध मुद्द्यांवर त्यांनी झपाट्याने निर्णय घेत न्यायसंस्थेला नवे वळण दिले आहे. दरम्यान, मुंबई दौऱ्यावर असताना त्यांनी प्रोटोकॉल पालन न केल्यामुळे मुख्य सचिवांसह अधिकाऱ्यांना ख़डसावले होते. अमरावती, नागपूर, छत्रपतीसंभाजीनगर, मुंबई मध्ये आयोजित कार्यक्रमात न्या.गवई यांनी विविध सत्कार सोहळ्यात सहभाग घेतला. अलिकडेच हैदराबादमध्ये एका विधी विद्यापीठाच्या कार्यक्रमात ते सहभागी झाले होते. यात त्यांनी न्यायव्यवस्थेत बदल करण्याबाबत मत व्यक्त केले होते. या कार्यक्रमादरम्यान त्यांच्या प्रकृतीत बिघाड झाल्याची माहिती आहे.

**दिल्लीच्या रुग्णालयात भरती**

सरन्यायाधीश भूषण गवई यांनी शपथ घेतल्यानंतर हैदराबाद, मुंबई, नागपूर, लंडन व इटली आदी ठिकाणी दौरे करून विविध मंचांवर संविधान, न्यायव्यवस्था आणि सामाजिक न्याय यावर भाष्य केले. त्यांनी हैदराबादमध्ये न्यायप्रणालीतील प्रलंबित प्रकरणांचा मुद्दा उपस्थित केला, तर मुंबई विधानमंडळात भावनिक भाषण करत तीनही राज्यघटकांमध्ये परस्पर आदराची गरज व्यक्त केली. नागपूरमध्ये कायदा शिक्षणावर बोलताना त्यांनी न्यायिक नेतृत्वाचे महत्त्व सांगितले. लंडनमध्ये त्यांनी संविधानामुळे अस्पृश्यतेतून सर्वोच्च पदापर्यंत पोहोचल्याचे सांगून संविधानाचा गौरव केला. इटलीत त्यांनी भारतीय संविधानाला शांत क्रांती असे म्हणत सामाजिक न्यायाच्या प्रवासाचे महत्त्व अधोरेखित केले.

शपथ घेतल्यापासून सातत्याने दौरे करत असल्यामुळे त्यांच्या प्रकृतीवर विपरित परिणाम झाला. हैदराबादमधून परतल्यावर त्यांना दिल्ली येथील रुग्णालयात तातडीने भरती करण्यात आले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू असून ते त्याला प्रतिसाद देत असल्याची माहिती आहे. रुग्णालयात असल्यामुळे न्या.गवई सर्वोच्च न्यायालयाच्या कारवाईत सोमवारी सहभागी होऊ शकले नाही. येत्या दोन-तीन दिवसात ते पुन्हा कामावर रूजू होण्याची शक्यता आहे.

# रवींद्र जडेजाची झुंज व्यर्थ, लॉर्ड्स कसोटी भारताने गमावली; इंग्लंडचा विजय

लॉर्डस् दि.१४ : भारत विरुद्ध इंग्लंड तिसरी कसोटी इंग्लंडने जिंकली आहे. सामन्यामध्ये भारताचा २२ धावांनी पराभव झाला आहे. ७४ व्या ओव्हरमध्ये शोएब बशीरने मोहम्मद सिराजला बाद केले आणि सामना संपला. या विजयामुळे इंग्लंडने अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफीमध्ये २-१ अशी आघाडी घेतली आहे.

लीड्स आणि एजबॅस्टनप्रमाणेच लॉर्ड्स कसोटीतही बेन स्टोक्सने टॉस जिंकला. मात्र, यावेळी त्याने पहिल्यांदा गोलंदाजी न करता फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार, पहिल्या दिवशी इंग्लंडचे फलंदाज मैदानात उतरले आणि दुसऱ्या दिवसअखेर त्यांचा डाव ३८७ धावांवर संपुष्टात आला. या डावात जो रूटने शतक झळकावले. त्याला जेमी स्मिथ आणि ब्रायडन कार्सची साथ मिळाली. दोघांनी अर्धशतकीय खेळी केली. भारतासाठी जसप्रीत बुमराहने जबरदस्त कामगिरी करत ५ विकेट्स घेतल्या. त्याच्यापाठोपाठ मोहम्मद सिराज आणि नितीश कुमार रेड्डी यांनी प्रत्येकी २-२ गडी बाद केले.

भारताचा पहिला डाव सुरू झाला तेव्हा यशस्वी जैस्वाल आणि शुभमन गिल लवकर बाद झाले. मात्र, केएल राहुलने जबाबदारी सांभाळत शतक ठोकले. त्यानंतर रिषभ पंत आणि रवींद्र जडेजा यांनी प्रत्येकी ७० पेक्षा जास्त धावा केल्या. भारतही ३८७ धावांवर ऑलआउट झाला. ख्रिस वोक्सने ३ विकेट्स घेतल्या. बेन स्टोक्स आणि ब्रायडन कार्स यांनी प्रत्येकी २-२ गडी बाद केले.

दुसऱ्या डावात भारताच्या गोलंदाजांनी दमदार पुनरागमन केले. इंग्लंडकडून जो रूटने पुन्हा सर्वाधिक धावा केल्या. तो ४० धावांवर बाद झाला. त्याच्यापाठोपाठ कर्णधार बेन स्टोक्सने ३३ धावा जोडल्या. भारतासाठी वॉशिंग्टन सुंदरने सर्वाधिक ४ बळी घेतले, तर मोहम्मद सिराज आणि जसप्रीत बुमराह यांनी प्रत्येकी २-२ विकेट्स घेतल्या. आकाश दीप आणि नितीश कुमार रेड्डीने प्रत्येकी १-१ गडी बाद करत इंग्लंडचा डाव १९२ धावांवर संपवला.

### (पान १ वरुन) विजयी मेळावा...

राज ठाकरे हे नाशिकमध्ये मनसेच्या तीन दिवसीय शिबिरासाठी दाखल झाले आहेत. त्यावेळी अनौपचारिक गप्पा मारताना ते म्हणाले की, मराठीचा विजयी मेळावा केवळ मराठीच्या मुद्यावर होता, त्याचा राजकारणाशी संबंध नाही. नोव्हेंबर - डिसेंबर दरम्यान चित्र स्पष्ट होईल. त्यांनतर युती संदर्भातील निर्णय बघू.

हिंदी सक्तीच्या बाबतील आताच्या सरकारने जीआर काढला होता. मागील सरकारने त्याचा अहवाल स्वीकारला होता, पण त्याचा जीआर काढला नव्हता, अंमलबजावणी केली नव्हती असं राज ठाकरे म्हणाले.

आधी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागू द्या, मग बघू असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं. तर दुसरीकडे राज ठाकरेंनीही युतीबाबत सस्पेन्स कायम ठेवला. त्यामुळे दोन्ही ठाकरे बंधूंची युती होणार की नाही याबाबत अद्याप संभ्रम आहे. ही युती होऊ नये यासाठी महायुतीकडून पडद्यामागून हालचाल सुरू असल्याची खात्रीलायक माहिती आहे.

### (पान १ वरुन) महिला कर्मचाऱ्याकडे....

शिवसैनिक आणि पिडीत महिलेसह आंदोलनाचा पवित्रा घेतला होता.

**विधानसभा अध्यक्ष मॅनेज झाल्याचा आरोप**

अकोला जिल्ह्यातील बाळापूरचे ठाकरेंच्या शिवसेनेचे आमदार नितीन देशमुख यांनी विधानसभा अध्यक्षांवर गंभीर आरोप केले. लक्षवेधी मांडू न देण्यासाठी विधानसभा अध्यक्ष मॅनेज झाले असा आरोप देशमुखांनी केला. महिला कर्मचाऱ्याकडे शरीरसुखाची मागणी केल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी नितीन देशमुखांनी केली होती. मात्र ही लक्षवेधी येऊ न देण्यासाठी विधानसभा अध्यक्षांनी टाळाटाळ केली, ते मॅनेज झाले असा आरोप देखमुखांनी केला.

**दोन अधिकाऱ्यांवर आरोप**

मूर्तिजापूरच्या जीवन प्राधिकरण कार्यलयातील कंत्राटी कॉम्प्युटर ऑपरेटर महिलेकडून शाखा अभियंता राजेंद्र इंगळे आणि उपविभागीय अधिकारी डी. बी कपिले यांनी शरीरसुखाची मागणी केल्याचा आरोप करण्यात येत आहे. हा आरोप त्या महिलेनेच केला.



**भावपूर्ण श्रद्धांजली**

आमचे वडील श्री. सुधाकर जोशी
दि. 13 जुलै 2025 रोजी ह्यांना देवाज्ञा झाली.
त्यांच्या आत्म्यास शांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

श्रीकांत जोशी, निशांत जोशी व वैशाली ब्रह्मे (जोशी)

आर.एन.आय.क्र.११४२०/५७/रजि/क्र.एन.आर./ए.टी.आय./८५/२००३, हे पत्र श्रम प्रतिष्ठान प्रा.लि. चे करीता हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक उल्हास बा. मराठे यांनी हिंदुस्थान ग्राफीस अँड प्रिंटर्स, सहकारी औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती येथे छापून दै. हिंदुस्थान कार्यालय, खापर्डे बगीचा, अमरावती येथे प्रसिद्ध केले. ● **प्रबंध संपादक** – विलास अ.मराठे ● **संपादक–** उल्हास बा. मराठे ● **मालक –** श्रम प्रतिष्ठान प्रा.लि., अमरावती●दुरध्वनी क्र. २६६०४२९,२६६६४६४,२६६००६७, २६६०५७६,२६६२७४५ ● फॅक्स क्र.–०७२१–२६६३३६०, २६६०५७६ ● **यवतमाळ कार्यालय** :दै. हिंदुस्थान, स्टेशन रोड, यवतमाळ फोन नं. : २३९६४८/२४३०१६/२४५०३८ ● **अकोला कार्यालय :** २/९, व्ही.एच.बी. कॉलनी, गौरक्षण रोड, अकोला फोन : २४५९५८०/२४५१६९३ ● **वाशिम कार्यालय :** दै. हिंदुस्थान कार्यालय महात्मा फुले भाजी मार्केट वाशिम, फोन २३५९१५/२३३२१५ ● **बुलडाणा कार्यालय :** दै. हिंदुस्थान कार्यालय, सुवर्णनगर,बुलडाणा. फोन २४६०८९ ● **मुंबई कार्यालय : रविंद्र बी. खांडेकर** ११०,बिरीया हाऊस, फोर्ट, मुंबई मोनं.९९६७२०३१६२ फोन नं. ऑफीस : ०२२–२२६१२९११ निवास : ०२२–२२०९६७४०
●**पुणे कार्यालय : नरेंद्र शिंदे,** भार्गव अपार्टमेंट, एफ–४, दुसरा माळा, ३४३–बी, शनिवार पेठ, पुणे – ३० फोन : ऑ.२४४९१०६०, मो.९८२३०४६५२२ पी.आर.बी.कायद्यानुसार जिल्हा प्रमुख व संबंधीत बातमी देणारा जबाबदार सर्व वाद अमरावती न्यायालयांतर्गत

सुप्रभात

हिंदुस्थान

भारतीय सौर २६ आषाढ १९४७

द्वितीय मुखपृष्ठ

epaper : dainikhindusthan.com
email : dainikhindusthan@gmail.com
twitter : twitter.com/HindusthanAmt

सुविचार

जे लोक तुमची परीक्षा पाहतात, त्यांना उत्तर देण्याची क्षमता स्वतःजवळ ठेवा.

अमरावती, मंगळवार दि. १५ जुलै, २०२५

अमरावती हवामान

मंगळवारचा अंदाज
कमाल : ३० किमान २४

| | |
|---|---|
| नागपूर | : कमाल ३१ किमान २४ |
| पुणे | : कमाल २८ किमान २३ |
| मुंबई | : कमाल २९ किमान २८ |
| अकोला | : कमाल ३१ किमान २४ |
| यवतमाळ | : कमाल ३० किमान २४ |
| वाशिम | : कमाल ३१ किमान २३ |

# 'युग प्रवर्तक' डॉ. हेडगेवार नाट्याला प्रचंड प्रतिसाद

## डॉक्टरांच्या तपस्वी चरित्राने श्रोते भारावले : कलावंतांचे समरस होऊन सादरीकरण





अमरावती दि. १४ : आद्यसरसंघचालक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या जीवनावर आधारित युग प्रवर्तक - डॉ. हेडगेवार हे दोन अंकी नाटकाचे दमदार सादरीकरण संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृहात रविवारी झाले. सदर नाट्य प्रस्तुतीला प्रचंड प्रतिसाद अमरावतीकर जनतेने दिला. संपूर्ण सभागृह दर्शकांनी खचाखच भरलेले होते.

राज्य शासनाच्या सांस्कृतिक विभागातर्फे प्रायोजित या नाट्य प्रयोगाचा शुभारंभ खासदार अनिल बोंडे, आमदार रवि राणा, अमरावती महानुभाव आश्रमाचे महंत कविश्वर कुळाचार्य मोहन महाराज, संघाचे विभाग संघचालक चंद्रशेखर भोंदू, महानगर संघचालक उल्हास बपोरीकर, भारत विकास परिषद अमरावती शाखा अध्यक्ष प्रा. डॉ. रविकांत कोल्हे, भारतीय उत्कर्ष मंडळ अमरावती शाखा अध्यक्ष दिलीप भुजाडे, नाटकाचे निर्माते व नादब्रह्माचे अध्यक्ष तसेच भारत विकास परिषदेचे नागपूर येथील प्रांताध्यक्ष पद्माकर धानोरकर यांचे हस्ते दिपप्रज्वलन करून झाला.

सर्व कलाकारांनी समरस होऊन आविष्कार अभिनय केलेल्या या प्रयोगाने प्रेक्षकांना ३ तास अक्षरशः खिळवून ठेवले. डॉक्टर हेडगेवारांच्या जीवनातील विविध प्रसंग रोमहर्षक दृश्यांसह जिवंतपणे सादर केल्या गेले. त्यामध्ये प्रामुख्याने त्यांचे क्रांतिकारी जीवन, काँग्रेस पक्षातील त्यांचे सुभाष बाबू आणि महात्मा गांधी यांच्याशी असलेले संबंध, संघ स्थापनेची पार्श्वभूमी, गोळवलकर गुरुजींची भेट व संघामधील त्यांनी सक्रिय होण्याची आवश्यकता, संघकार्य देशभर पोहचावे यासाठी असलेली अत्यंतिक तळमळ, स्वप्नात सुद्धा भारत हे हिंदू राष्ट्र या संकल्पनांचा ध्यास घेऊन रक्ताचे पाणी कसे झाले इत्यादी प्रसंगांचे जिवंत प्रस्तुतीकरण सदर नाटकांमध्ये करण्यात आले.

प्रत्यक्ष संघाची पार्श्वभूमी नसणाऱ्या काही प्रेक्षकांनी आपले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबद्दल असलेले गैरसमज दूर झाल्याची प्रांजळ प्रतिक्रिया दिली. संघ स्थापनेची पार्श्वभूमी बघितल्यानंतर आज शिस्तबद्ध स्वयंसेवकांची फौज कुठल्याही आपदेच्या वेळी कशी सक्रिय होते याचे मूळ लक्षात आले. संघाच्या शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण महाराष्ट्रात होणाऱ्या या प्रेरक नाटकाच्या प्रयोगाच्या निमित्ताने डॉ. हेडगेवार यांचे तपस्वी चरित्र घराघरात पोहोचेल हे निश्चित, असेही मत अमरावतीकर नागरिकांनी व्यक्त केले.



इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए-) अमरावती शाखेतर्फे नवनिर्वाचित अमरावती मनपा आयुक्त सौम्या शर्मा ह्यांचे स्वागत करतांना आयएमए अमरावती शाखेच्या अध्यक्ष डॉ.अलका कुथे, उपाध्यक्ष डॉ.जयंत पांढरीकर, कार्यकारीणी सदस्य डॉ. विजय कुथे व डॉ.सीमा अडवानी.

# नगरपरिषदेचा मनमानी कारभार पुन्हा चव्हाट्यावर

## भर पावसात केला डांबरी रस्ता : अवघ्या पंधरा दिवसांत उखडला ५० लाखांचा रस्ता

अंजनगाव सुर्जी दि. १४ : अंजनगाव सुर्जी नगरपरिषद अंतर्गत शहरात मोठ्या प्रमाणात कामे चालू असुन ती कामे मर्जीतील कंत्राटदारांना देण्यात आल्याची ओरड शहरात होत होती. मर्जीतील कंत्राटदार काम करत असताना निकृष्ट दर्जाचे होत असल्याच्या अनेक तक्रारी होऊन स्थानिक नगरपरिषद प्रशासन कोणत्याही प्रकारची तक्रारींची दखल न घेतल्याचे दिसून येत आहे.

शहरातील गेल्या वीस वर्षांपासून स्वप्ननगरी नगरातील नागरिक नगराला चांगला रस्ता मिळावा यासाठी सतत पाठपुरावा करत होते मात्र वीस वर्षांपासून रस्त्याची मागणी करत असताना यावर्षी डांबरी रस्त्याला सुरवात झाली मात्र स्वप्ननगरीत नुकताच पंधरा दिवसांपूर्वी डांबरी रस्ता करण्यात आला असून डांबरी रस्ता भर पावसात केल्यामुळे रस्ता उखडून निघत असून रस्ता दर्जाहीन झाला असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे .तर या कामाच्या गुणवत्तेवर प्रश्न उपस्थित होत आहे. या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे कंत्राटदार आणि संबंधित नगरपरिषदच्या कामाच्या पद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या रस्त्यावरून कोणतीही जड वाहतूक जात नसताना पंधरा दिवसांत या रस्त्यांची दुरवस्था झाली असून हा रस्ता जागोजागी उखडला असल्याने नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांनी या रस्त्यांची पाहणी करून रस्त्यांचा दर्जा तपासावा अशी मागणी स्वप्ननगरी नगरातील रहिवाशांकडून होत आहे.



आमच्या नगरात अत्यंत निकृष्ट दर्जाचे डांबरीकरण करण्यात आले आहे. कंत्राटदाराने रस्त्यांची व्यवस्थित साफसफाई न करता डांबरीकरण करण्यात आले तसेच पाऊस चालू असताना डांबरीकरण करण्यात आल्यामुळे रस्ता दर्जाहीन झाला आहे. आम्ही जिल्हाधिकारी यांच्या कडे कंत्राटदाराला काळया यादीत टाकण्याची मागणी करुन रस्ता पुन्हा करण्याची विनंती करणार आहे

**स्वप्नील तायडे**
**स्वप्ननगरी रहिवासी**

**पावसाळ्यात डांबरी रस्ता करणे योग्य नाही**

पावसाळ्यात डांबरीकरण केल्यास, डांबर व्यवस्थित पसरत नाही आणि रस्त्याची गुणवत्ता कमी होते. तसेच, पावसाचे पाणी डांबरात मुरल्यास,डांबराची गुणवत्ता कमी होऊन रस्त्यावर खड्डे लवकर पडतात आणि रस्ता कमकुवत होऊन खराब होतो.

**रहिवाशांची होती वीस वर्षांपासून रस्त्याची मागणी**

स्वप्ननगरीतील रहिवाशांनी रस्त्यासाठी वीस वर्षे संघर्ष केला असुन वीस वर्षांनंतर या रस्त्यांला डांबरी रस्ता मिळाला होता मात्र भर पावसात डांबरी रस्ता केल्याने चारच दिवसांनी रस्त्यावरचे डांबर निघून शासनाच्या ५० लाखाचा कंत्राटदार व अभियंता यांच्या मनमानी पद्धतीने चुराडा झाला असल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे.

# संत सचिनदेव महाराज यांच्यातर्फे तपोवन ला २१ हजाराची देणगी



अमरावती दि.१४ : गुरुपौर्णिमेनिमित्त तपोवनवासियांना आशीर्वाचन देण्याकरिता दरवर्षीप्रमाणे संत अच्युत महाराजांचे पटशिष्य संत सचिन देव महाराज यांनी येऊन आपल्या अमृतवाणी समाजसेवेबाबत गुरुची महिमा सांगितली आणि तपोवनला प्रबोधन प्रवचनातून त्यांना मिळालेल्या २१००० रुपया निधी तपोवनच्या विकास कार्यासाठी देणगी म्हणून दिला.

मागील बार-तेरा वर्षांपासून संत सचिन देव महाराज दरवर्षी गुरु पौर्णिमा प्रथम पद्मश्री डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्या विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवनला येऊन पूजन करतात. आपले गुरुपौर्णिमेचे प्रथम प्रवचन ते तपोवनला अर्पण करतात. संत अच्युत महाराजांचा वारसा ते तपोवन मध्ये चालवीत आहेत. देशभर प्रबोधन प्रवचनासाठी भ्रमंती करताना त्या ठिकाणी ते तपोवनचा उल्लेख आवर्जून करतात. तपोवनला भेट देण्याचा भक्तांना आग्रहा घालतात आणि आर्थिक जमा झालेला निधी प्रत्येक कार्यक्रमात तपोवनला देणगीत देतात. आतापर्यंत त्यांनी लाखो रुपयांचा निधी तपोवनला देणगी स्वरूपात प्रदान केला आहे.

यंदाही गुरुपौर्णिमेनिमित्त त्यांनी तपोवन च्या तारका सभागृहात प्रवचन झाल्यानंतर २१००० रुपयांचे देणगी तपोवन चे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई सचिव सहदेव गोळे माजी नगरसेवक सुरेश गटलेवार यांच्या स्वाधीन केला. यावेळी संस्थेचे उपसचिव ऋषिकेश देशपांडे उपअधीक्षक योगेश करडे अंतर्गत व्यवस्थापक भास्कर शेटे तपोवन मधील कार्यकर्ते शैक्षणिक निवासात सर्व विद्यार्थी व भक्तगण मोठ्या संख्येने हजर होते.

# जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या प्रभाग रचना जाहिर

अचलपुर दि. १४ : महाराष्ट्रातील जिल्हा परिषद व पंचायत समिती च्या निवडणुक प्रकिया घोषीत झाल्या असुन अचलपुर जिल्हा परिषद गणात १ सदस्यांची वाढ होऊन ६ सदस्य तर पंचायत समितीमध्ये २ सदस्यांची वाढ होऊन सदस्य संख्या १२ झाली असुन निवडणुक प्रारूप आराखडा आज प्रसिद्ध करण्यात आला आहे.

आज जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सावत्रिक निवडणुकांकरिता प्रभाग रचना घोषित करण्यात आली आहे. अचलपुर तालुक्यात पूर्वी ५ जिप गण होते त्यात १ ने वाढ झाली तर पंचायत समितीच्या २ गणाने वाढ झाली आहे . अचलपुर तालुक्यातील धामनगाव गढी जि .प .गणात मध्ये धामनगाव गढी, निमदरी, वझ्झर पिपळखुटा, देवगाव, हनवतखेडा एकलासपुर, खरपी, पांढरी म्हसोना, मल्हारा, सालेपुर, निमकुंड, कोठारा, बेलखेडा तर कांडली जिप गणात कांडली, कविठाबु, घोडगाव, अंबाडा कंडारी, खेळदेवमाळी, नारायनपुर, जवर्डी, भुगाव, रामापुर बेलज. तसेच धोतरखेडा जिप गणात गौरखेडा, धोतरखेडा, दर्याबाद , सावळी दातूरा, वडगाव फत्तेपुर, खांजेमानगर, भिलोना, हरम, चमक बु, चमक खु., नायगाव. तर पथ्रोट जि प गणात परसापुर, पथ्रोट, कासमपुर, उपातखेडा, रामापुर बु, वाघडोह, जवळापुर, तर शिंदी जिप गणात काकडा शिदी बु, तुळजापुर जहाँ, टवलार, रासेगाव, कोल्हा, येवता, कुष्ठा बु, कुष्ठा खु, इसापुर, वडनेर भुजग, बेळगाव, चौसाळा.

असदपुर जिप गणात बोरगाव दोरी , वासणी बु.,वासनी खु, दोनोडा, निजामपुर,खैरी , बोर्डी , बोपापुर , सावळी बु , बोरगाव पेठ , असदपुर, शहापूर ,निंभारी, सावळापुर येसुर्णा , येलकी, हिवरापुर्णा ग्रामपंचायतींचा समावेश आहे. तर पंचायत समिती सर्कल निहाय धामणगांव गढी पस , गणात धामणगांव गढी, निमदरी,वझ्झर पिंपळखुटा, देवगांव, हनवतखेडा, एकलासपूर. खरपी पस गणात खरपी, पांढरी, म्हसोना, मल्हारा, सालेपूर, निमकुंड, कोठारा, बेलखेडा .कांडली पस गणात कांडली गाव तर कविठाबु - पस गणात कविठा बु, अंबाडा कंडारी घोडगांव, खेलदेवमाळी, नारायणपूर, जवर्डी, भूगाव, रामापूर बेलज.

धोतरखेडा- पस गणात गौरखेडा, थोतरखेडा, दर्याबाद, सावळी दातुरा. वडगांव फत्तेपुर पस गणात वडगाव फत्तेपुर, खांजमानगर, हरम, भिलोना, चमक बु, चमक खुर्द, नायगांव. परसापूर पस गणात परसापूर, कासमपूर, उपातखेडा, रामापूर बु, वाघडोह, जवळापूर, पथ्रोट- पस गणात पथ्रोट. शिंदी बु.- पस गणा त शिंदी बु, काकडा, तुळजापूर जहाँ., टवलार. रासेगांव- पस गणात रासेगाव,कोल्हा, येवता, कुष्ठा बु, कुष्ठा खुर्द, इसापूर, वडनेर भुजंग, बळेगांव, चौसाळा ग्राम पंचायत चा समावेश करण्यात आला आहे. बोपापूर- पस गणात बोरगांव दोरी, वासनी बु., वासनी खुर्द, दोनोडा, निजामपूर, खैरी, बोर्डी, सावळी बु, बोपापूर, बोरगांव पेठ असदपूर- पस गणात असदपूर शहापूर, निंभारी, सावळापूर, येसुर्णा, येलकी ग्राम पंचायत चा समावेश करण्यात आला आहे.

निवडणुकीची अधिसुचना १४.७.२५ ला प्रसिद्ध झाली असून अंतीम प्रभाग रचना १८-८-२५ ला प्रसिद्ध केल्या जाणार असल्याचे जिल्हाधीकारी कार्यालयातुन प्रसिद्ध पत्रकात नमूद केले आहे .

# महावितरणच्या ट्रॅक्टरला अपघातात एक युवक जागीच ठार



मोर्शी दि. १४ : महावितरण कंपनीचे सिमेंट विद्युत पोल घेऊन जाणाऱ्या ट्रॅक्टरच्या अपघातात एक युवक जागीच ठार झाला असून इतर पाच जण जखमी झालेले आहेत.

माँ सरस्वती इलेक्ट्रिकल कंपनी योगेश धोटे रा हिवरखेड यांचे स्वतःच्या मालकीचे ट्रॅक्टर क्र. एम. एच. २७ डी. एल. ०४७२ आज दुपारी १२ वा. चे सुमारास मोर्शी तालुक्यातील आष्टगांव येथून महावितरण कंपनीचे सिमेंटचे विद्युत पोल वाहून नेत असतांना मोर्शी चांदूरबाजार रोडवरील आष्टगाव जवळ सदर ट्रॅक्टरची ट्रॉली पलटी होऊन ट्रॉलीवर असलेला अनिकेत सुनील मुंदाफळे वय २६ रा आष्टगाव ता मोर्शी जी अमरावती या तरुणाचा ट्रॉली खाली दबून घटनास्थळी करूण अंत झाला. व सोबत असलेले दीपक गणेश भोकरे,रोशन शामराव धारवाडे २७, रोशन लंगडाजी कासदेकर २२,सचिन धनु लोखंडे हे सर्व रा.बेलमंडी (म. प्र.), अनिल महेश बानवंशी, रा. आष्टगाव. यांना ऊपचारार्थ उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे दाखल करण्यात आले. याप्रकरणी मोर्शी पोलीस पुढील तपास करीत आहे.

# 'या' ९ प्रलंबित मागण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील सरकारी कर्मचारी सप्टेंबर महिन्यात राज्यव्यापी आंदोलन पुकारणार



अमरावती दि. १४ : २०२५ हे वर्ष सरकारी कर्मचाऱ्यांसाठी विशेष खास ठरत आहे. यावर्षी सरकारी कर्मचाऱ्यांची गेल्या एका दशकातील मोठी यावर्षी सरकारी कर्मचाऱ्यांची गेल्या एका दशकातील मोठी मागणी मान्य करण्यात आली आहे. केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांसाठी केंद्रातील सरकारकडून आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेला मान्यता देण्यात आली आहे.

यामुळे एक जानेवारी २०२६ पासून नवीन आठवा वेतन आयोग लागू होण्याची शक्यता आहे.मात्र असे असले तरी सरकारी कर्मचाऱ्यांच्या अजूनही इतर अनेक मागण्या प्रलंबित आहेत. महाराष्ट्र राज्यातील राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या देखील विविध मागण्या प्रलंबित असून याच मागणीच्या अनुषंगाने आता राज्य कर्मचाऱ्यांकडून आक्रमक पवित्रा घेण्यात आला आहे. राज्य सरकारी कर्मचारी आक्रमक पाविञा घेण्यात आला आहे. राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या माध्यमातून जर सरकारकडून राज्य कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत येत्या काही दिवसांनी सकारात्मक निर्णय घेण्यात आला नाही तर सप्टेंबर मध्ये राज्यव्यापी आंदोलनाची तयारी दाखवण्यात आली आहे.

यासंदर्भात संघटने कडून सरकारला निवेदन सुद्धा देण्यात आले आहे. या निवेदनात राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या नऊ प्रलंबित मागण्यांबाबत उल्लेख करण्यात आलेला आहे. दरम्यान आता आपण राज्य सरकारी कर्मचारी कोणत्या ९ प्रलंबित मागण्यांसाठी राज्यव्यापी आंदोलनाची तयारी करत आहेत?याची माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

**या आहेत राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या नऊ प्रलंबित मागण्या**

महागाई भत्ता वाढ : केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा जानेवारी महिन्यापासूनचा महागाई भत्ता वाढवणे. सध्या राज्य कर्मचाऱ्यांना ५३% दराने महागाई भत्ता दिला जात आहे तर केंद्रीय कर्मचाऱ्यांना ५५% दराने महागाई भत्ता मिळतोय यामुळे राज्य कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता सुद्धा ५५% करण्याची मागणी कर्मचाऱ्यांची आहे.

सेवानिवृत्तीचे वय वाढवणे: सध्या राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ५८ वर्ष इतके आहे. तर दुसरीकडे केंद्रीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवत्तीचे वय ६० वर्ष इतके आहे केंदीय कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्ष इतके आहे. केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर राज्य कर्मचाऱ्यांचे वय ६० वर्षे करावे अशी ही मागणी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांकडून केली जात आहे.

नवीन कामगार संहिता रद्द करण्याची मागणी: राज्य सरकारने लागू केलेली नवीन चार कामगार संहिता रद्द करण्याची मागणी सुद्धा कर्मचाऱ्यांकडून उपस्थित करण्यात आली आहे.

शिक्षकांच्या संचमान्यतेचा आदेश रद्द करावा : शिक्षकांच्या संचमान्यता संदर्भातील गेल्यावर्षी जारी झालेला आदेश रद्द करण्याची मागणी कर्मचाऱ्यांकडून करण्यात आली आहे. दिनांक १५ मार्च २०२४ रोजीचा आदेश तात्काळ रद्द करावा. अशी मागणी यावेळी उपस्थित करण्यात आली आहे.

या पदभरतीवरील बंदी तात्काळ हटवावी आम्ही आपल्या माहितीसाठी सांगू इच्छितो की वर्ग चार (गट ड) कर्मचारी, तसेच वाहन चालक पदभरतीवर बंदी घालण्यात आली आहे. मात्र या पदभरतीवरील बंदी तात्काळ हटवण्याची मागणी आता कर्मचाऱ्यांकडून उपस्थित करण्यात आली आहे.

अनुकंपा तत्त्वावरील उमेदवारांना लवकर नियुक्ती मिळावी : राज्य कर्मचाऱ्यांकडून अनुकंपा तत्वावरील जे उमेदवार प्रतीक्षा यादीमध्ये आहेत त्यांना तात्काळ नियुक्ती मिळावी अशी सुद्धा मागणी यावेळी उपस्थित करण्यात आली आहे. मागणा यावेळी उपस्थित करण्यात आला आह.

कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी करावे: महाराष्ट्र राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांकडून दहा वर्षांपेक्षा अधिक काळ ज्या कर्मचाऱ्यांनी कंत्राटी किंवा रोजंदारी किंवा अंशकालीन तत्वावर काम केलेले आहे त्यांना नियमित करण्यात यावे म्हणजेच शासन सेवेत समाविष्ट करावे अशी मागणी उपस्थित करण्यात आली आहे.


नवीन राष्ट्रीय धोरण लागू करताना पुनर्विचार: महाराष्ट्र राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांकडून नवीन राष्ट्रीय धोरण लागू करताना राज्य सरकारने पुनर्विचार करावा अशी सुद्धा मागणी यावेळी उपस्थित केली आहे.

सुधारित राष्ट्रीय पेन्शन योजनेचा जीआर काढावा : राज्य सरकारकडून नवीन पेन्शन योजनेत जी सुधारणा करण्यात आली होती त्या सुधारित राष्ट्रीय पेन्शन योजनेचा जीआर तात्काळ निर्गमित करण्यात यावा अशी सुद्धा मागणी यामध्ये करण्यात आली आहे.

# श्याम ठणगण यांना उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार

**(किशोर मोकलकर)**

आसेगाव पूर्णा दि. १४ : चांदुर बाजार तालुक्यातील करजगाव येथील श्री शंकरराव विद्यालय व श्री ल .चं खेरडे कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम ठणगण यांना २०२५ -२६ इंडियन टॅलेंट ऑलिम्पियाड वतीने देण्यात येणारा उत्कृष्ट प्राचार्य हा राष्ट्रीय स्वरूपाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार डॉ किरण बेदी माजी राज्यपाल यांचे हस्ते मुंबई येथे ९ नोव्हेंबर २०२५ रोजी होणाऱ्या समारंभात हा पुरस्कार दिला जाईल .



श्रीमती जनाबाई नाथे कनिष्ठ कला महाविद्यालय, काकडा, ता. अचलपूर , येथे मराठी चे प्राध्यापक म्हणून दि.१ ऑगष्ट१९९८ ते ३१ जुलै २०१६ पर्यंत . येथेच पदोन्नती होऊन १ ऑगष्ट २०१६ ते ४ फेब्रुवारी २०१९ पर्यंत प्राचार्य पदावर काम . नंतर ५ फेब्रुवारी २०१९ ते ३० जुन २०२९ पर्यंत श्री शंकरराव विद्यालय व श्री ल चं खेरडे कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालय, करजगाव येथे प्राचार्य पदावर तसेच श्री तुळशीरामजी मे विद्यालय कविठा बु. येथे १ जुलै २०१९ ते ३० जुन २० २०२३ पर्यंत मुख्याध्यापक पदावर आणि १ जुलै २०२३ पासून आजपर्यंत पुन्हा श्री शंकरराव विद्यालय व कमवि.करजगाव येथे प्राचार्य पदावर कार्यरत आहे.पुरस्कार जाहीर होताच सर्वच स्तरावरून प्राचार्य श्याम ठणगण यांचे अभिनंदन होत आहे.

# शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांचा युनेस्कोच्या यादीत समावेश : चांदूर रेल्वेत जल्लोष



**(उत्तमराव गावंडे)**

चांदूर रेल्वे दि. १४ : छत्रपती शिवाजी महाराजांच्या देदीप्यमान कर्तृत्वाचा वारसा सांगणाऱ्या बारा किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश झाला आहे. याचा जल्लोष चांदूर रेल्वे शहरातील छ. शिवाजी नगरातील शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ भाजपा व शिवप्रेमींतर्फे करण्यात आला.

जागतिक वारसा स्थळांच्या यादीत छत्रपती शिवाजी महाराजांचे महाराष्ट्रातील ११ किल्ले रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी तसेच तामिळनाडूतील एक जिंजी या किल्ल्यांचा समावेश झाला आहे. या ऐतिहासिक आनंददायी घोषणेचा जल्लोष साजरा करण्यासाठी शिवाजी महाराज पुतळ्याजवळ शिवप्रेमींनी गर्दी केली होती. छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा घोषणांनी परिसर दुमदुमला होता.

यावेळी भाजपा शहराध्यक्ष नंदा वाधवानी, माजी नगरसेवक अजय हजारे, बच्चू वानरे, निलेश भालेराव, अनिल मोटवानी, शुभम जैन, बाळासाहेब सोरगिवकर, अरूण माने, विजय मिसाळ, प्राविण्य देशमुख, संजय पुरसाम, अंकीत कदम, मंगेश भोसले, उमेश लांजेवार, पंकज घोरपडे, दिपाली मिसाळ, नंदा माने, रेखा नागणे, अर्चना पातुर्डे, पुनम यादव, सारिका कदम, गायत्री डोंगरे, अनुरूप मिसाळ, दद्दु गायगोले, संजय श्रीवास, रोषन राऊत, शंतनु पुरसाम, श्याम गायकवाड, शामा इंगोले, तेजस यादव, चव्हाण यांसह अनेकांची उपस्थिती होती.

## कथा मेळघाटच्या: ३

# स्तोत्रात इंद्रिये अवधी

अश्विन पोर्णिमेची पहाट रायपूर हतरुच्या निसरड्या वाटेवर उगवली तसा दाटोणातून सळसळणारा वारा काहीसा बोथट झाला. पहाटेचं





गर्भकोमल हास्य पाखरांच्या चिवचिवाटानं आणि डांगीफांदीवर ओघळून आलेल्या सूर्यकिरणांच्या लखलखाटानं रेशीम रेशीम झालं. नाल्याच्या खोबणितून वाट ओलांडू पाहणारी रानकोंबडीची खोप वाचवण्यासाठी मी बाईकचे करकचून ब्रेक दाबले तशी पाठीमागे बेसावध बसलेली स्टेला आपल्या तंद्रीतून जागी झाली. गिरक्या घेणाऱ्या वाऱ्यावर स्वार होऊन पुन्हा कूच केलं तसा चिखलाम बिटच्या अस्पर्ष वाटेवर बसलेला लाबुन दृष्टीपथास आला. निर्व्याज स्नेहाची कळी त्याच्या हास्याच्या रुपानं खुलली तशी मी बाईक आडोशाला उभी केली. अंगाखांद्यावर खेळणारा गागरा उडवून हाती कॅमेरा घेउन स्टेला सज्ज झाली.

हातातली काठी माणुसभर वाढलेल्या तीखाडी, गोंधळच्या डफावर फीरवत लांबुन वाट काढायला सुरुवात केली तसे आम्ही भरभर त्याच्यामागे चालायला लागलो. रायमुनीयाच्या झुडूपामधून वाट काढताना बोचकारलेल्या अंगाला कुरवाळत तोंडावर सनस्क्रीन लोशन लावलेली स्टेला कावली तसा लाबु वरमला त्यानं आपल्या पावलांचा वेग काहीसा कमी केला. सागवानावर फुललेल्या झुपकेदार फुलांच्या घोसातून झीरपणारं उन काहीसं धारदार झालं. सूर्यदेवानं थेट आभाळात माथ्यावर ठिय्या मारला तसा हल्दू, लेंड्या आणि साजडच्या डांगा शहारल्या. नदीकाठावर स्तिथप्रज्ञागत उभ्या असलेल्या अर्जुनवृक्षाला टेकून बसत लांबुन जरा उसंत घेतली. चौफेर भीरभीरणारी त्याची नजर एकाएकी धावड्याच्या बुंध्यावर एकवटली तसा तो सजग झाला. तांबुस गवतात अल्lाद पावलं टाकत त्यानं आम्हाला त्याच्यामागे येण्यासाठी खुण केली. सावलीत येताच तो गवतात पहुडला. त्याच्या आज्ञेची आब राखत आम्हीही धावड्याच्या बुंध्यावर बसलेल्या जागली महाराजांवर कॅमेरा रोखत गवतात पडून राहिलो.

वेळुच्या झावळामधून वाहणारा वारा काहीसा वेडावला. उतरणीच्या उन्हानं तलखीभरले वृक्ष पेंगायला लागले. दिवसभर चरून रान्नावलेले जनावरं झाडापेंडाच्या सावलीत रवंथ करत बसले. नितळ शांततेनं रानावर आपला हात फीरवताच महाराजांनी पुढे कूच केली. पडल्यापडल्या स्टेलानं इशारा करताच मी सावध झालो. महाराजांच्या झुबकेदार मिशा ताठरल्या. आपलं कृश शरीर सांभाळत महाराज राणीवसाकडे निघाले तशा राणी सावध झाल्या. आपले गलेलठ्ठ डौलदार शरीर सांभाळत त्या आपल्या जाळ्यावर महाराजांच्या स्वागताला सज्ज झाल्या. विरहाच्या अग्नित होरपळलेल्या महाराजांनी आपल्या पायांचा वेग वाढवला तसा राणी सामोऱ्या झाल्या. दोघांनी एकमेकांकडे बघताच सारं चराचर स्थिर झालं. श्वास गुरफटले. देहप्राण एकाकार झाले. उन्मनीच्या सुरात तल्लीन होत. आदिअंताच्या पल्याड जाताच राणीने डाव साधला. महाराजांनी मान आपल्या अजस्त्र हातांनी मुरगळत त्यांच्या डोळ्यात आपले दात खुपसले. प्रणयकोमल श्वासांच्या सुरावटी महाराजांच्या निष्प्राण कलेवरात विलीन झाल्या. स्टेलाला चेहऱ्यावर खीन्नता उतू आली. कॅमेरा बॅगेत कोंबत ती गपकन उठुन बसली.

स्टेला म्हणजे जनुकशास्त्राची संशोधक, ट्रेकर आणि सिमौन द बुवा ची निस्सीम भक्त. स्त्रीवादाची भक्कम पुरस्कर्ती रानावनात जाऊन कीटकांच्या मैथुनाच्या फिल्मस रिकॉर्ड करण्याची तिला भारी हौस

आणि कीटकांच्या शरीरात मैथुनाच्या वेळी होणाऱ्या रासायनिक बदलांचा अभ्यास करण्याची तिला प्रचंड असोशी. ती प्रचंड अस्वस्थ झाली. तसे आम्ही चिखलाम मचानावर परतण्याचा निर्णय घेतला. गवतातून वाट काढतांना मनात विचारांचा गुंता वाढला.

कोरकू बोलीत जागली महाराज म्हणजे कोळी, स्वायडर. मेळघाटात आढळणाऱ्या कोळ्याच्या विविध प्रजातींपैकी जायंट वुड स्पायडरने विणलेले जाळ बघणं म्हणजे नजरेत रसिकत्व सांधून नक्षीकलेला साद घालणच जणू. पण या रहस्यमयी गूढ प्राणी जगतात घडणाऱ्या अनेक गोष्टी समजुन घेतल्या की, मनाला हादरेच बसतात खरं तर विदर्भात आढळणाऱ्या कोळ्यांच्या एकूण १६०० प्रजातींपैकी काही तर आयुष्यात एकदाच मैथुन करतात आणि शेवटच्या क्षणी मादीकोळीचे भक्ष बनतात. स्टेला सांगत होती. मादी कोळीने नरदेह खाऊन टाकला की तीची गर्भारवस्थेतली प्रोटीनची गरज पूर्ण होते म्हणून. पण वाटलं प्रितीच्या अनन्यभावात डूबून पतंग दिपज्योतीवर झडप घालुन आलिंगन देतोच ना. ह्या सगळ्या राण्या स्वार्थी असतात मी स्टेलाला डीवचून पहिलं तसा तीन राणी मधमाशीच्या मैथुनाचा पाढाच माझ्यापुढे वाचला. मैथुनानंतर नरदेहाला गीळंकृत करणाऱ्या नाकतोडाचं चित्रण माझ्यापुढे करताच मी अंगभर शहारलो. निसर्गानं खरं तर मादीला, स्त्रीशक्तिला उपजतचं भक्कमपणा दिलाय. आधुनिक काळात भौतिकेच्या उतरंडीत प्रितीचे मणी शोधतांना सारेच भयव्याकुळ कातर होताच. चिखलामची संरक्षण कुटी नजरेच्या टप्प्यात येताच मनाच्या सर्द गाभाऱ्यात एक ओळ फुलून आली.

'स्तोत्रात इंद्रिये अवधी'



● डॉ. एकनाथ तट्टे

मो. ९४०४३३७९४४

# शिक्षण उपसंचालक अमरावती कार्यालयासमोर विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे धरणे आंदोलन संपन्न

### श्रीमती निलिमा टाके यांनी स्वीकारले निवेदन



**अमरावती दि.१४:** शिक्षण क्षेत्रातील प्रलंबित मागण्या व समस्यांसाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने शुक्रवार दिनांक ११ जुलै २०२५ रोजी दुपारी ३ ते ५ या वेळेत म. रा.माध्यमिक शिक्षक महामंडळ मुंबई चे सरचिटणीस माजी आमदार मा. श्री व्ही.यू. डायगव्हाणे यांचे मार्गदर्शनात तसेच संघटनेचे सरकार्यवाह आमदार मा.श्री सुधाकरराव अडबाले व प्रांतीय अध्यक्ष मा.श्री अरविंद देशमुख यांचे नेतृत्वात संपूर्ण विदर्भामध्ये धरणे /निदर्शने आंदोलन करण्यात आले. अमरावती येथील आंदोलनाचे नेतृत्व प्रांतीय उपाध्यक्ष जयदीप सोनखासकर यांनी केले. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, वि जा भ ज आश्रम शाळा,आदिवासी आश्रम शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अनेक मागण्या/ समस्या शासनाकडे बऱ्याच कालावधीपासून प्रलंबित आहे त्यामध्ये जुनी पेन्शन योजना मिळणे, नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या परंतु टप्प्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांना पूर्वीप्रमाणे जुनी पेन्शन योजना मिळणे, १५ मार्च २०२४ चा संच मान्यतेचा निर्णय रद्द करून पूर्वीप्रमाणे संच मान्यता निर्गमित करणे,शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे शिक्षकांना १०/ २०/ ३० कालबद्ध पदोन्नती मिळणे, १४ नोव्हेंबर २०२४ च्या शासन निर्णयाप्रमाणे टप्पा वाढ देणे, नगरपरिषद मधील कर्मचाऱ्यांना कोणतीही पेन्शन योजना नसल्यामुळे त्यांना त्याकरिता त्वरित आदेश काढणे, शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार थांबवणे या व इतर अनेक महत्वपूर्ण मागण्यांचा शासन गांभीर्याने विचार करायला तयार नाही या मागण्या मान्य करून घेण्यासाठी शिक्षण उपसंचालक अमरावती यांचे कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

शिक्षण उप संचालक श्रीमती निलिमा टाके मॅडम यांना ज्वलंत समस्यांबाबत ३५ मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी माजी प्रांतीय अध्यक्ष एस.जी. बरडे, जिल्हाध्यक्ष महानगर अतुल देशमुख, जिल्हा कार्यवाह महानगर अरविंद चौधरी, जिल्हाध्यक्ष ग्रामीण दशरथ रसे, जिल्हा कार्यवाह ग्रामीण आशिष इंगळे, माजी विभागीय कार्यवाह बाबाराव कडू, उपाध्यक्ष नीळकंठ गणवीर, गजानन पोटदुखे, प्रताप काळे, जयकृष्ण जामनेकर , आर. पी. कपिले, तेजेंद्रसिंग चव्हाण, बी. एल. वानखेडे, पांडुरंग चुळे, प्रा. डी. के.देशमुख , बी. आर. मोहोड, मंगेश गोरडे, अमोल इंगळे,अनिल मावसकर , प्रा. यू. एम. घारड, श्रीमती रेश्मा कपूर, नेहा बजाज, संगिता कंटाले, प्रणिता शेळके आदी उपस्थित होते.

# किसान ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष प्रकाशभाऊ पोहरे यांची सदिच्छा भेट

**अमरावती दि.१४ :** दैनिक देशोन्नतीचे मुख्य संपादक तथा किसान ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष प्रकाशभाऊ पोहरे यांनी क्रांती ज्योती ब्रिगेड सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. नंदेश अंबाडकर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. भेटी दरम्यान शेतकरी,कष्टकरी यांच्या विविध समस्या बाबत राष्ट्रीय अधिवेशन घेणे, युवा शेतकरी यांचे करिता कार्यशाळा आयोजित करणे आदी मुद्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी किसान ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष दिवाकर गावंडे, कार्याध्यक्ष शरद वानखेडे, कोषाध्यक्ष बी. डी. पाटील, क्रांती ज्योती ब्रिगेड कृषक आघाडीचे जिल्हाध्यक्ष ॲड. प्रभाकरराव



वानखडे उपस्थित होते.

# आरोग्य विम्यावर टॅक्स सवलत कलम ८०D चा योग्य उपयोग कसा कराल

आजच्या वाढत्या महागाईच्या युगात केवळ उत्पन्न वाढवणं पुरेसं नाही, तर त्याचं शहाणपणानं व्यवस्थापन करणंही तेवढंच महत्त्वाचं आहे. यामध्ये आरोग्य विम्याची भूमिका केवळ आपत्कालीन खर्चासाठी नसून, कर बचतीच्या दृष्टीनेही खूप उपयोगी ठरते. आयकर कायद्यातील कलम ८०D हे आपणास आरोग्य विम्यावरील प्रीमियमवर सवलत देणारं एक महत्त्वाचं साधन आहे.

कलम ८०D अंतर्गत, आपण आपल्या आणि कुटुंबाच्या आरोग्य विम्यासाठी भरलेल्या प्रीमियमवर रु. २५,००० पर्यंत करसवलत मिळवू शकतो. जर आपण वरिष्ठ नागरिकांच्या (६० वर्षांवरील पालक) विम्यासाठी प्रीमियम भरत असाल, तर ही मर्यादा रु. ५०,००० पर्यंत वाढते. म्हणजेच, जर तुम्ही स्वतःच्या कुटुंबासाठी आणि तुमच्या पालकांसाठी दोन्हींसाठी प्रीमियम भरत असाल, तर तुम्हाला एकूण रु. ७५,००० पर्यंतची टॅक्स सवलत मिळू शकते. याशिवाय, जर दोन्ही - स्वतः व कुटुंब (ज्यापैकी कोणीही ६० वर्षांच्या वर नाही) आणि दोघेही पालक वयोवृद्ध असतील, तर ही सवलत एकूण रु. २५,००० + ५०,००० = रु. ७५,००० इतकी होते. पण जर तुम्ही आणि तुमचे पालक, दोघेही वरिष्ठ नागरिक असाल, तर एकूण सवलत रु. ५०,००० + ५०,००० = रु. १,००,००० पर्यंत मिळू शकते.

हे लक्षात घ्या की ही सवलत फक्त आरोग्य विम्यासाठी भरलेल्या प्रीमियमवर मिळते, आणि रोख रकमेने भरलेली नाही, तर बँक किंवा डिजिटल माध्यमातून भरलेली रक्कमच ग्राह्य धरली जाते. आपल्यापैकी अनेकजण वर्षअखेरीस Tax बचतीसाठी घाईगडबडीत गुंतवणूक करतात, पण आरोग्य विमा घेताना त्याचे दीर्घकालीन फायदे लक्षात घेतले पाहिजेत. यामुळे तुम्हाला कर वाचतोच, शिवाय कुटुंबासाठी हॉस्पिटलायझेशन खर्चावर सुरक्षा कवच तयार होतं - म्हणजेच एक गुंतवणूक, दुहेरी फायदा.

आरोग्य विमा घेतल्याने केवळ तुमच्या आरोग्याचं नव्हे, तर कर वाचवण्याचंही संरक्षण मिळतं. त्यामुळे योग्य वेळी, योग्य प्रीमियमसह, योग्य आरोग्य विमा घेऊन कलम ८०D चा पूर्ण लाभ घ्या - आणि तुमचं आर्थिक आरोग्य मजबूत करा!

● रोहित नवले

मो. ७३८७१४०९३१

# श्री गणेशदास राठी विद्यालयात गुरुपौर्णिमा उत्साहात संपन्न



**अमरावती दि. १४:** श्री गणेशदास राठी छात्रालय समिती द्वारा संचालित श्री गणेशदास राठी विद्यालयात १० जुलै गुरुवार रोजी गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली .या कार्यक्रमाचे अध्यक्ष एमसीव्हीसी विभाग प्रमुख श्रीयुत उमेश नावंदर सर , तसेच प्रमुख अतिथी म्हणून शाळेचे पर्यवेक्षक शैलेश सुताणे यांनी स्थान भूषविले. कार्यक्रमाची सुरुवात 'गुरुने दिला ज्ञानरूपी वसा आम्ही चालवु हा पुढे वारसा' या प्रार्थनेनी करण्यात आली. सरस्वती पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. उमेश नावंदर यांचे स्वागत वर्ग १० च्या वर्ग शिक्षिका सौ वृंदा मराठे यांनी पुष्पगुच्छ देऊन केले. शाळेचे मुख्याध्यापक श्री नवनीत भट्टड यांचे स्वागत जयश्री ढोकेनी केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पर्यवेक्षक शैलेश सुताणे यांचे स्वागत गौरी कोल्हे या विद्यार्थिनींनी केले. वर्ग १० ब चा विद्यार्थी सुजल वनवे यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व विशद केले तसेच गुरु शिष्य परंपरेतील आरुणी ची गुरुभक्ती ही कथेद्वारे कु. आस्था दारोकर हिने सांगितली. तर विराज देशमुख यांनी गुरुचे महत्व सांगणारी एक कविता सादर केली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्रीयुक्त शैलेश सुताणे यांनी गुरूपौर्णिमे विषयी मुलांना मार्गदर्शन केले त्यानंतर उमेश नावंदर यांनी गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा देऊन गुरुची महती सांगितली. नवनीत भट्टड यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन वर्ग १० ब ची विद्यार्थिनी कुमारी अंकिता कोहळे हिने केले तर आभार प्रथमेश बर्वे यांनी व्यक्त केले व राष्ट्रगीतानी कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# विदर्भ पाणी परिषदमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार

**अमरावती दि.१४ :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर; राष्ट्रीय सेवा योजना आणि जनकल्याणकारी समिती यांच्या संयुक्त विद्यमाने काही दिवसापूर्वी नागपूर येथे विदर्भस्तरीय पाणी परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित आयोजित विविध स्पर्धांमध्ये विदर्भातील बहुसंख्य रा.से.यो. युनिट सहभागी झालेले होते.



सदर परिषदेत श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित श्री शिवाजी कृषी महाविद्यालय, अमरावती येथील १७ राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी कार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक पाडेकर यांच्या मार्गदर्शनात सहभाग नोंदवून विविध स्पर्धेमध्ये प्राविण्य मिळवले. ज्यामध्ये रील मेकिंग स्पर्धेत रौनक हंडे, स्नेहल गीते, तनवी मानकर, ओमकार कायंदे, रोशनी सातपुते, रेणुका वानखडे, विनय मेश्राम, संस्कृती लोहंबरे, श्रेया उंबरे, ईश्वरी डवरे, कीर्ती लोणकर, साक्षी शहाणे, सिद्धेश कुकडे, सौरव वैराळे, अनुष्का कांबळे, वैष्णवी जायभाये, अथर्व काळमेघ यांनी सहभाग घेऊन उत्तेजनार्थ प्रथम पुरस्कार मिळवला.

पोस्टर मेकिंग स्पर्धेत रेणुका वानखेडे हिने उत्तेजनार्थ प्रथम क्रमांक पटकावला तसेच मॉडेल मेकिंग स्पर्धेत श्रेया उंबरे, ईश्वरी डवरे, साक्षी शहाणे व रेणुका वानखडे यांनी तृतीय क्रमांक मिळवला. सहभागी सर्व स्पर्धकांचे व विद्यार्थ्यांच्या कलागुणांना चालना देऊन त्यांच्याकडून पूर्वतयारी करून घेणारे रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. दीपक पाडेकर यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. समीर लांडे यांनी सत्कार केला.विजेत्या विद्यार्थी -विद्यार्थिनींचे श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. हर्षवर्धन देशमुख व कार्यकारिणी सदस्य तसेच डॉ. पं.दे. कृ. वि., अकोला विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. संदीप हाडोळे व सौ.मंजुषा देशमुख यांनी कौतुक करून पुढील वाटचालीस सुभेच्छ दिल्या.

सत्कार कार्यक्रमास डॉ. दीपक पाडेकर, सहकार्यक्रम अधिकारी डॉ.मीना कोचे. डॉ. नंदकिशोर खंडारे, डॉ. योगेश साबळे, प्रा. मनोज नवरे, डॉ. विक्रांत गौतम, डॉ. प्रशांत पेशटीवार, प्रा. वीरेंद्र डेरे, डॉ सुनील इंगळे व डॉ. पी. व्ही.साबळे उपस्थित होते.

# डॉ.मेरीया मॉन्टेसरी कॉन्व्हेंट व श्री श्रद्धानंद इंग्रजी प्राथमिक व माध्यमिक शाळेमध्ये गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम संपन्न

**अमरावती दि. १४:** श्री श्रद्धानंद सोसायटी द्वारा संचालित डॉ मेरीया मॉन्टेसरी कॉन्व्हेंट व श्री श्रद्धानंद इंग्रजी प्राथमिक व माध्यमिक शाळा, रामपुरी कॅम्प, अमरावती येथे दिनांक ११/०७/२०२५ शुक्रवार रोजी गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमाला उपस्थित शाळेचे संचालक प्रा. अरुण धनवटे, शाळेच्या मुख्याध्यापिका भारती बोके व कॉन्व्हेंटच्या मुख्याध्यापिका मालती ठाकरे उपस्थित होते. या कार्यक्रमाला सर्व शिक्षक तसेच वर्ग पाचवी ते दहावीपर्यंत सर्व विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमेबद्दल कौतुकास्पद भाषणे दिली. कॉन्व्हेंटच्या शिक्षिका शिल्पा बेलसरे व शाळेच्या शिक्षिका वंदना डोळे व रुचिका चौधरी यांनी भाषण केले. तसेच कॉन्व्हेंटच्या मुख्याध्यापिका मालती ठाकरे यांनी महर्षी वेद व्यास यांची जयंती म्हणून आजचा दिवस प्रसिद्ध आहे असे सांगितले. भारती बोके यांनी आपल्या मनोगतात गुरु हा शब्द 'गु' म्हणजे अंधार व 'रु' म्हणजे प्रकाश, गुरूंचं कार्य अज्ञान दूर करून ज्ञानाचा उजेड देणं असं सांगून सर्व शिक्षकांचा गौरव केला. तसेच प्रा. अरुण धनवटे यांनी आपल्या भाषणातून 'गुरुविना ज्ञान नाही आणि ज्ञानाविना यश नाही' असे सांगून आपल्या अनुभवातून गुरूंचे स्थान उचलून धरलं व गुरु हा आपल्या जीवनाचा दीपस्तंभ असतो, त्याच्या मार्गदर्शनाशिवाय जीवन दिशा हरवते असे सांगितले.



कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका निता ठाकरे यांनी केले असून आभार प्रदर्शन स्वाती पाचकवडे यांनी केले. अशा प्रकारे हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.




## ५५९) सर्ग ७ श्लोक ६९

**हृष्टापि सा ह्रिविजितां न साक्षाद्वाग्भिः सखीनां प्रियमभ्यनन्दत्।।**
**स्थली इवाम्भःपृषताभिवृष्टा मयूरकेकाभिरिवाभ्रवृन्दम् ।। ६९।।**

**प्रसन्न होऊन देखील लज्जेने जिंकलेली ( ती इंदुमती) प्रत्यक्ष नव्हे तर मैत्रिणींच्या शब्दांनी प्रियाचे अभिनंदन करती झाली. जशी मोरांच्या केकावलीने मेघाच्या द्वारे नवीन जलवर्षावाने अभिवृष्ट झाली जमीन.**

**ग्रीष्मातील दाहक उष्णतेमुळे जमीन संतप्त होते. ज्यावेळी सर्वप्रथम मेघ वर्षाव करतो त्यावेळी ती दाहमुक्त आणि शांत होते. अत्यंत प्रसन्न होते. मात्र तिला आपल्या भावना शब्दात व्यक्त करता येत नाहीत. अशावेळी त्याच वर्षावाने आनंदीत झालेल्या मयुरांच्या केका अर्थात उच्चारवातील आवाजाने जणू काही ती आपली भावना त्यांच्याद्वारे व्यक्त करते. महाकवी म्हणतात इंदुमतीची अवस्था तशीच झाली.**

**हृष्टा म्हणजे आनंदी, प्रसन्न असून सुद्धा, ह्रि म्हणजे लज्जेने विजीत म्हणजे जिंकलेली अर्थात लज्जित झालेली ती साक्षात वाग्भिः म्हणजे प्रत्यक्ष स्वतःच्या वचनांनी बोलू शकली नाही. तिने आपल्या प्रिय म्हणजे प्रियकराचे अभिनंदन सखींच्या वाणीनेच केले. खरे तर त्या देखील सर्व आनंदित झाल्या होत्या. त्या अजाचा जयजयकार करीत होत्या. पण शब्द त्यांचे असले तरी जणू काही भावना इंदुमतीची होती.**

**ज्याप्रमाणे आनंद नूतन करताना मोर केका करतात. पण जणू काही त्या शब्दातून भूमीची भावना प्रगट होते.**

# आमचे दादा

तुमचा सहवास शांत, पवित्र आणि प्रसन्नता वाढविणारा आत्ममग्न योग्यासारखा, परमात्म्याला आळविणारा पाहीला की तुमच्याकडे अश्या देवचाफ्याची आठवण होते. तो जसा पानगळू होता होता शुभ्र फुलांनी बहरतो अलौकीक सुगंधाने अवध विश्व व्यापून टाकतो तुम्हीही असच आपुलकीने - आमच भावविश्व व्यापल आहे. तुमच्या आदर्शाच रोपट आमच्या मनी रुजल आहे. कैलासवासी आदरणीय अशोकराव रामबंदजी निर्मळ आम्हा सर्वांचे आवडते, मार्गदर्शक 'दादा'. दादांचा जन्म १९ जुलै १९४९ या रोजी वलगांव येथील प्रतिष्ठीत निर्मळ कुटुंबात कै. रामचंद्रजी व्यंकटरावजी निर्मळ (आमचे अण्णा), माजी पोलीस पाटील, वलगांव, ता. जि. अमरावती ह्यांचे घरी झाला. भावांमध्ये दादा जेष्ठ त्यानंतर दिनकर (मामा साहेब), महेश्वर (नाना साहेब) डॉ. सोमेश्वर, रामेश्वर अशी चार भावंड, त्यांना परिसरातील शेतकरी, शिक्षीत व प्रतिष्ठीत कुटूबांचा वारसा लाभला होतो. त्यामुळे पदवी पर्यंतच्या शिक्षणा नंतर वडिलोपार्जीत शेतीचा व्यवसाय करण्याचा निर्णय दादांनी घेतला. आधुनीक शेती करण्याकरीता त्यांनी ट्रॅक्टर घेतला व लवकरच एक निपुण, 'आदर्श' शेतकरी म्हणून नावलौकीक मिळवला



ह्याच प्रवासात राजकीय क्षेत्रात सामील होउन वयाच्या २४ व्या वर्षीच ते वलगांव ग्रामपंचायतचे संरपंच झाले. यानंतर १९७८ ला कुंडसर्जापूर येथील प्रतिष्ठीत शेतकरी विश्वासरावजी कुकडे त्यांची जेष्ठ कन्या सुरेखा ह्यांचेशी विवाहबद्ध झाले. संरपंच पदावर असतांना वलगावच्या पंचक्रोषीतील मोठ्या गावांची धुरा पारदर्शीक पणे सांभाळली. दादानी स्वकष्टानी घरची सपूर्णशेती सांभाळून उत्कृष्ट पिक काढले, त्यातुनच चार भावांचे शिक्षण, विवाह, इतर जबाबदाऱ्या योग्य रितीने हाताळल्या. तसेच सहकार क्षेत्रात प्रवेश करून मित्र मंडळी सोबत सेवा सहकारी सोसायटी, वलगांवचे संचालक पद भुषवले. त्यांनतर शेती व्यावसाईकांना अधिक मदत व्हावी म्हणून, आदर्श नागरी पतसंस्था वलगाव संस्थेची स्थापना केली व सतत १२ वर्षे संस्थापक अध्यक्ष या पदाची यशस्वीपणे धूरा सांभाळली. ठेवी व कर्जे त्यांच्या माध्यमातून करोडो रुपयाचा व्यवहार चोखपणे सांभाळला. गरजू शेतकऱ्यांना वेळेवर कर्जे देउन त्यांची आर्थीक मदत केली. तसेच कर्ज वसुलीचे कार्य चोखपणे बजावून पतसंस्थेचे हित सुद्धा जोपासले. यापुढेही अध्यक्षपदावर कार्यरत राहणे शक्य असतांनाही पदाची लालसा न ठेवता अध्यक्षपदाची धुरा यशस्वी रित्या आपल्या सहकाऱ्यास सोपवली.

मागीलवर्षीच आम्ही सर्व कुटूबीयांनी दादांचा अमृत महोत्सव (७५ वा वाढदिवस) अतिशय आनंदात साजरा केला. त्याप्रसंगी त्यांची मित्र मंडळी प्रामुख्याने हजर होती व त्यांनी दादाविषयीचे आपले मनोगत व्यक्त केले. त्या महोत्सवात पर्यावरणाचे भान ठेवून आम्ही दादांच्या साक्षीने ७५ वृक्षांचे रोपण केले. मागील सहा महीन्यात त्यांची प्रकृती बरीच खालावली, तेव्हा सर्व कुटूंबियांनी, प्रामुख्याने त्यांच्या पत्नी सौ. सुरेखालाईनी न डगमगता त्यांची अथक सेवा केली. त्यांची दोन्ही मुलं स्वरूप व स्वस्तिक खूप प्रेमळ काळजी घेणारी असल्याने त्यांनीसुद्धा खूप सेवा केली. पत्नी, सुना, मुल, आणि सर्व भाऊ, व कुट्बीयांची एवढी साथ पाहुन त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसले. शेवटी सर्व प्रयत्न करुनही विधीलिखीत होते ते झाले. आम्हा सर्वांना पोरके करुन, असंख्य आठवणी मागे सोडून वयाच्या ७६ व्या वर्षीय त्यांनी इहलोकाची यात्रा संपवली.त्यांचा उपदेश व सेवाभाव आम्हाला आयुष्यभर प्रेरणा देत राहील. त्यांच्या चांगल्या गोष्टी आचरणात आणण्याचा प्रयास करु, हीच त्यांना योग्य श्रध्दांजली होईल.

● मामासाहेब निर्मळ व निर्मल परिवार

वलगांव

# डिजिटल डिटॉक्स महोत्सव २०२५ : विद्यार्थ्यांना सजग तंत्रज्ञानाचा मंत्र देणारी राष्ट्रीय स्पर्धा

अमरावती दि. १४ : देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल सवयींबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि तंत्रज्ञानाचा सकारात्मक व विवेकी वापर प्रोत्साहित करण्यासाठी चेतना एम्पॉवरमेंट फाउंडेशन आणि हेमा फाउंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने डिजिटल डिटॉक्स महोत्सव - राष्ट्रीय स्तरावरील डिजिटल वेलनेस स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे.

या महत्त्वपूर्ण उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट विद्यार्थ्यांना ऑनलाईन आणि ऑफलाईन आयुष्यातील समतोल साधण्याची जाणीव करून देणे, स्क्रीनचा विवेकी वापर शिकवणे, मानसिक आरोग्य जपणे आणि डिजिटल माध्यमांचा सदुपयोग करण्यास प्रेरित करणे हे आहे. हा उपक्रम राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (छएझ २०२०) च्या कलम २३.७ व २४.४ नुसार डिजिटल साक्षरता आणि जबाबदार तंत्रज्ञान वापराला बळकटी देतो.

या स्पर्धेच्या पहिल्या फेरीसाठी (डज्ञळीं झश्रू) नाट्य सादरीकरण आणि (झ्रोींशी झीशीशपींरींळेप) पोस्टर सादरीकरणाचे व्हिडिओ जमा करण्याची अंतिम तारीख १५ ऑगस्ट २०२५ आहे. पहिल्या फेरीतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना १४ सप्टेंबर २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या दुसऱ्या फेरीत (डशलेपव ठेीपव) सहभागी होता येईल. तसेच अंतिम निवड झालेल्या टीमना त्याच दिवशी होणाऱ्या भव्य पुरस्कार वितरण समारंभात थेट मंचावर आपली सादरीकरणे सादर करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. अंतिम फेरीत देशभरातील शाळा आणि महाविद्यालयांमधून निवडक विद्यार्थी आपल्या कल्पक नाट्य व प्रभावी पोस्टर सादरीकरणांद्वारे मोबाईल स्क्रीन वापराचे योग्य टूल्स आणि तंत्रज्ञान तसेच डिजिटल तंदुरुस्तीचे महत्त्व लोकांसमोर सुस्पष्ट आणि प्रेरणादायी पद्धतीने मांडणार आहेत. या स्पर्धेचे विषय स्क्रीन टाइम ने छीना बचपन, एक दिन बिना फोन, डिजिटल दुनिया में रिश्ते, आणि मोबाइल मेरे हाथ में है... या मैं उसके? हे आहेत.

स्पर्धेत ३री ते ६वी, ७वी ते १०वी आणि ११वी ते पदवी या तीन वयोगटातील विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. प्रत्येक गटासाठी नाट्य सादरीकरण (३ ते ५ विद्यार्थी) आणि पोस्टर सादरीकरण (२ ते ३ विद्यार्थी) या विभागांमध्ये सहभागाची संधी उपलब्ध आहे. प्रत्येक शाळा किंवा संस्थेला त्यांच्या गटातून फक्त एकच प्रवेश देण्याची परवानगी असून, नोंदणी करताना संस्थेचे परवानगीपत्र आवश्यक आहे. अंतिम फेरीत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रवास भत्ता, निवास आणि भोजनाची मोफत सोय आयोजकांकडून करण्यात आली आहे, जेणेकरून कोणतीही आर्थिक अडचण या संधीसमोर अडथळा ठरू नये.

स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक रोख पारितोषिकांनी गौरविण्यात येणार आहे. प्रत्येक गटातील प्रथम क्रमांकासाठी ५१,००० रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ३१,००० रुपये, तृतीय क्रमांकासाठी २१,००० रुपये, तसेच उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात येणार आहेत.

२०१३ पासून चेतना एम्पॉवरमेंट फाउंडेशन देशभरातील विद्यार्थ्यांच्या समग्र विकासासाठी सातत्याने कार्यरत आहे. मानसिक आरोग्य, मूल्यशिक्षण, डिजिटल वेलनेस आणि युवक सक्षमीकरणाच्या माध्यमातून संस्थेने हजारो विद्यार्थ्यांमध्ये आनंददायी व समतोल जीवनशैली रुजवली आहे.

या अद्वितीय स्पर्धेत सहभागी होण्यासाठी २५ जुलै २०२५ पर्यंत ऑनलाईन नोंदणी अनिवार्य आहे. यासाठी ु.लहशींरपर.पसे या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा अधिक माहितीसाठी ८८०५३५८६५२ / ६३७०४३८३५३ या क्रमांकांवर संपर्क साधावा. आयोजकांनी सर्व शाळा, महाविद्यालये, शिक्षक आणि विद्यार्थ्यांना या प्रेरणादायी उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. चला, एकत्र येऊन सजग डिजिटल संस्कृती घडवूया आणि तंत्रज्ञानाचा विवेकी उपयोग हीच खरी शक्ती असल्याचा संदेश देशभर पसरवूया!

# वंदे मातरम योग प्रसारक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची योगासन व सायकलिंग क्षेत्रात भरारी



अमरावती दि. १४ : मानव सेवा पेरेमेडिकल कॉलेज अंजनगाव सुर्जी यांच्या अंतर्गत राज्यस्तरीय योगासन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेमध्ये मंडळाचे अध्यक्ष श्री राजू देशमुख यांनी ५५ वर्षावरील वयोगटात सुवर्णपदक प्राप्त केले. उपाध्यक्षा सौ जयमाला राजू देशमुख यांनी ४५ ते ५५ या गटात कांस्यपदक प्राप्त केले. सहसचिव श्री निलेश राजु देशमुख यांनी १८ ते ३५ या गटात सुवर्णपदक प्राप्त केले तसेच सचिव श्री रंजीत राजू देशमुख यांनी रौप्य पदक प्राप्त केले. मंडळातर्फे सण १९९८ पासून योगासन व सायकलचा प्रचार व प्रसार निशुल्क करण्यात येत असून दिनांक १८ ते २१ जून दरम्यान अंबादेवी अमरावती ते पंढरपूर अशी सायकल वारी मंडळाचे उपाध्यक्ष सौ जयमाला राजू देशमुख यांनी ६०० किमी चा प्रवास चार दिवसात पूर्ण केला व दिनांक २१ जून योग दिन निमित्त पंढरपूर रोड येरमाळा येथे महिला व पुरुष सर्व सायकल पटूंना योगासनाचे धडे दिले तसेच अध्यक्ष श्री राजू देशमुख यांनी अमरावती ते अयोध्या अमरावती ते गोवा असा सायकल प्रवास ९५० किमी चा प्रवास आठ दिवसात पूर्ण केला व २१०० किमी सायकलचा प्रवास वीस दिवसात पूर्ण केला तसेच विविध सायकल स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन प्राविण्य प्राप्त करून विश्वविजय केला आहे.


# डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातर्फे मधुबन वृद्धाश्रमास मदत



अमरावती दि. १४ : श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती द्वारा संचालित उत्तम नगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातर्फे आई डॉ. कमलताई रा. गवई यांच्या वाढदिवसानिमित्त व स्मृतिशेष श्री. दादासाहेब गवई यांच्या स्मृतिदिनानिमित्त सामाजिक पंधरवाडा उपक्रमांतर्गत कोंडेश्वर रोडवरील मधुबन वृद्धाश्रम येथे वृद्धांना बेडशीटचे वाटप करण्यात आले. संस्थेचे सचिव तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कमलाकर पायस यांच्या हस्ते व त्यांच्या मार्गदर्शनात सदर कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. पी. आर. एस. राव यांनी कार्यक्रमामागची पार्श्वभूमी विषद केली. तसेच या उपक्रमासंबंधी वृद्धांना माहिती दिली. प्राचार्य डॉ. कमलाकर पायस यांनी वृद्धाश्रमाशी संबंधित विविध समस्या जाणून घेतल्या, तसेच वृद्धांची आस्थेने विचारपूस केली. वृद्धावस्था आणि त्याच्याशी निगडित निर्माण होणारे वृद्धाश्रम ही आजच्या काळाची समस्या बनली असून आपल्या पाल्यांना चांगले संस्कार देऊन वृद्धाश्रमाच्या समस्येपासून समाजाला परावृत्त करता येईल असे मत यावेळी त्यांनी मांडले. प्रा. राव यांनी याप्रसंगी मधुबन खुशबू देता है हे गाणे म्हणून त्यातून मनुष्याने मानवधर्माचे पालन करणे आवश्यक आहे. त्यांनी समाजाची व इतरांची सेवा करत आपले कर्तव्य करावे असा संदेश दिला. समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रदीप अंबोरे यांनी मधुबन वृद्धाश्रमाचे व्यवस्थापक श्री. सावरकर आणि सर्व वृद्धांचे आभार मानले. याप्रसंगी डॉ. तंत्रपाळे, डॉ. सुनील कुमार, डॉ. शुद्धधन कांबळे, प्रा. डॉ. राजेश देशमुख, डॉ. प्रकाश म्हस्के, डॉ. प्रशांत खेडकर, डॉ. एस.बी. सांगोले, प्रा. दिपाली पडोळे, प्रा. प्रकाश बोरकर, प्रा. अनिल घोटे, प्रा. प्रवीण विघाते, प्रा. शंकर लाहोटी, प्रा. राजेश बोराडे, प्रा. हर्षवर्धन देशमुख, डॉ. ज्ञानेश्वर भगत, डॉ. अनिल पाचकुडके, प्रा. रुद्रा चोपकर, प्रा. नंदू अढाऊ, प्रा. महेश बनसोड, प्रा. मेघा चिमणकर, प्रा. स्वप्निल मानकर, प्रा. दिपाली गवई, श्री. विजय इंगळे, श्री. राजेश नाखले, श्री. किशोर बिजवे, प्रफुल धार्मिक, सुशांत नुनाते, कु. भाग्यश्री वानखडे, सागर शिरसाट, रोशन वैद्य व समस्त विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# अभिनंदन पेंढारी यांची श्री दिगंबर जैन महासमितीच्या विदर्भ प्रमुख पदी नियुक्ती

अमरावती दि. १४ : श्री दिगंबर जैन महासमिती ही जैन समाजातील देशभरात काम करणारी समजसेवी संस्था आहे या समिती अंतर्गत उच्च शिक्षण घेणाऱ्या समाजातील विध्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, सरकारच्या अल्पसंख्यांक योजनेचा लाभ गोरगरीबांना मिळवुन देण्याचा प्रयत्न करणे व ही योजना सर्वांपर्यन्त पोहचविणे, महिलांचा सर्वांगिन विकास करणे, जैन धर्माचा प्रसार व प्रचार करणे, समाजाच्या एक्यासाठी पर्यत्न करणे, देशहितासाठी काम करणे, सामाजिक सेवा उपक्रम चाल विणे, वृक्षारोपण, नेत्रदान, रक्तदान, पशुपक्षी रक्षा अभियान, लहान मुंलांसाठी संस्कार शिबीर आदी मानवतेचे कार्य निरंतर सुरु आहे. या संस्थेची नुकतीच नागठाणा या अतिशयक्षेत्री श्री १०८ आचार्य सुवीरसागरजी महाराज याच्या संनिध्यात राज्यस्तरीय सभा पार पडली या सभेत अमरावती येथील सामाजिक कार्यकर्ते तथा जैन समाजाच्या विविध संघटनाचे पदाधिकारी अभिनंदन पेंढारी यांची विदर्भ विभाग प्रमुख म्हणुन निवड झाली त्यांना श्री १०८ आचार्य



सुवीरसागरजी महाराजांचा आशीर्वाद दिला व दिगंबर जैन म्हसमितीचे महाराष्ट्र अध्यक्ष सुनील जैन पेंढारी तथा महामंत्री प्रशांत मानेकर यांनी नियुक्तीपत्र बहाल केले. व सर्व पदाधिकारी यांना शपथ दिली.

अभिनंदन पेंढारी हे गेले ४०वर्षांपासून जैन समाजात तसेच सामाजिक, सास्कृतिक राजकीय क्षेत्रात कार्य करीत आहे, अनेक संस्थामधुन त्यांनी विविध पदावर काम केले आहे व सर्वच क्षेत्रात जनसंपर्क मोठया प्रमाणावर आहे. या बाबी लक्षात घेत संस्थेने ही जबाबदारी विश्वासाने दिली आहे ते हे कार्य निश्चितच चांगल्या पद्धतीने करीत या पदाला न्याय देतील असा विश्वास आहे. त्याच्या नियुक्ती बद्दल सर्वच स्तरावरून अभिनंदन करण्यात येत आहे. या निमित्य श्री दिगंबर जैन महासमिती तर्फे त्यांना शुभेच्छा

# ज्येष्ठ सहकार नेते अशोकराव निर्मळ यांना भावपूर्ण श्रद्धांजली

वलगांव जहांगीर येथील सदन अश्या निर्मळ कुटुंबामध्ये श्री अशोक रामचंद्रजी निर्मळ उर्फ बंडू पाटील यांचा जन्म झाला स्व रामचंद्रजी व्यकंटरावजी निर्मळ व स्व रमाबाई यांचे ते ज्येष्ठ चिरंजीव होते लहानपणापासूनच त्यांना शेतीची आवड असल्यामुळे त्यांच्या जीवन कार्यकाळात प्रयोगशील शेतकरी म्हणून त्यांना नावलौकिक लाभला होता त्यांचे मोठे काका डॉ स्व भाऊरावजी व स्व बापूरावजी तसेच स्व शंकररावजी यांच्या सहवासात त्यांची जडणघडण होत गेली म्हणूनच त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर थोरा मोठ्यांचा संस्काराचा पकडा ठळकपणे कायम दिसून येत होता तसे पाहिले तर पूर्वीपासूनच निर्मळ परिवार हा शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या प्रगत असल्यामुळे या संस्काराचा वारसा त्यांनी जीवनाच्या शेवटच्या क्षणा पर्यंत सक्षमपणे जपला चौदा भावंडाच्या या मोठ्या परिवारामध्ये एकजुटी सोबतच सहकार्याची भूमिका त्यांनी शेवटपर्यंत बजावली परिवारासोबतच सामाजिकतेचे भान राखत वलगांव तील गावकऱ्यांना ते सदैव आपले कुटुंबच मानत असत सरपंच पदाच्या आपल्या कार्यकाळात त्यांनी वलगांवासाठी अनेक विधायक कार्य केले जिल्हा परिषद अध्यक्ष स्व बबनरावजी निर्मळ यांचे ते खंदे समर्थक होते वलगांव सेवा सहकारी सोसायटीचे ते अनेक वर्ष संचालक होते त्या माध्यमातून त्यांनी शेतकऱ्यांसाठी भरीव असे कार्य केले स्वर्गीय रावसाहेब मिलके यांचे ते शेवटपर्यंत सहकारी होते त्यांच्या सहकार्यातून त्यांनी अमरावती खरेदी विक्री शेतकरी सोसायटीचे सुद्धा संचालक पद भूषविले तसेच विदर्भ को-ऑपरेटिव्ह प्रिंटिंग प्रेसचे ते अनेक वर्ष उपाध्यक्ष सुद्धा होते शेतकरी व शेतमजुरांची आर्थिक अडचण लक्षात घेऊन त्यांनी वलगांव या ठिकाणी आदर्श नागरिक पतसंस्थेची स्थापना केली ते या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष होते समाजासोबतच



परिवाराच्या पाठीशी ते खंबीरपणे उभे होते त्यांचे मोलाचे असे मार्गदर्शन परिवारातील सदस्यांना सातत्याने लाभत होते आज त्यांचे लहान बंधू श्री मामासाहेब निर्मळ सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात कार्यरत असून डॉ सोमेश्वरराव निर्मळ हे डॉ पंजाबराव देशमुख हॉस्पिटल या ठिकाणी कार्यरत आहेत तर त्यांच्या सुनबाई डॉ प्रमिला सोमेश्वरराव निर्मळ यांनी वलगाव या ठिकाणी निर्मळ हॉस्पिटल माध्यमातून रुग्ण सेवेला वाहून घेतलेले आहे श्री नानासाहेब हे सेवा सहकारी सोसायटीचे संचालक असून श्री रामेश्वरराव हे मुंबई या ठिकाणी अभियंता तर ज्येष्ठ चिरंजीव श्री स्वरूप निर्मळ हे प्रगतिशील शेतकरी असून कनिष्ठ चिरंजीव श्री स्वस्तिक निर्मळ हे मुंबई या ठिकाणी कॉन्ट्रॅक्टर आहेत तर मुलगी राणी ही आपल्या घरी सुखी संपन्न आहे असा हसता खेळता परिवार सोडून तुम्ही अचानक कधी न येण्यासाठी निघून गेल्यामुळे आमच्या पाठीवर मायेचा व डोक्यावर आशीर्वादाचा हात आता कधीच अनुभवता येणार नाही काका तुम्ही आम्हा सर्वांना परिवाराला कायमचे पोरके करून अंतिम यात्रेसाठी निघून गेलात आमचे अश्रू आता कोण पुसणार !

आज आपल्या तेरवी निमित्त संपूर्ण निर्मळ परिवाराच्या व वलगावच्या वतीने आपणास भावपूर्ण श्रद्धांजली

● **डॉ. मंगेश सुरेशराव निर्मळ**
**वलगांव मो. ९८५०३ १३३९५**

# कुपोषणग्रस्त जिल्ह्यामध्ये वितरित होणाऱ्या पोषण आहाराची एफडीए मार्फत तपासणी करणार का?

## वाढत्या कुपोषणाच्या परिस्थितीवर आ.संजय खोडके यांनी अधिवेशनात मांडली लक्षवेधी सूचना

मुंबई दि. १४ : राज्यात कुपोषण निर्मूलनासाठी शासनाच्या वतीने अनेक योजना व उपाययोजना राबविल्या जात असतांना कुपोषणाची स्थिती मात्र जैसे-थेच आहे. राज्यातील १४ कुपोषणग्रस्त तालुक्यामध्ये अमरावती जिल्ह्यातील धारणी व चिखलदरा तालुक्याचा विचार केला तर राज्यातील १२ तालुक्यांच्या एकत्रित आकडेवारी पेक्षाहि दुप्पट कुपोषण वाढ हि अमरावती जिल्ह्यात झालेली दिसून येते. या भीषण परिस्थितीकडे आ. संजय खोडके यांनी महाराष्ट्र विधानपरिषदेतून शासनाचे लक्ष वेधले असून उपाययोजना करण्याची सूचना केली.

राज्यविधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये आज सोमवार दिनांक १४ जुलै २०२५ रोजी पीठासीन सभापती प्रा. राम शिंदे यांच्या सभागृहात सुरु असलेल्या कामकाजादरम्यान महिला व बाल विकासा संदर्भात सुरु असलेल्या लक्षवेधी चर्चेमध्ये आ.संजय खोडके यांनी अमरावती भागातील कुपोषणा च्या या मुद्यावर सभागृहाचे लक्ष वेधले. त्यांनी सांगितले कि, राज्यात कुपोषणाच्या बाबतीत शासनाचे प्रयत्न सुरु असून विविध योजनांच्या माध्यमातून उपाययोजना राबविल्या जात आहे. दरम्यानच्या काळात कुपोषणाच्या बाबतीत १४ समित्यांनी काम केले व सुधारणा करण्याचा प्रयत्न झाला ,मात्र कुपोषणाचीपरिस्थिती आजही जैसे-थेच असल्याचे निदर्शनास येते. शासनाच्या आकडेवारी नुसार कुपोषणाची तीव्रता कमी झाली असली तरी मातामृत्यू , बाल मृत्यू व



कुपोषणाच्या बाबतीत प्रश्न अजूनही कायम असल्याचे सांगून आ. संजय खोडके यांनी कुपोषणाच्या उपाययोजनासंदर्भात अनेक शंका-कुशंका व्यक्त केल्यात. प्रामुख्याने अमरावती जिल्ह्यातील धारणी व चिखलदरा तालुक्यात कुपोषण संदर्भात सभागृहाला अवगत करतांना त्यांनी कुपोषणग्रस्त भागातील अंगणवाडी असो अथवा आरोग्य केंद्रामध्ये जो पोषण आहार पोहोचविला जातो, तो नियमित व वेळेवर पोहोचवीण्यात येतो का ? तो पोषण आहार सकस ,चांगल्या पद्धतीचा व दर्जेदार असल्याची खात्री पटविण्यासाठी त्या आहाराची एफडीए मार्फत नियमित तपासणी अथवा चौकशी करण्यात आली का ? त्यावरूनच पोषण आहाराची गुणवत्ता कळणार असल्याचे सांगून आ. संजय खोडके यांनी प्रश्न उपस्थित केला.

यावर उत्तर देतांना राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री ना. अदितीताई तटकरे यांनी सांगितले कि, कुपोषण भागात लाभार्थ्यांना प्रत्यक्षपणे आहार योजनेचा लाभ देण्यासाठी फेस रिकगनाईस सिस्टीम (ऋठड) सुरु केली आहे. तो आहार लाभार्थ्यांपर्यंत पोहोचल्यानंतर त्या सिस्टीम च्या माध्यमातून तापसणी करण्यात येत असून या सिस्टीमवर साधारतः ७३ टक्के पेक्षा जास्त काम पूर्ण झाले आहेत. कुपोषित मुलांच्या वर्गवारी नुसार जे सॅम गटात म्हणजेच अत्यंत तीव्र कुपोषण चे प्रमाण ०.५९ टक्के आहे तर मॅम म्हणजे मध्यम तीव्र कुपोषण चे प्रमाण ३.०५ टक्के आहे. अमरावतीच्या बाबतीत सदस्यांनी या काही सूचना केल्यात त्यावर लक्ष केंद्रित करून कुपोषणाच्या बाबतीत उपाययोजना करत असतांना त्यांचा अंतर्भाव करू. असे आश्वासन मंत्रीमहोदयांच्या वतीने सभागृहात देण्यात आले.

# जीवनात येणारा प्रत्येक क्षण आनंदाचा करून जीवन जगणे आनंददायी करावे : डॉ.कमलताई गवई

अमरावती दि. १४ जीवनात येणारा प्रत्येक क्षण आनंदाचा करून जीवन जगणे आनंददायी करावे. आपल्याला मिळालेल्या वेळेचा सदुपयोग करून समाजकार्यासाठी तन-मन-धनाने सहकार्य करावे. असे सहकार्य केल्यामुळे आपल्याला समाधान तर मिळतेच पण त्याचबरोबर आपली सामाजिक बांधिलकी पण जोपासली जाते. असे उद्गार भारताचे सरन्यायाधीश श्री भूषण गवई यांच्या मातोश्री मा.लेडी गव्हर्नर डॉ.श्रीमती कमलताई गवई यांनी आज अमरावती येथे काढले. श्री संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील श्री संत गाडगेबाबा अध्यासन परिसरातील आयोजित सत्कार समारंभ प्रसंगी त्या उपस्थितांना मार्गदर्शन करीत होत्या. त्यांचा हा ८३ वा वाढदिवस असल्यामुळे अमरावती विद्यापीठ मॉर्निंग क्लबच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध स्पर्धा परीक्षा तज्ञ व मिशन आय ए एस.चे संचालक प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे हे होते.

कार्यक्रमाची सुरुवात श्री संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील श्री संत गाडगेबाबा अध्यासनाचे प्रमुख प्राचार्य डॉ. दिलीप काळे यांच्या प्रास्ताविक भाषणाने झाली.



अमरावती विद्यापीठ मॉर्निंग क्लबतर्फे श्री नरेंद्र बोरकर यांनी डॉ. कमलताई गवई यांचा परिचय उपस्थित मान्यवरांना करून दिला. याप्रसंगी विचारपिठावर अमरावती विद्यापीठ उद्यान अधीक्षक श्री अनिल घोम सुप्रसिद्ध योग तज्ञ श्री राजीव देशमुख जयमालाताई देशमुख आणि अनिता भीमराव वाघमारे पत्रकार संघाचे श्री नयन मोंढे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रा. डॉ. अरुणा वाडेकर यांनी डॉ. कमलताई गवई यांचे शाल व पुस्तक देऊन सत्कार केला. याप्रसंगी पंढरपूर वारीमध्ये सायकलने सहभागी झालेले योगपटू श्री राजीव देशमुख व श्रीमती जयमालाताई देशमुख यांचा डॉ. कमलताई गवई यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच सौ अनिता भीमराव वाघमारे यांना राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचाही याप्रसंगी सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित असलेले सर्वश्री संदीप हटकर अशोक राजुरकर प्रमोद गभणे सुनील चक्रे रवींद्र भाटकर दिलीप बोबडे गजानन घारड नितीन हिरोळे नानाभाऊ मोहोळ राहुल बोरकर नंदकिशोर वैराळे राजीव देशमुख प्रशांत सोनटक्के व जीवन बननोटे व संदीप भोगे यांनी कमलताई यांना पुस्तके व बुके देऊन त्यांच्या सत्कार केला.

मा. लेडी गव्हर्नर डॉ. कमलताई गवई गेल्या अनेक वर्षापासून अमरावती जिल्ह्यातील मोगरा येथे आचार्य गोयंका गुरुजी यांचे विपश्यना केंद्र चालवीत आहेत. त्या केंद्राला मदत म्हणून अमरावती विद्यापीठ मॉर्निंग क्लबच्या वतीने एक निधी श्री संदीप हटकर व प्रा. डॉ. अरुणा वाडेकर यांच्या हस्ते कमलताई गवई यांना अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाची सांगता श्री संदीप हटकर यांच्या आभार प्रदर्शनाने झाली.

# रोटरी क्लब ऑफ अमरावतीचा पदग्रहण सोहळा उत्साहात संपन्न

## रोटेरीयन सुगंधा देशमुख यांची अध्यक्षपदी निवड

अमरावती दि. १४ : रोटरी क्लब, अमरावतीचा वार्षिक पदग्रहण सोहळा रविवार दि. १३ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता हॉटेल ग्रेस इन येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या प्रसंगी रोटेरियन सुगंधा देशमुख यांनी क्लबच्या अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली आणि नवीन कार्यकारिणीची घोषणा केली.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डिजीई रोटेरियन डॉ. राजेश पाटील आणि गेस्ट ऑफ ऑनर म्हणून रोटेरियन सचिन देशमुख उपस्थित होते. त्यांनी नवनिर्वाचित कार्यकारिणीला शुभेच्छा दिल्या आणि रोटरीच्या सामाजिक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. नवीन कार्यकारिणीमध्ये खालील सदस्यांचा समावेश आहे. अध्यक्ष रोटेरीयन सुगंधा देशमुख, उपाध्यक्ष रोटेरीयन मनीष छांगानी, सचिव रोटेरीयन लविना जैन, कोषाध्यक्ष रोटरियन



संजय छांगानी.

संचालक मंडळ - रोटेरीयन भालचंद्र साठे, रोटेरीयन लालचंद भन्साली, रोटेरीयन मंगल पिंपळगावकर, रोटेरीयन सुनील चितळे, रोटेरीयन उमेश नावंदर, रोटेरीयन डॉ. संगीता कडू, रोटेरीयन चारुदत्त देशमुख, रोटेरीयन डॉ. स्मिता हंतोडकर, रोटेरीयन अजय पिंपळगावकर, डॉ.पद्माकर सोमवंशी.

नवीन अध्यक्ष सुगंधा देशमुख यांनी आपल्या भाषणात आगामी वर्षात राबवण्यात येणाऱ्या विविध सामाजिक प्रकल्पांची माहिती दिली आणि सर्व सदस्यांचे सक्रिय सहकार्य अपेक्षित असल्याचे सांगितले. त्यांनी माजी अध्यक्षांच्या कार्याचे कौतुक करत रोटरीच्या मूल्यांना बांधील राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

कार्यक्रमाचे नियोजन अत्यंत उत्तम झाले असून उपस्थित मान्यवर, सदस्य आणि पाहुण्यांनी नवीन कार्यकारिणीला हार्दिक शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी क्लबचे सदस्य रोटे. राजेंद्र बूच्चा, रोटे. रामप्रकाश गिलडा, रोटे. अशोक असोरिया, रोटे. अशोक कुमार सोनी, रोटे. सुनील चितळे, घनश्याम राठी, रोटे. संध्या उंबरकर, रोटे. दिपक जाजू, रोटे. प्रवीण मालपाणी, रोटे. सतीश यादव, रोटे. जुगलकिशोर व्यास, नवीन सदस्य रोटे. जितेंद्र दुर्गे, रोटे. अशोक खंडेलवाल, रोटे विनय गोहाड, रोटे. प्रियंका शाह, रोटे शर्मिष्ठा कुलकर्णी, रोटे. विनोद कुदळे, रोटे. अरुण श्रीराव, रोटे. गणेश बहाळे त्याचप्रमाणे मोठ्या संख्येने रोटरी परिवार सदस्य उपस्थित होते.

# वीज वितरण कंपनीला स्मार्ट मिटर लावू देवू नका महेश खारोडे यांचे आवाहन



अमरावती दि. १४ : महावितरण कंपनीकडून स्मार्ट मिटर लावण्याची मोहीम जोरात सुरु असून हे स्मार्ट मिटर लावू देवू नका असे आवाहन पंचायत समिती चे माजी उपसभापती महेश खारोळे यांनी शासकीय विश्राम गृह येथे पत्रकार परिषद घेऊन वीज ग्राहकांना आवाहन केले. या पत्रकार परिषदेला मतदार संघाचे आमदार गजानन लवटे यांनी प्रामुख्याने उपस्थिती दर्शविली होती. अंजनगाव दर्यापूर मतदार संघात महावितरण कंपनीकडून स्मार्ट मिटर ग्राहकांना न विचारता छुप्या पावलांनी लावल्या जात आहे आणि ग्राहकांना धाक धपट करुन मिटर ची सक्ती केल्या जात आहे त्यामुळे शहरासह ग्रामीण भागात या मीटरला सर्वत्र विरोध होत असून ग्राहकांमध्ये महावितरण कंपनी विरोधात नाराजी व्यक्त केली जात आहे याबाबत महावितरण उपकार्यकारी अभियंता यांना निवेदन देण्यात आले तसेच उपसभापती महेश खारोळे व आमदार गजानन लवटे यांनी उपकार्यकारी अभियंता अंजनगाव व दर्यापूर यांच्याशी चर्चा करून स्मार्ट मिटर लावण्याची सक्ती करु नये आणि लावलेले मिटर काढण्यात यावे असे आदेश दिले मात्र तरीही सुद्धा मिटर लावण्याची मोहीम जोरात सुरु आहे.स्मार्ट मिटर बाबत ग्राहकांना माहिती व्हावे तसेच लावण्यात आलेले मिटर हे १२ हजार रुपयांचे असून ते सामान्यांना परवडणारे नाही. त्यामुळे उपसभापती महेश खारोळे यांनी आमदार गजानन लवटे यांच्या उपस्थितीत शासकीय विश्राम गृह येथे पत्रकार परिषद घेऊन वीज ग्राहकांना आवाहन केले असून आगामी काळात वीज वितरण कंपनीने मोहीम बंद न केल्यास तीव्र जन आंदोलन करण्याची तयारी त्यांनी दर्शविली आहे. याप्रसंगी पत्रकार परिषदेला प्रेमकुमार बोके, महेंद्र दिप्टे,सचिन गावंडे, वीज ग्राहक , पत्रकार बांधव उपस्थित होते.

# पावसाळ्यात वीज अपघात टाळण्यासाठी सर्किट ब्रेकर आणि अर्थिंग अनिवार्य ; महावितरणचा सल्ला

अमरावती, दि. १४ : पावसाळ्यात विजेच्या तारा, भिंती किंवा विद्युत उपकरणांमध्ये वीजप्रवाह उतरण्याचे प्रकार वाढतात. त्यामुळे अशा धोकादायक अपघातांपासून संरक्षण मिळवण्यासाठी प्रत्येक घर, दुकान व आस्थापनामध्ये योग्य क्षमतेचे सर्किट ब्रेकर व अर्थिंग असणे अत्यावश्यक असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे.

घरगुती वायरिंगमधील बिघाड, करंट लिकेज आणि अर्थिंगचा अभाव ही वीज अपघातांची मुख्य कारणे आहेत. यावर उपाय म्हणून चउइ, एडउइ किंवा ठउउइ हे ब्रेकर लावल्यास विजेचा अति भार, शॉर्ट सर्किट किंवा धक्का लागल्यास काही मिलीसेकंदांत वीजपुरवठा खंडित होतो. त्यामुळे आग, उपकरणांचे नुकसान आणि संभाव्य जीवितहानी टाळता येते.

फ्रिज, वॉशिंग मशीन, टीव्ही, पंखे यांसारख्या महागड्या उपकरणांना शॉर्ट सर्किटपासून वाचविण्यासाठी सर्किट ब्रेकर उपयुक्त ठरतो. शिवाय, विशिष्ट भागाचे सर्किट बंद करून सुरक्षितपणे दुरुस्ती करता येते, ज्यामुळे संपूर्ण घराचा वीजपुरवठा खंडित करण्याची गरज राहत नाही.

महावितरणने अर्थिंगला देखील तेवढेच महत्त्व दिले आहे. वीजप्रवाह जमिनीमध्ये सुरक्षिततरीत्या वाहून नेण्यासाठी अर्थिंग गरजेचे असून नवीन इमारतींसाठी ते बंधनकारक, तर जुन्या इमारतींसाठी तातडीने करणे आवश्यक आहे. दर दोन वर्षांनी अर्थिंगची तपासणी करावी, असा सल्लाही देण्यात आला आहे. फक्त उपकरणेच नव्हे तर स्वतःचे संरक्षणही महत्त्वाचे असल्याने विजेचा टेस्टर वापरणे, रबरी चप्पल घालणे, व ओल्या ठिकाणी काळजीपूर्वक काम करणे गरजेचे आहे. महावितरणने नागरिकांना वीज सुरक्षेला वैयक्तिक व सामाजिक जबाबदारी म्हणून स्वीकारण्याचे आवाहन केले आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयातील निर्लेखित वस्तूंचा लिलाव

अमरावती, दि. १४ : जिल्हाधिकारी कार्यालयातील निर्लेखित करण्यात आलेले फर्निचर, लाकडी लोखंडी खुर्चीचा लिलाव करण्यात येणार आहे. यासाठी इच्छुकांनी दि. १८ जुलै पर्यंत निविदा सादर करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील जुन्या निर्लेखित शासकीय कालबाह्य झालेल्या विविध प्रकारच्या २३७ खुर्च्या जाहिर लिलावाद्वारे विक्री करण्यात येणार आहे. सदर साहित्य आहे त्या स्थितीमध्ये विक्री करण्यात येणार आहे. याबाबतची सविस्तर माहिती जिल्हा प्रशासनाच्या रीरीरींळ.पळल.ळप संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

दरपत्रक सादर करण्याचा कालवधी पासून पर्यंत दि. ९ जुलै २०२५ सकाळी १० वाजेपासून ते दि. १७ जुलै २०२५ दुपारी ५ वाजेपर्यंत आहे. यासाठी सपर्क अधिकारी अधिक्षक जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती संपर्क क्रमांक ०७२१-२६६२४९३ आहे. दरपत्रक उघडण्याचा दि. १८ जुलै २०२५ सकाळी ११ वाजता राहील. दरपत्रक अधिक्षक यांचे कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे उघडण्यात येईल. साहित्य खरेदी करू इच्छिणाऱ्यांनी साहित्य पाहून निविदेत सहभागी व्हावे, असे आवाहन अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंदा दाणेज यांनी केले आहे.

हिंदुस्थान संपादकीय

मंगळवार, दि. १५ जुलै २०२५

# निवृत्ती वय हवेच

आपल्या देशात व्यक्ती माहात्म्य अजूनही स्विकारल्या जाते.राजे,महाराजांचे महत्व आपण अद्यापही विसरू शकलो नाही.त्यांचा प्रभाव अनेक वर्षांनंतर ही अनेक पिढ्या जाऊनही कायम आहे.स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व महात्मा गांधी यांनी केले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर काँग्रेस पक्षाने अनेक निवडणूकांमध्ये महात्मा गांधी यांच्या फोटोचा फायदा घेत निवडणूका जिंकल्यात हे अनेक दशकाच्या राजकारणामध्ये अनुभवी जनतेने अनुभवले आहे. देशाच्या स्वतंत्रता संग्रामात नेहरूंचे योगदान जनता विसरली नाही.त्याचा पगडा अजूनही भारतीय मतदारांवर असल्याचे जाणवते.नेहरू परिवाराच्या वारसाला मतदारांनी नाकारले नाही.हाच प्रभाव राजकारणात आलेल्या नेत्यांवर होता व आहे.

हिंदुह्रदयसम्राट व शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे नेहमी परिवार वादावर टिका करित असत.पण आजही राजकारण म्हटले की परिवाराचे महत्व कमी झाले नाही. स्वातंत्र्य प्राप्ती पासून व्यक्ती महात्म आजही सर्वसामान्य मतदारांसोबत आपणही मान्य करतो. लोकशाहीत लोक नेत्याचे महत्व आपण विसरत नसल्याने राजकीय पुढाऱ्यांनाही लोकशाहीत निवृत्तीची कल्पना सहनही होत नाही.अखेरचा 'हे राम' म्हणे पर्यंत खूर्चीचा मोह सुटत नाही हे अनेकदा आपण सर्वांनी अनुभवले आहे व यावर नियंत्रण असावे असे अनेकांना वाटते. पण म्हणतात नां 'कळते पण वळत नाही' ही स्थिती सर्वच क्षेत्रात दिसते.

आपल्याकडे वयाचे महत्व बरेच असते.अगदी बालवयात केलेल्या चूका 'अभी बच्चा है' म्हणून माफ केल्या जातात. तर किशोर वयात येणाऱ्यास 'सोळावे वरीस धोक्याचे' म्हणून चेतावणी दिल्या जाते. नौकरी मिळण्यासाठी वयाचे बंधन तसेच सेवानिवृत्ती साठी ही ठरलेली वयाची मर्यादा आपण आपल्या लोक प्रतिनिधी निवडून देण्याचे वय निश्चित केले पण निवृत्तीचे नाही पण ते असावयास हवे याचे भान ठेवण्यासाठी माननिय राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मा. मोहन भागवत यांनी नुकत्याच केलेल्या भाणामध्ये मोरपंत पिंगळे यांचा संदर्भ देत राजकीय नेत्यांना लोकशाहीमध्ये सेवानिवृत्तीचे वय असायला हवे व ते त्या त्या नेत्याने स्वत:हून ठरवावे याची आठवण करून दिली. राजे महाराजे यांच्या काळात राजा आपल्या राज्याचा उत्तराधिकारी ठरवत असे पण लोकशाहीत मात्र जनता राजा असते पण ते उपकाराच्या ओझ्याखाली वावरत असतात त्यामुळे नेत्यांना खूर्चीचा मोह सोडवत नाही,हे मान्य केले पाहिजे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मा. मोहन भागवतांनी ७५ वर्षे ही राजकीय निवृत्तीची सिमा असल्याचे स्मरण दिले. मा. सरसंघचालकांचे उद्‍बोधन हे भारतीय जनता पक्षातील कार्यरत असणाऱ्या राजकीय व्यक्तींना एकप्रकारे इशाराच असतो हे आता सर्वश्रृत आहे व त्यांनी सांगितलेली राजकीय निवृत्ती अनेकांना बोचणारी आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शिस्तीनुसार यापूर्वी भाजपने अनेक दिग्गज नेत्यांना निवृत्त केले.त्यात मा.लालकृष्ण अडवाणी असोत की मा. मुरली मनोहर जोशी अथवा मा. सुमित्रा महाजन काही अपवाद सोडले तर ही वयाची लक्ष्मणरेषा भाजपने सांभाळली पण आता मात्र राजकीय दृष्टीने ही रेषा सांभाळणे उचित होईल का याचा विचार करण्याची वेळ आली आहे.

मा.नरेंद्र मोदी यांनी केवळ भारतीय मतदारांवर नव्हे तर जगभरात नांव कमावले आहे.खरे तर,जगभर होणारा त्यांचा सन्मान हा भारताचा आहे,भारतीयांचा आहे हे आपण विसरलो आहोत.एक वेळ 'इंडिया इज इंदिरा' असे म्हटल्या जात होते.त्यावर तत्कालीन जनसंघवाले टिका करायचे,आता पंतप्रधान ना. नरेंद्र मोदी यांची स्थिती तशीच झाली आहे.मोदींचा जगभरात होणारा सन्मान पंतप्रधान म्हणून होतो,याचे ही स्मरण प्रत्येकाने ठेवली पाहिजे, कारण तो भारताचा सन्मान आहे.'मोदी मोदी' म्हणून होणारी ओरड अनेकांना खटकते,त्यात आता वयाचा प्रश्न निर्माण झाला आहे. ही वयाची मर्यादा असली तरी यापूर्वी ही भाजपने अनेकांना यातून सुट दिली आहे, तशी सुट मोदी यांना मिळेल का? दिली नाहि तर भाजपला राजकीय दृष्टीने परवडेल का?याचा विचार भाजपला करावा लागेल हे ही तितकेच खरे.

वयाची मर्यादा असावी नव्हे ती गरजेची आहेच पण त्यालाही अपवाद असतात हे देखील विसरून चालणार नाही हे जाणण्याचे राजकीय कौशल्य भारतीय मतदारांमध्ये नक्कीच आहे हे सुद्धा तेवढेच खरे.

# शेतीमध्ये वापरल्या जाणाऱ्या कृषी रसायनांचा परिणाम आणि त्यांची सुसंगतता

कृषी हा आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेचा प्रमुख कणा आहे. वाढत्या लोकसंख्येच्या अन्नधान्याच्या गरजा भागवण्यासाठी उत्पादन क्षमता वाढवणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे शेतीमध्ये विविध आधुनिक तंत्रज्ञानासोबतच कृषी रसायनांचा वापर झपाट्याने वाढला आहे. यामध्ये कीटकनाशके, तणनाशके, बुरशीनाशके, खतं व वाढीचे नियामक यांचा समावेश होतो.कृषी रसायनांचा योग्य वापर केल्यास शेती उत्पादनात लक्षणीय वाढ होते. कीटकनाशके व बुरशीनाशके पीकांवरील रोग आणि किडींपासून संरक्षण देतात. रासायनिक खते जमिनीतील पोषणतत्त्वांची कमतरता भरून काढतात आणि पिकांची वाढ वेगाने होते. या सर्व गोष्टी शेतकऱ्याच्या आर्थिक उत्पन्नात वाढ करणाऱ्या ठरतात.

अत्यधिक आणि अयोग्य प्रमाणात कृषी रसायनांचा वापर केल्यास त्याचे विपरीत परिणाम दिसून येतात. जमिनीची सुपीकता कमी होते, जलस्रोत दूषित होतात, जैवविविधतेवर परिणाम होतो आणि मानवी आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. अन्न साखळीत रसायनांचे अंश राहिल्यास ते अपायकारक ठरतात. काही वेळा कीटक किंवा तणांमध्ये रसायनांच्या प्रतिकारशक्ती निर्माण होते, ज्यामुळे ती रसायने निष्क्रिय होतात.

कृषी रसायने एकमेकांबरोबर मिसळून वापरताना त्यांची सुसंगतता (compatibility) तपासणे आवश्यक असते. काही रसायने एकत्र मिसळल्यास त्यांचा प्रभाव वाढतो, तर काहींचा परिणाम कमी होतो किंवा पीकांना हानी पोहोचवू शकतो. उदाहरणार्थ, बुरशीनाशक व कीटकनाशक एकत्र वापरताना त्यांची रासायनिक प्रतिक्रिया लक्षात घेणे आवश्यक आहे. अशा सुसंगततेसाठी कृषी वैज्ञानिकांचा सल्ला घेणे गरजेचे आहे.

---

भारतात वापरल्या जाणाऱ्या कृषी रसायनांचे फॉर्म्युलेशन्स

| अनु. क्र. | संक्षेप | पूर्ण फॉर्म | मराठीत वर्णन |
|---|---|---|---|
| 1 | EC | Emulsifiable Concentrate | तेलाधारित द्रावण; पाण्यात मिसळल्यावर इमल्शन तयार होते. |
| 2 | SC | Suspension Concentrate | ठोस घटक द्रवामध्ये निलंबित; फवारणीस योग्य. |
| 3 | WP | Wettable Powder | पाण्यात मिसळल्यावर निलंबित होणारी पूड; सतत ढवळणे आवश्यक. |
| 4 | WG / WDG | Water Dispersible Granules / Wettable Dispersible Granules | पाण्यात सहज विरघळले जाणारे ग्रॅन्युल्स; हाताळायला सुरक्षित. |
| 5 | SL | Soluble Liquid | पाण्यात पूर्णपणे विरघळणारे द्रावण. |
| ६ | SP | Soluble Powder | पूर्णपणे पाण्यात विरघळणारी पूड. |
| 7 | GR | Granules | थेट जमिनीवर टाकायचे ग्रॅन्युल्स; मुख्यतः मातीतून शोषले जातात. |
| 8 | DP | Dustable Powder | फवारणीऐवजी थेट धूळ स्वरूपात वापरली जाते. |
| 9 | CS | Capsule Suspension | मायक्रो-कॅप्सूलमध्ये ॲक्टिव घटक; संथगतीने सोडला जातो. |
| 10 | ME | Microemulsion | सूक्ष्म थेंब असलेली पारदर्शक इमल्शन; खूप स्थिर असते. |
| 11 | OD | Oil Dispersion | तेलात विखुरलेला सक्रिय घटक; सिस्टीमिक औषधांसाठी वापरले जाते. |
| 12 | FS | Flowable concentrate for Seed Treatment | बियाण्यावर उपचार करण्यासाठी द्रव स्वरूपातील औषध. |
| 13 | ULV | Ultra Low Volume | अतिशय कमी प्रमाणात वापरायची उच्च एकाग्रतेची फॉर्म्युलेशन. |
| 14 | EW | Emulsion, Oil in Water | तेलाचे थेंब पाण्यात विखुरलेले; कमी विषारी. |
| 15 | ZC | Mixed Formulation (CS + SC) | कॅप्सूल + सस्पेन्शन एकत्र. |
| 16 | SE | Suspo-emulsion | सस्पेन्शन आणि इमल्शनचा संगम. |
| 17 | -S | -queous Solution | पाण्यावर आधारित पूर्ण द्रावण. |
| 18 | DC | Dispersible Concentrate | पाण्यात सहज विखुरणारे एकाग्र द्रावण; SC आणि EC यांचा प्रकार. |
| 19 | ECG | Emulsifiable Concentrate Granules Concentrate Granules | EC फॉर्म तयार करणारे ग्रॅन्युल्स (कमी वापरले जाते). |

---

टीप:२० पेक्षा अधिक अधिकृत फॉर्म्युलेशन्सभारत सरकारद्वारे (CIBRC) मान्य आहेत.

मुख्य कीटकनाशकांचे चार गट (Four Main Groups of Insecticides)

कीटकनाशके (Insecticides)

ह्व

| ऑर्गेनो क्लोरीन (Organochlorines) | ऑर्गेनो फॉस्फेट्स (Organophosphates) | कार्बामेट्स (Carbamates) | सिंथेटिक पायरेथ्रॉईड्स (Synthetic Pyrethroids) |
|---|---|---|---|
| ह्व | ह्व | ह्व | ह्व |
| उदाहरण: DDT, Endosulfan | उदा.: Malathion, Chlorpyrifos | उदा: Carbaryl, Carbofuran | उदा: Cypermethrin, Deltamethrin |

| गट | वैशिष्ट्ये |
|---|---|
| Organochlorines | दीर्घकाळ टिकणारे, जैवसंचयाची शक्यता, बऱ्याच देशांत बंदी. |
| Organophosphates | नर्व (मज्जातंत्र)एजंट, जलद परिणाम,काही मानवासाठी विषारी. |
| Carbamates | Cholinesterase enzyme रोखणारे, थोडे सौम्य. |
| Synthetic Pyrethroids | नैसर्गिक पायरेथ्रिनचा सुधारित रासायनिक प्रकार, कमी विषारी पण प्रभावी. |

टीप: नवीन कीटकनाशक वर्गामध्ये Neonicotinoids, Oxadiazines, आणि Biopesticides सुद्धा समाविष्ट आहेत, पण वर दिलेले हे ४ गट पारंपरिक व मुख्य मानले जातात.कृषी रसायनांची एकत्र सुसंगतता (compatibility) शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची आहे, कारण चुकीचे मिश्रण फायदेशीर ठरण्याऐवजी नुकसानकारक ठरू शकते.खाली दिलेली तक्त्याच्या स्वरूपात माहिती मिक्सिंग टाळून सादर केली आहे. म्हणजेच, कोणते रसायन कोणासोबत सुसंगत नाही हे स्पष्ट केले आहे आणि यांचा वापर स्वतंत्रपणे करावा असा सल्ला आहे.

कृषी रसायनांची सुसंगतता (Compatibility)

कीटकनाशक: स्वतंत्र वापर करावा काही वेळा सुसंगत, पण प्रत्येक वेळी तपासावे, सहसा सुसंगत नाही, एकत्र मिसळू नये

बुरशीनाशक / काही वेळा सुसंगत, पण काळजी घ्या स्वतंत्र वापर करावा सुसंगत नाही, एकत्र वापर टाळावा.

तणनाशक: सुसंगत नाही, मिश्रण टाळा, सुसंगत नाही, स्वतंत्र वापर करावा.

टीप: = स्वतंत्र वापरासाठी योग्य

= काही प्रकरणांमध्ये सुसंगत, पण तज्ज्ञांचा सल्ला घ्या

= सुसंगत नाही, रसायन मिश्रण टाळा

महत्त्वाचे काही उदाहरणे (फक्त माहितीस्तव, मिश्रण न करावा):

| कीटकनाशक | बुरशीनाशक | सुसंगतता माहिती |
|---|---|---|
| इमिडाक्लोप्रिड | मॅंकोझेब | /काही वेळा सुसंगत, पण पाणी व झक महत्त्वाचे |
| स्पायनोसॅड | ट्रायकोडर्मा (जैविक) | सुसंगत नाही (जैविक घटक मरू शकतो) |
| क्लोरोपायरीफॉस | मेटालेक्सिल | मिश्रण शक्य पण एकत्र स्प्रे करताना वेळ व टप्पा महत्वाचा |
| ग्लायफोसेट | कोणतेही कीटकनाशक | सुसंगत नाही – तणनाशक एकट्यानेच वापरावे |

निष्कर्ष: रसायने कधीच एकत्र स्वतःहून मिसळू नयेत.

रासायनिक सुसंगतता प्रयोगशाळा चाचण्यांवर आधारित असते.

रसायनांच्या लेबलवरील सूचना व कृषी अधिकाऱ्यांचा सल्ला घेणे अत्यावश्यक आहे.

टॅंक मिक्सिंग टाळावे, विशेषतः तणनाशकांसोबत.

कृषी रसायनांचा योग्य आणि संतुलित वापर केल्यास शेती उत्पादन वाढू शकते आणि शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावू शकते. मात्र त्यांचा अतिरेक टाळावा लागतो. पर्यावरणपूरक व जैविक शेतीला प्रोत्साहन देत आधुनिक रसायनांचा शास्त्रशुद्ध वापर करणे हीच काळाची गरज आहे.

● डॉ. आनंद वरघट, प्रशिक्षण सहायक,
कृषि संशोधन केंद्र, एकार्जुना (वरोरा), जिल्हा. चंद्रपूर
संपर्क– ७०२०५३५९६७

# माझी वेबसाईट !!

झुळूक
● मंजुश्री कुलकर्णी
संचालिका – क्षितिज दिव्यांग पुनर्वसन केन्द्र
अकोला. मो. ९८५०३२२६७८

आजची पिढी तंत्रज्ञानावर श्रद्धा असणारी. कुठल्याही गोष्टीची शहानिशा करायची असेल तर सोप्पा उपाय असतो त्यांच्या जवळ. त्या विषयाशी निगडीत वेब साइट वर जा, सविस्तर 'कुंडली' जाणुन घ्या सोबत इतरांचं काय मत आहे (त्यांच्या भाषेत reviews) ते बघा आणि निर्णयावर शिक्कामोर्तब करा! ही प्रक्रिया अगदी चित्रपटाला जाण्यापासुन तर पर्यटन स्थळ ठरवणे, तिकिट काढणे, हॉटेल ठरवणे अगदी नोकरी व्यवसायाच्या नवनवीन वाटा शोधण्यापर्यंतची असते. (खरं तर ही यादी मारोतीच्या शेपटीसारखी, नं संपणारी!) त्यानुसार एखादा निर्णय घेऊन अनुभवानुरूप मतप्रदर्शन करायला ही तरुणाई कचरत नाही. स्पष्टवक्तेपणा सगळ्यांनी सहजतेने स्वीकारल्याचं हे शुभचिन्ह! यातली दुसरी महत्त्वाची सकारात्मक बाजू म्हणजे या सर्व प्रकारच्या सेवा देणाऱ्यांची आपापल्या ग्राहकांप्रती अधिकाधीक उत्तम देण्याची बांधिलकी राहते. जराही गडबड झाली तर ती क्षणात जगजाहीर होणार त्यामूळे ही 'लक्ष्मणरेषा' कुणीही ओलांडण्याचं धाडस करत नाहीत. आमची तरुण मंडळी त्यामुळे अगदी 'उघड्या डोळ्यांनी' त्यावर विश्वास ठेवून निर्णय घ्यायला तत्पर असते.

आमच्या वेळेस असं नव्हतं! म्हणतं जरासं मागे वळून बघितलं तर आठवतील आयुष्यात आम्ही डोळे बंद करून (समोरच्यावर विश्वास ठेऊन) घेतलेले निर्णय . मग बरेचवेळा झालेली फसगत, विश्वासघात, त्या अपयशातून सावरण्यासाठी घालवलेला वेळ आणि यशाच्या हमखास खात्रीसाठी घेतलेला नव्या मंत्राचा शोध ... अनुभव हीच खात्री ! हा वाक्यप्रचार खरं तर वारसाहक्काने मिळालेला, मात्र त्याचा योग्य विनियोग फारसा जमला नाही हे मान्य करावसं वाटतं. ठेच लागल्यानंतरही पायाखाली आलेला दगड उचलण्याकडे लक्ष देणारे आम्ही, वाट बदलण्याचा प्रयत्नच केला नाही.(अपवाद आहेत हे सांगणे नलगे ) टक्केटोणपे खातखात इथवर आलो, खडतर प्रसंगांच्या सोबतीने मुलांना मोठं केलं. मुलांच्या हातातही विचारांची चाळणी होती, काय घ्यायचं काय टाकायचं हे त्यांनी आपसुक जाणलं. आम्हाला न्याहाळतानां काळाचाही महीमा जाणला, उमजला आणि स्वीकारला. परिवर्तन हे प्रगतीचे द्योतक हा पाठ घोकणारे आम्ही परिवर्तनालाच 'पाठ' दाखवत राहिलो, उन्नतीच्या महाद्वारापर्यंत पोहचलोच नाही. (अपवाद वगळतां)

अर्थशास्त्रानेही श्रीमंत अधिकाधीक श्रीमंत अन् गरिब अधिकाधीक गरिब! असे वक्तव्य केले, आम्हा मध्यमवर्गियांवर मात्र 'विशेष भाष्य' केले नाही ! आम्हीच आमच्या जीवनाचे शिल्पकार ठरलो.. त्यामुळे काही अपयश पदरी पडलं तरी खापर फोडायला समोर कुणी नव्हतं!

हा सगळा उहापोह करण्याचं कारण म्हणजे पुण्यात एका कंपनीत काम करणाऱ्या लेकीचा आलेला फोन! बरेच दिवसापासून करत असलेल्या कामातून समाधान मिळत नाही, वेळ वाया जात असल्यासारखं वाटतं असे व्यक्तअव्यक्त संभाषण व्हायचे. दुसरा पर्याय सापडे पर्यंत इलाज नाही हेही अधोरेखित होतच राहायचे. अशा वेळेस आई कडून फक्त 'ऐकणे' अपेक्षित असतं (आई करु पण काय शकणार?) नुकत्याच आलेल्या फोनवरुन येणारा आवाज बदललेला, आनंदाची चिवचिव जाणवून देणारा होता.

आई गं एक संधी आली आहे, आम्ही दोघांनी नीट बघितले आहे पण दादा वहिनीशी बोलते; कंपनीच्या वेबसाईटवर बघून मग ठरवतो आम्ही !

नेहमीप्रमाणे मी ही , हो तुम्ही चौघं जे ठरवाल त्यात आम्ही सोबत आहोत म्हणत विश्वासाचं बळ दिलं . लवकरच तिला अभिप्रेत असलेली हिरवी झेंडी मिळताच,

आई गं सगळं एकदम व्यवस्थित आहे, दादा वहिनीलाही आवडलंय सगळं !

या वाक्यातून डोकावणारा आनंद अत्युच्च पातळीवरचा होतां ! आम्हाला मात्र कंपनीचं नावही माहित नव्हतं बाकी सारे तर दूरच ! (आजकाल तसेही कंपनींचे नावं लक्षात ठेवणे म्हणजे जरा अवघड गोष्टच )


माहीत आहे ते एकच, मुलांचा आनंद! ते खुश म्हणजे सारं आलं, काही माहीत करून घेण्याची गरज उरत नाही .

ही कहाणी दमलेल्या पण तरीही समाधानासह 'आपापल्या गावी' राहणा-या मध्यमवर्गीय आईबाबांची ! सर्वांची पिल्लं शहरांच्या कुशीत विसावलेले, तिथल्या हवामानाशी, राहणीमानाशी समायोजन साधण्यात आणि तरीही आईबाबांना 'हाक' मारण्यास उत्सुक असलेले. हे आईबाबाही कुठलीही भरारी घेण्यासाठी चिमण्यांच्या पाठीशी असल्याची खात्री देणारे! टोलेजंग बंगल्यातल्या भौतिक आनंदाच्या व्याख्येपासून अनभिज्ञ असलेले.. फक्त मुलांवरच्या विश्वासासह त्यांच्या आनंदात स्वत: चिंब भिजणारे थोडक्यात काय तर वेबसाईटच्या या जमान्यातली एकमेव वेबसाईट हाताळणारे .. जिचे नाव आहे

www.mulanchaaananda.com

काय मंडळी मान्य ना ?

# सहज सुचलं म्हणून....



आपल्या हयातीत घडल्या गेलेली सगळ्या थोर मंडळींची कारकीर्द, त्यांचं कर्तृत्व हे आपण बघितलेलं, अनुभवलेलं असतं. चालू घडामोडींचा आढावा घेतांना कधी ते वाचनातून पण कळतं. परंतु आपल्या आधी घडून गेलेल्या घटना, इतिहास हा आपल्याला जाणून घ्यावा लागतो.तो जाणून घेता येतो आपल्यापेक्षा जेष्ठ, आधीच्या पिढीतील मंडळींशी केलेल्या चर्चेतून, जुन्या लिहीलेल्या पुस्तकांमधून. काही प्रमाणात त्याची माहिती काही दृश्य डॉंक्युमेंट्रीज किंवा त्यावर बनविलेल्या चित्रफीती वा चित्रपट ह्या माध्यमातून पण मिळू शकते. म्हणूनच हे सगळं जाणण्यासाठी चांगली पुस्तकं आपल्या संग्रही असणं खूप आवश्यक असतं.असचं एक खूप छान पुस्तक मी आईंना गिफ्ट दिलं होतं.

राजहंस प्रकाशनचं अभिराम भडकमकर लिखीत 'असा बालगंधर्व' हे ते पुस्तक आहे. आपल्याला कुठल्याही मातब्बर, निपुण अशा व्यक्तीची जुजबी ओळख तर असते पण त्यांचे असामान्य कर्तृत्व जाणून घ्यायचं असेल, त्यांच्या अनुभवांच्या शिदोरीचा अभ्यास करायचा असेल तर मात्र आपल्याला अशी समग्र, माहितीपूर्ण पुस्तकं ही वाचावीच लागतात. काल बालगंधर्वांची जयंती होती त्यानिमित्ताने त्यांच्या बद्दलच्या वाचनातून आठवणींना उजाळा.

बालगंधर्व म्हणजे नेमके कोण हे बऱ्याच लोकांना बालगंधर्व म्हणजे संगीत नाटकांमध्ये रंगमंचावर स्त्रीपात्र हुबेहूब वठविणारं,सुंदर गाणारं आणि दिसणारं एक पुरुषपात्र एवढीच त्यांची ओळख आहे.परंतु ह्याही पलीकडे त्यांना जाणून घ्यायचं असेलं, त्यांचं असामान्य कर्तृत्व, त्यांच्या जीवनात आलेले उतारचढाव हे अभ्यासायचे असतील तर मात्र आपल्याला अशी पुस्तकं वा त्यांच चरित्र ह्याचं अभ्यासपूर्ण वाचनं करणं गरजेचं असतं.

हे पुस्तक वाचतांना बालगंधर्वांच्या आयुष्यात आलेले प्रचंड चढउतार, संघर्ष आणि अस्सल बावनकशी कलावंताची कलंदर, स्वतः ला झोकून देऊन अभिनय करण्याची, गायनाची तयारी बघून खरोखरचं मन अचंबित होतं.

बालगंधर्वांच्या विषयीचं हे पुस्तकं नाट्यप्रेमी आणि संगीतप्रेमींसाठी पर्वणी तर आहेच परंतु ज्यांना त्यांच ह्या क्षेत्रातील अफाट कर्तृत्व जाणायचं असेल तर ते ह्या पुस्तकातून कळेल.

उपाधीच्या नावाने अजरामर झालेल्या बालगंधर्वांच पूर्ण नाव नारायण श्रीपाद राजहंस ह्यांचा जन्म नागठाणे, सांगली येथील. जन्म २६ जून १८८८ चा तर मृत्यू १५ जुलै १९६७ रोजी. तब्बल जवळपास एकोणऐंशी वर्षांचं आयुर्मान. ह्यांची आधी जुजबी ओळख करुन घ्यायची तर हे बालगंधर्व ह्या उपाधीने लोकप्रिय असलेले विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील मराठी रंगभूमीवरील अभिनेता, गायक आणि नाट्यनिर्माते अशी आहे. रंगभूमीवर स्त्रिया अभिनय करीत नसतानाच्या काळात आपल्या हुबेहूब रंगवलेल्या स्त्री–भूमिकांमुळे ह्या बालगंधर्वांनी खूप मोठी लोकप्रियता मिळवली. हा काळच वेगळा होता. देशात एकीकडे स्वातंत्र्यलढा सुरू होता. यंत्रयुगाची चाहूल लागून त्याची नुकतीच नांदी सुरू झाली होती. नाट्यकला अस्तित्वात होतीच, चित्रपटांचा नुकताच जन्म झाला होता, स्त्रियांना शिक्षणाचं क्षेत्र खुलं होऊन त्यांची स्वतःची खास ओळख पटायला लागली होती.थोडक्यात म्हणजे सर्वत्र बदलाचं वारं होतं.

नाट्यगीतांसह ख्याल, ठुमरी, गझल, दादरा, भक्तिगीते यांसारख्या गायन प्रकारांवरही त्यांचे विलक्षण प्रभुत्व होते. बालगंधर्व हे भास्करबुवा बखले यांचे शिष्य आणि मास्तर कृष्णरावांचे गुरूबंधू होते. कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात त्यांचे गाणे ऐकून बाळ गंगाधर टिळकांनी त्यांना बालगंधर्व ही पदवी बहाल केली. पुढे ते त्याच नावाने लोकप्रिय झाले.ह्या बालगंधर्वांच्या जीवनात सगळचं पराकोटीचं, अगदी टोकाच्या चढउताराचं. त्यांना जितकं यश, मानसन्मान, ऐश्वर्य लोकप्रियता हे सगळं मिळालं तितकच दारिद्र्य, विफलता,अपयश, विपन्नावस्था हे पण भोगावं लागलं. मात्र त्यांना रसिक प्रेक्षक मायबापांच प्रेम, भक्ती शेवटपर्यंत मिळाली हे पण खरे.

बालगंधर्वांनी रंगभूमीवरील आपली कारकीर्द किर्लोस्कर संगीत मंडळी या नाट्यसंस्थेत इ.स. १९०५ साली सुरू केली. मात्र तिचे एक भागीदार नानासाहेब जोगळेकर यांच्या इ.स. १९११ मध्ये निधनानंतर संस्थेत वाद झाले. परिणामी इ.स. १९१३ मध्ये बालगंधर्व, गणेश गोविंद (गणपतराव) बोडस आणि गोविंदराव टेंबे यांच्यासह ती संस्था सोडली आणि गंधर्व संगीत मंडळाची स्थापना केली. मात्र इ.स. १९२१ मध्ये कर्जात अडकलेल्या या नव्या कंपनीचे नारायणराव राजहंस उर्फ बालगंधर्व हे एकमेव मालक होते. त्यानंतर त्यांच्या नाटकांनी मिळवलेल्या लोकप्रियतेच्या जोरावर त्यापुढच्या सात वर्षांत कंपनीने सर्व देणी फेडली. मात्र त्यापुढच्या काळात या संस्थेची आर्थिक स्थिती चढउताराचीच राहिली. नाटकाच्या प्रॉपर्टीसह अनेक गोष्टींमध्ये दर्जा आणि अस्सलपणा राखण्याचा बालगंधर्वांचा आग्रह हेही त्याचे एक कारण सांगितले जाते. असं म्हंटल्या जातं जिथे गरज असेल तिथे ते महागडी अत्तरं,चांदीची ताटं ह्यांचा स्वतःला तोशीस लाऊन सर्रास वापर करीत असतं.

पुढे प्रभात फिल्म कंपनीसाठी बालगंधर्वां नी 'धर्मात्मा' चित्रपटात संत एकनाथांची भूमिकाही केली.बालगंधर्वानी आपल्या भूमिका साकारून संगीत नाटक आणि नाट्यसंगीत हे कलाप्रकार मध्यमवर्गीय महाराष्ट्रीय कुटुंबांमध्ये लोकप्रिय केले. नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर, गोविंद बल्लाळ देवल, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, काकासाहेब खाडिलकर, राम गणेश गडकरी आणि वसंत शांताराम देसाई प्रभृतींनी लिहिलेली अनेक संगीत नाटके बालगंधर्वांनी केली.

भाऊराव कोल्हटकरांच्या इ.स.१९०१ मधील निधनानंतर जेंव्हा संगीत नाटक परंपरेला उतरती कळा आली, त्यानंतर बालगंधर्वांनी या परंपरेत मोलाची भर घालत ती पुढे नेण्याचे महत्त्वाचे कार्य केले. इ.स. १९२९ सालच्या ४२ व्या मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते.

स्त्री भूमिकांसाठी महिला कलाकारांची गरज निर्माण झाल्यानंतर एप्रिल इ.स.१९३८ मध्ये गोहर कर्नाटकी यांचा गंधर्व नाटक मंडळीत समावेश झाला. इ.स.१९६७ मध्ये बालगंधर्वांच्या मृत्यूनंतर कंपनीचा कारभार गोहरबाईंनी सांभाळला. इ.स. १९५१ मध्ये नारायणरावांनी गोहरबाईंशी कायदेशीर विवाह केला.

त्यांनी संगीत सौभद्र, संगीत मृच्छकटिक, संगीत शाकुंतल, संगीत मानापमान, संगीत संशयकल्लोळ, संगीत शारदा, संगीत मूकनायक संगीत स्वयंवर, संगीत विद्याहरण, संगीत एकच प्याला, संगीत कान्होपात्रासह एकूण २५ विविध नाटकांत भूमिका केल्या. त्यांची संगीत शाकुंतल नाटकातील 'शकुंतला' व मानापमान नाटकातील 'भामिनी' या भूमिकांमुळे एक प्रतिभावंत कलाकार म्हणून त्यांचे नाव सर्वत्र झाले. इ.स. १९५५ रोजी त्यांनी एकच प्याला नाटकात साकार केलेली सिंधू ही त्यांची शेवटची भूमिका ठरली. त्यानंतर त्यांनी रंगभूमीवरून निवृत्ती घेतली. बालगंधर्वाच्या रंगभूमीवरल्या कारकिर्दीला पंचवीस वर्षे पूर्ण झाल्याबद्दल 'रत्नाकर' मासिकाने १९३१ मधल्या जुलैचा अंक 'गंधर्व अंक' काढला होता.

बालगंधर्वांची चरित्रे आणि त्यांच्याविषयीची अन्य बालगंधर्वांचा इ.स. १९५५ साली संगीत नाटक अकादमीने राष्ट्रपती पदक देऊन सन्मान केला. भारत सरकारने बालगंधर्वाना इ.स. १९६४ साली पद्मभूषण ह्या पुरस्काराने गौरविले.

विष्णूदास भावे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सांगलीची अखिल भारतीय नाट्य विद्यामंदिर समिती ही इसवी सनाच्या १९६० सालापासून विष्णूदास भावे पुरस्कार देत आली आहे. बालगंधर्व यांना हा पुरस्कार मिळाला होता.१५ जुलै १९६७ रोजी वृद्धापकाळामुळे व दीर्घ आजाराने बालगंधर्वांचे निधन झाले.

बालगंधर्वांमधील हाडाच्या कलावंताला विनम्र अभिवादन.

● सौ. कल्याणी बापट (केळकर)
बडनेरा, अमरावती, मो.९६०४९४७२५६

# हिंदुस्थान दिनवेध

## राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाच्या निर्णयांबाबत संभ्रमावस्था राहील. आर्थिक बाबतीत ताण राहील. प्रकृतीची काळजी घ्या.
- **वृषभ** : कौटुंबिक सुख-समाधान लाभेल. कार्यात उत्कर्षाच्या संधी लाभतील. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **मिथुन** : व्यवसायात साधारण स्थिती राहील. खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. विचारानं रहायला हवं.
- **कर्क** : ग्रहमानाची अनुकूलता लाभेल. महत्त्वाची कामं हाती घ्यावीत. सार्वजनिक क्षेत्रात संधी लाभतील.
- **सिंह** : चिंता, ताण-तणावाची स्थिती राहील. सांधेदुखीचा त्रास संभवतो. आर्थिक व्यवहार विचारानं करावे.
- **कन्या** : सामाजिक क्षेत्रात संधी लाभतील. आर्थिक आवक उत्तम राहील. मनाजोग्या घटना सुख देतील.
- **तूळ** : मुलांच्या प्रश्नांचा ताण राहील. जुनी येणी रखडतील. स्थापत्य, कला क्षेत्रात संधींचा लाभ घ्यावा.
- **वृश्चिक** : धार्मिक, आध्यात्मिक कार्याकडे ओढा राहील. विद्यार्थ्यांना सुसंधी लाभतील. बाकी चिंता नसावी.
- **धनु** : मनात नकारात्मक विचार येतील. जोडीदाराशी मतभेद संभवतात. प्रवासात पुरेशी काळजी घ्यावी.
- **मकर** : कार्यात प्रसन्नता राहील. रखडलेली कामं मार्गी लागतील. पूर्वीच्या ओळखी आणखी दृढ होतील.
- **कुंभ** : स्थावर प्रश्न आणखी कठीण होतील. महत्त्वाच्या कामांना विलंब लागेल. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **मीन** : भाग्योदयकारक घटना घडतील. व्यवसायात अनपेक्षित दिलासा मिळेल. खर्चावर नियंत्रण ठेवावं.

## दिनविशेष


### १५ जुलै

**२०१४** : केंद्र सरकारने केंद्रीय लोकसेवा आयोगाला पूर्वपरीक्षा पुढे ढकलण्याची विनंती केली.
**२०१५** : इराणच्या अणुकरारास राष्ट्रसंघाची मोहोर.
**२०१७** : गणितातील योगदानाबद्दल फिल्ड्स मेडल मिळवणारी पहिली महिला मरियम मिर्झाखानी यांचं निधन.
**२०१८** : विश्वकरंडक फूटबॉल स्पर्धेत क्रोएशियाला नमवून वीस वर्षांनंतर फ्रान्स पुन्हा जगज्जेता.

## आरोग्यमंत्र

### पित्ताचा प्रकोप?

काहीही खाल्लं की जळजळणं, छातीत आग होणं, घशाशी येणं अशा समस्या जाणवत असतील तर पित्ताचा प्रकोप आहे हे लक्षात घ्यावं. अनेकांची प्रकृती पित्तकारक असते. असं असताना पित्तकारक खाद्यघटकांचं सेवन झालं तर पित्ताचा त्रास वाढतो. हा त्रास दिनक्रमामध्ये मोठा व्यत्यय आणतो. पावसाळ्यात पचनशक्ती अगदीच क्षीण झालेली असते. त्यामुळेच या दिवसांमध्ये अनेकांना पित्त उफाळून येण्याचा त्रास सहन करावा लागतो. आधी उल्लेख केल्याप्रमाणे तोंडात आंबट गुळणी येणं, अंगावर गांधी येणं यासारख्या लक्षणांवरुन पित्ताचा त्रास ओळखता येतो. हा त्रास टाळायचा तर या दिवसात अगदी हलका आहार घेण्याकडे कटाक्ष ठेवावा. पावसाळा असला तरी भरपूर पाणी प्यावं. कारण पाणी पिण्याचा कंटाळा केला तर शरीरातल्या पाण्याची पातळी झपाट्याने कमी होत जाते. म्हणूनच या दिवसातही भरपूर पाणी प्यावं. पाणी पिण्याचं तंत्रही लक्षात घ्यावं. म्हणजेच एका वेळी घटाघटा पाणी पिणं अयोग्य आहे. त्याऐवजी दर अर्धा तासाने अर्धा ग्लास पाणी प्यावं. जेवणाच्या आधी अथवा जेवणानंतर पाणी न पिता जेवणाच्या मध्ये मध्ये दर सहा-सात घासानंतर पाण्याचे दोन घोट घ्यावेत. यामुळे अन्नपचन सुकर होतं. या दिवसात जड आहार घ्यायचाच असेल तर दुपारच्या जेवणात घ्यावा. रात्री हलका आहार असावा. या दिवसात मांसाहार टाळावा. या काळातील व्रत-वैकल्यं आपल्याला हीच शिकवण देतात.



## हेल्थ वेल्थ

### उद्दिष्ट ठरवायला हवं

छोट्यांनो, तुम्ही आयुष्यात एखादं ध्येय किंवा उद्दिष्ट ठरवलं आहे का? यावेळी परीक्षेत चांगले मार्क मिळवायचे, नवी भाषा शिकायची, व्यायाम करायचा, स्पेलिंग पाठ करायची असं कोणतंही उद्दिष्ट असू शकतं. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी जोरदार सुरूवात केल्यानंतर गाडी मध्येच अडकते. ठरवलेलं काहीच होत नाही. यामुळे तुम्ही निराश होता. पण असं तुमच्या एकट्यासोबतच होत नाही. असे अनेकजण असतात. एखाद्या वेळी जमलं नाही तर प्रयत्न लगेच सोडून देऊ नका. 'मला जमत नाही' असं म्हणून रडत बसू नका. आयुष्यातलं उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी काय करायला हवं याविषयी...

✻ तुम्हाला नेमकं काय करायचं आहे ते आधी स्पष्ट झालं पाहिजे. समजा, तुम्हाला वजन कमी करून फिट बनायचं आहे. त्यासाठी नेमकं काय करायला हवं हे समजून घ्यायला हवं. यासाठीचा कालावधीही ठरवायला हवा. चार महिन्यात किती वजन कमी करायचं हे ठरवून कामाला लागलं तर निश्चितच चांगले परिणाम होऊशकतात. **क्रमश:**

## संगोपन

### हवं मोकळं संभाषण

✻ मुलांना समजावून चूक सुधारणं एका दिवसात घडत नाही. त्यासाठी बोलून दाखवलेले विचार आचरणात आणणंही गरजेचं आहे. मुलांसमोर पालकांनी खोटं बोलणं टाळावं. यातून मुलाला तुमच्याबद्दल विश्वास वाटू लागतो. अशा वेळी मुलांशी मैत्री करणं सहज शक्य होतं.

✻ लक्षात आणून द्या-

पालकांनी मुलांना त्यांची चूक शांत स्वरात लक्षात आणून देणं गरजेचं आहे. अशा वेळी मुलांना रागवल्यास चूक स्विकार करण्याची शक्यता कमी असते. त्यामुळे मुलांना चूक दाखवून देताना मैत्रीपूर्ण संभाषण ठेवावं.

✻ वेळ देणं-

अनेक पालक व्यस्ततेमुळे मुलांना वेळ देऊ शकत नाहीत. अशा वेळी संवाद साधनांच्या सहाय्याने का होईना, मुलांशी सतत संवाद साधत राहणं गरजेचं आहे.

## पंचांग

**मंगळवार, १५ जुलै २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, आषाढ कृ. ५, नक्षत्र : शततारका, पू. भाद्रपदा
चंद्रराशी : कुंभ, योग : सैभाग्य
सूर्योदय : ६.१२, सूर्यास्त : ७.१७

## फॉरवर्डस

**ज़िन्दग़ी में मिला हर वो शख़्स होली सा था...**

**कुछ रंग भरतें ग़ये तो क़ुछ रंग बदलतें ग़ये...!**

## भटकंती

मॉन्सून हा भटकंतीसाठीचा मस्त काळ. हिरवेगार डोंगर, ताजी आणि गार हवा असं बरंच काही असल्याने तुम्ही सगळं मस्त एंजॉय करू शकता. पावसाळ्यात पिकनिक प्लॅन करायचा विचार करत असाल तर हे काही ऑप्शन्स तुमच्यासाठी आहेत.

✻ आंध्र प्रदेशमध्ये अराकू व्हॅली आहे. हे थंड हवेचं ठिकाण आहे. हा रस्ता हिरव्यागार रानातून जातो. आंध्र प्रदेश आणि ओरिसाच्या सीमाभागाजवळ हे ठिकाण वसलं आहे. मान्सूनमध्ये फिरण्यासाठीचं हे मस्त ठिकाण आहे. **क्रमश:**

## करिअरवाटा

### आयईएलटीएस द्यायचीये?

इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडमध्ये उच्च शिक्षण घ्यायचा विचार असेल तर इंटरनॅशनल इंग्लिश लँग्वेज टेस्टिंग सिस्टिम (आयईएलटीएस) परीक्षा उत्तीर्ण होणं गरजेचं असतं. बऱ्याच विद्यापीठांमध्ये प्रवेश घेण्यासाठी ही परीक्षा उत्तीर्ण होणं अनिवार्य नसलं तरी व्हिसासाठी अर्ज करताना त्याची गरज लागू शकते. आयईएलटीएसचे दोन स्तर आहेत. एक म्हणजे अ‍ॅकेडमिक आणि दुसरा जनरल. विद्यार्थ्यांना अ‍ॅकेडमिक तर नोकरीसाठी जाणाऱ्यांना जनरल स्तर उत्तीर्ण होणं गरजेचं असतं. वाचन, लेखन, संवाद आणि ऐकणं अशा चार विभागांमध्ये याची विभागणी करण्यात आली आहे. यासाठी दोन तास ४५ मिनिटांचा वेळ असतो. प्रत्येक विभागासाठी ठराविक वेळ देण्यात येतो. यापैकी वाचन, लेखन आणि ऐकण्याची चाचणी एकाच वेळी घेतली जाते. संवादाची चाचणी त्याच दिवशी किंवा परीक्षेच्या सात दिवस आधी अथवा नंतर घेतली जाते. या परीक्षेच्या प्रत्येक विभागासाठी विद्यार्थ्यांना एक ते नऊ पर्यंतचे गुण मिळू शकतात. सर्व विभागांची सरासरी काढून एकूण गुण ठरतात. ब्रिटिश काउंसिलतर्फे ही परीक्षा आयोजित केली जाते. वर्षातले ४८ दिवस यासाठी ठरवण्यात येतात. विद्यार्थी यापैकी एक दिवस निवडू शकतो.




## खेचाखेची

### केस ओले होतील

पावसाचे पाणी तांब्याच्या भांड्यात जमा करा! लक्षात ठेवा, भांडं तांब्याचंच हवं.
३ दिवस ते पाणी सकाळी १० ते दुपारी ४ या वेळात सुर्यप्रकाशात ठेवा. नंतर तांब्या सावलीत घ्या!
त्यानंतर दर रात्री ३ दिवस ते पाणी रात्रभर चंद्रप्रकाशात ठेवा. त्यावर प्रकाशाची तिरीप पडू देऊ नका.
त्यानंतर ते पाणी तुमच्या डोक्याला लावा अन पहा परिणाम! तुमचे केस ओले होतील!!!

## वेगळं काही

तैपैईमध्ये डीएस म्युझिक हे रेस्तराँ आहे. इथे वेट्रेस परिचारिकांसारखे कपडे घालून सेवा देतात. मॉस्कोमधल्या एका रेस्तराँमध्ये काम करणारे सगळे वेटर जुळे आहेत. इथे जुळ्यांना काम दिलं जातं. वेस्ट हॉलिवूडमधल्या एका रेस्तराँमध्ये अंधार असतो. इथे अंध वेटर सेवा पुरवतात. त्यामुळे इथे अंधार करण्यात येतो. एरीजोनातल्या एका रेस्तराँला हॉस्पिलटचा लूक देण्यात आला आहे. तसंच इथले वेटरही डॉक्टरांचे कपडे घालतात. बँकॉकमधल्या एका रेस्तराँमधले वेटर्स डोक्यावर कंडोमच्या आकाराची टोपी घालून सेवा पुरवतात. एचआयव्ही एड्स तसंच इतर लैंगिक आजारांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी ही संकल्पना लढवण्यात आली आहे.

## हेअर स्टाईल

### केसांना कर्ल हवेत

कर्ली हेअर स्टायलिंग हा एक लोकप्रिय ट्रेंड आहे. कमीत कमी वेळेत तुम्ही तो अनुसरु शकता. कसा ते पहा...



✻ वॉश, पीन अँड कर्ल- डीप कंडिशनिंग केल्याने केस खुलतात आणि हवा तसा लूक देणं शक्य होतं. म्हणूनच केस धुतल्यानंतर पाणी जाऊ द्या. यानंतर कर्ल पिन्सनी केस बांधून ठेवा. अशा स्थितीतच केस सुकू द्या. सुकल्यानंतर केस कर्ली होतील. ✻ हॉट रोलर्स- केस कर्ल करायला फारसा वेळ नसेल तर हॉट रोलर्सची मदत घ्या. ✻ कर्लिंग आयरन- केस कर्ल करण्याचा सर्वात सुटसुटीत पर्याय म्हणजे कर्लिंग आयरन. पण या आयरनचा सतत वापर केल्याने केस रुक्ष होण्याची शक्यता असते. ✻ पिन कर्ल करताना केस ओलसर असावे. त्यानंतर केसांचे चार समान भाग करा. त्यानंतर केस ट्विस्ट करा. ट्विस्ट केलेले केस कॉईलच्या आकारात रोल करून घ्या. त्यानंतर काही वेळाने या केसांवरून ड्रायर फिरवा. त्यानंतर केस मोकळे सोडा. केस कर्ल झालेले असतील. ✻ कर्लिंगसाठी हीटिंगच्या पर्यायांचा वापर करत असाल तर डिफ्युजरचा वापर अवश्य करा. यामुळे केसांचं कमी नुकसान होईल.

## सुडोकू - ३१७५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ९ | | | ४ | ५ | | २ | ६ |
| १ | | ६ | | | | | | |
| | | ८ | | | ७ | ४ | | ९ |
| | | ४ | ७ | | | | | ५ |
| ६ | | | ४ | | ९ | | | ८ |
| ९ | | | | | ८ | ६ | | |
| ८ | | १ | ६ | | | ७ | | |
| | | | | | | ५ | | १ |
| ४ | ६ | | ५ | २ | | | ८ | |

**टीप -**

✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.

✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू - ३१७४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | २ | १ | ७ | ५ | ३ | ८ | ६ | ४ |
| ५ | ३ | ६ | ९ | ८ | ४ | १ | २ | ७ |
| ७ | ४ | ८ | २ | १ | ६ | ९ | ५ | ३ |
| ६ | ७ | २ | १ | ४ | ९ | ३ | ८ | ५ |
| ८ | ९ | ३ | ५ | ७ | २ | ४ | १ | ६ |
| १ | ५ | ४ | ६ | ३ | ८ | ७ | ९ | २ |
| ३ | ६ | ५ | ८ | ९ | ७ | २ | ४ | १ |
| ४ | १ | ९ | ३ | २ | ५ | ६ | ७ | ८ |
| २ | ८ | ७ | ४ | ६ | १ | ५ | ३ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक ३१७५

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | | ३ | ४ | ■ | ५ | ६ | | ७ | ■ | ८ | ९ | ■ |
| १० | | ■ | ■ | ११ | | १२ | | | ■ | १३ | | | | १४ |
| १५ | | १६ | | ■ | १७ | | ■ | १८ | १९ | | ■ | | ■ | |
| २० | | | ■ | २१ | ■ | २२ | २३ | ■ | | ■ | २४ | | २५ | ■ |
| | ■ | २६ | २७ | | २८ | | | | | | ■ | ■ | २९ | |
| ३० | ३१ | | | ■ | | ■ | | ■ | | ■ | ३२ | ३३ | | ■ |
| ■ | ३४ | | ■ | ३५ | ■ | ३६ | | ३७ | | ३८ | ■ | ३९ | | ४० |
| ४१ | | ■ | ४२ | | ४३ | | ■ | | ■ | ४४ | ४५ | ■ | ४६ | |
| ४७ | | ४८ | | ■ | ४९ | | ५० | ■ | ५१ | | | | ■ | |
| | ■ | ५२ | | ५३ | | ■ | ५४ | ५५ | | | | ■ | ५६ | |
| ■ | ५७ | | ■ | | ■ | ५८ | ■ | ५९ | | ■ | ६० | | | ■ |
| ६१ | | | ६२ | ■ | ६३ | | | ■ | ६४ | ६५ | | ■ | ६६ | ६७ |
| | ■ | ६८ | | | | | ■ | ६९ | ■ | ७० | | ७१ | ■ | |
| ७२ | ७३ | ■ | | ■ | ■ | ७४ | | | ७५ | ■ | ■ | ७६ | | |
| ७७ | | | ■ | ७८ | | | ■ | ७९ | | | | | ■ | |

**आडवे शब्द :-**
१) ताजमहालाचा दगड
५) सरसनीरस, बरेवाईट
८) शरीर
१०) शिळाच्या विरुद्ध
११) नगरपलिकेचा अध्यक्ष
१३) सटरफटर, किरकोळ सामान
१५) दुर्दशा
१७) अंधार
१८) बेचव
२०) जन्म
२२) ढीग
२४) पायदळाचा शिपाई
२६) मनाचे श्लोक लिहिणारे
२९) झकास
३०) व्यायाम
३२) पुन्हा
३४) राझी
३६) अनुमती
३९) पोत्याचे कापड
४१) जननी
४२) गुणाकारच्या विरुद्ध
४४) बारा वर्षाचा काळ
४६) धातूचा धागा
४७) रात्रभर
४९) बाजेची सुती पट्टी
५१) विनाकारण
५२) मत देण्याची क्रिया
५४) कौरव पांडवांची कथा
५६) गरळ ओकणारा सरपटी प्राणी
५७) विविध
५९) सूर्याचे एक नाव
६०) डोंगर
६१) शूर पुरुष
६३) अशुभ सावली
६४) मान, प्रतिष्ठा
६६) बशीचा जोडीदार
६८) चित्रपटाचा पडदा
७०) रत्न
७२) माफ
७४) युद्धात आलेले मरण
७६) वर्तुळ
७७) लोकनाट्य
७८) ✻✻✻ निर्यात
७९) स्तुती

**उभे शब्द :-**
१) राग उत्पन्न करणारा
२) गणपतीचे एक नाव
३) इंग्रजीत एक
४) रक्त(ग्रा)
५) उद्देश, जे साधावयाचे ते
६) असुर
७) धोबी
८) कोल्हापुरची महालक्ष्मी
९) हत्ती
१२) वंदनाचा एक शब्द
१४) पोपट
१६) अरण्यातील वाट
१९) दुसऱ्याच्या कबजातील
२१) अर्जुनाचे एक नाव
२३) सद्वर्तन
२५) उणीव, न्यूनता
२७) अभिप्राय
२८) भूपती
३१) वाकबगार
३३) निमग्न
३५) दोरा
३६) उद्याच्या नंतरचा दिवस
३७) बातमी
३८) कवी
४०) फळाचे साल
४१) विश्राम
४२) हिंदुस्थान
४३) अरण्य
४५) पुन्हा पुन्हा
४८) सामन्यातील पराक्रमी खेळाडू
५०) दारूचा एक प्रकार
५१) श्रद्धा नसलेला
५३) गुलामी
५५) फुलाची माळ
५७) बाई
५८) प्रफुल्लित
६१) प्रणयलीलेत नखाने काढलेला ओरखडा
६२) रात्र
६३) सर्प
६५) किंमत
६७) पळून जाणे
६९) जेवायला बसलेल्यांची रांग
७१) वधू
७३) आईचा भाऊ
७५) नदीचा काठ

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्र | शां | त | सा | ग | र | ■ | क | स | र | त | ■ | ख | रा | ब |
| ता | त | ■ | रा | ज | व | ट | ■ | म | द | न | बा | ण | ■ | ल |
| र | ता | ळे | ■ | रा | ■ | प | ला | य | न | ■ | ल | ■ | पा | क |
| णा | ■ | ■ | का | ज | वा | ■ | ड | ■ | क | था | क | थ | न | ■ |
| ■ | सा | ग | र | ■ | स | र | का | र | ■ | पे | ■ | ट्टे | ■ | वा |
| उ | ■ | व | ण | वा | ■ | क्ष | ■ | क | स | बा | ■ | खो | ल | ■ |
| प | र | त | ■ | ता | जा | क | ल | म | ■ | ज | ग | र | हा | टी |
| का | ज | ■ | जा | व | ई | ■ | ट | पा | ल | ■ | वा | ■ | न | ■ |
| र | ■ | म | ग | र | ■ | का | ■ | त | व | की | र | ■ | स | सा |
| ■ | ध | ■ | र | ण | बा | व | रा | ■ | ■ | र | ■ | प्र | हा | र |
| आ | व | र | ण | ■ | र | ■ | वा | त | ■ | वा | ल | ■ | न | वा |
| व | ■ | ख | ■ | म | दा | र | ■ | हा | ■ | ल | ट | का | ■ | न |
| ई | श्व | र | ■ | ज | न | क | ज | न | नी | ■ | ल | ■ | तों | ■ |
| ■ | ■ | खी | र | ■ | ■ | मा | ल | ■ | र | हा | ट | गा | ड | गे |
| अ | नं | त | ■ | अ | व | ला | द | ■ | द | र | ■ | ज | ■ | ह |

# धारणीतही बार असोसिएशनने पाळला राज्यव्यापी संप; व्यापार प्रतिष्ठाने कळकळीत बंद

(पाराशर बुलबुले)

धारणी दि. १४ : इंडियन हॉटेल एण्ड बार असोसिएशनकडून पुकारण्यात आलेल्या राज्यव्यापी संपाच्या पार्श्वभूमीवर आज सोमवारी मेळघाट व्यापार नगरी धारणी शहर तथा विदर्भ पर्यटनस्थळ चिखलदरा अश्या दोन्ही शहरातील मद्य व्यवसाय संबंधित बार एण्ड रेस्टॉरंट तथा परमीट रूम सारखी असंख्य प्रतिष्ठाने दिवसभर कळकळीत बंद होती.



राज्य तथा केंद्र सरकार मार्फत वॅट कर तथा उत्पादन शुल्क दरात झालेली वाढ आणि महागाईचा परिणाम अन्यायकारक असल्याच मत व्यक्त करीत इंडियन हॉटेल एण्ड बार असोसिएशन तर्फे संपूर्ण महाराष्ट्रभर सोमवारी दिवसभर एक दिवसीय राज्यव्यापी संप पुकारण्यात आला होता. त्याचे तिव्र पडसाद आज धारणी तथा चिखलदरा अश्या दोन्ही शहरभर दिसून आले. मद्य व्यवसायिकांनी आपापली बार एण्ड रेस्टॉरंट तसेच परमीट रुम व्यवस्था संपूर्ण दिवसभर बंद ठेवून कळकळीत संप पुकारला. त्यामुळे दोन्ही शहरातील मद्यप्रेमींची चांगलीच तारांबळ उडालेली दिसून आली.

बार तथा परमीट रूम मालकांच्या मते वॅट कर, उत्पादन आणि परवाना शुल्क यात प्रचंड वाढ झाली असून ग्राहकांवर त्याचा अतिरिक्त भार पडणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील मद्य व्यवसाय सुरू ठेवणे यापूढे अत्यंत कठीण होणार आहे. त्यामुळे राज्य सरकारने यासंदर्भात फेर विचार घेत तातडीने लादलेला निर्णय माघे घ्यावा. अन्यथा संपाची सिमा यापूढे अधिक तिव्र होवू शकते.

धारणी आणि चिखलदरा शहरातील जवळपास ५० पैक्षा अधिक परवानाधारक मद्य व्यवसायिकांनी आपापाली प्रतिष्ठाने कळकळीत बंद ठेवून या राज्यव्यापी संपामध्ये सहभाग नोंदविला मद्य व्यावसायिकांच्या मते सरकार तर्फे लादलेली दर वाढ निषेधपूर्ण असून 'वॅट' करात केलेली दुप्पट दर वाढ, परवाना शुल्कात केलेली १५% व उत्पादन शुल्कात केलेली ७% दर वाढ ही अन्यायकारक असून या घोषित राज्यव्यापी संपास जाहीर समर्थन असल्याचे मत रसना वाईन तथा परमीट रुम संचालक सुनिल चौथमल यांनी 'दैनिक हिंदुस्थान' कडे व्यक्त केले आहे.

# 'इश्क सुफियाना' ने अमरावतीकरांना दिली संगीतमय मेजवानी

## रिमझिम पावसातही रसिक श्रोत्यांनी अनुभवला सुरांचा महोत्सव

अमरावती दि. १४ : Rhythm Divine Musical Group यांच्या वतीने जोशी हॉल, अमरावती येथे अलीकडेच आयोजित करण्यात आलेला 'इश्क सुफियाना' हा संगीतमय कार्यक्रम रसिक श्रोत्यांच्या मनावर गारुड करून गेला. १९८० ते २००० या कालखंडातील अजरामर हिंदी चित्रपट गीतांचा मनोहारी संगम या संगीतमय पर्वात रसिकांना अनुभवायला मिळाला.




संगीताच्या सुरेल लहरी आणि भावस्पर्शी गायकांच्या सादरीकरणाने रसिक श्रोते मंत्रमुग्ध झाले. अमरावती शहरात संगीतातील सुवर्णकाळातील गाण्यांचा असा आगळावेगळा अनुभव घेण्याची ही एक पर्वणी ठरली.

कार्यक्रमाची सुरुवात अत्यंत भक्तिभावाने झाली. श्री सरस्वती पूजन आणि दीपप्रज्वलन वरिष्ठ नागरिक श्री अशोक बर्डेकर सर तसेच इतर मान्यवरांच्या शुभहस्ते पार पडले. या मंगलप्रसंगी Rhythm Divine Musical Group चे सर्व संचालक, संगीतप्रेमी, विविध क्षेत्रातील मान्यवर आणि मोठ्या संख्येने रसिक उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे उत्कृष्ट संगीत संयोजन. या सुरेल संगीतमय संध्याकाळीसाठी श्री सचिन गुडे, श्री गजानन देऊळकर आणि त्यांच्या Symphoney group च्या कुशल ऑर्केस्ट्रा टीमने अत्यंत सुसज्ज आणि हृदयस्पर्शी संगीत संयोजन केले होते. प्रत्येक गीतासाठी योग्य त्या वाद्यवृंदाची निवड, सुसंगतता, आणि त्या-त्या गायकांच्या शैलीशी साजेसे संगीत हे यशस्वीपणे साध्य करण्यात आले.

गायनाच्या या मैफिलीत सहभागी झालेले प्रमुख गायक आणि गायिका त्यांच्या सादरीकरणांमध्ये होते: श्री अरविंद मोकादम, प्रा. डॉ. प्रितेश गुंबळे, ॲड. मिलिंद जोशी, डॉ. अनिल काळे, श्री ठाकूर, इंजी. महेश कोकाटे, प्रा डॉ. प्रवीण चौधरी, सौ. निशा वानखेडे, कु. अनघा लोणारे, श्री गुरुमुर्ती चावली, , श्री प्रदीप काळे, सौ. श्वेता धारपाळ, इंजी. दीपक सुतावणे, श्री प्रदीप खवले, सौ. अनीता खवले, तसेच आयोजक प्रा. डॉ. आशिष बर्डेकर, प्रा. स्वप्नील सावळकर आणि डॉ. आनंद देशमुख यांनी आपल्या सुरेल आवाजात गाणी सादर केली.

सादर करण्यात आलेली काही विशेष गीते: तुमसे मिलने की तमन्ना है, ऐसी दीवानगी देखी नहीं कहीं, सोचेंगे तुम्हें प्यार करें की नहीं, आके तेरी बाहों में, तू शायर है, मेरी मखना, चाहा तो बहुत, काटे नहीं कटते ये दिन ये रात, लगी आज सावन की झड़ी, सुन सुन सुन बरसात की धुन, चेहरा है या चाँद, प्रियतमा, आँखों से तूने ये क्या कह दिया..

या सर्व गीतांनी रसिकांची मने जिंकली. गायकांच्या भावपूर्ण सादरीकरणामुळे श्रोते कार्यक्रम संपेपर्यंत जागचे हाललेही नाहीत. कार्यक्रमादरम्यान, उपस्थित प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, टाळ्यांचा कडकडाट आणि पुन्हा गाण्याची मागणी यामुळे संपूर्ण वातावरण भारून गेले होते.

विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे, अमरावतीमध्ये त्या दिवशी जोरदार पावसाचे वातावरण होते. तरीही, संगीतप्रेमी श्रोत्यांची उपस्थिती थक्क करणारी होती. छत्र्या, रेनकोट्स आणि पावसाच्या सरी झेलत रसिकांनी आपली उपस्थिती दाखवून दिली की खरे प्रेम संगीतावरच आहे.

Rhythm Divine Musical Group चे संचालक मंडळ - प्रा डॉ आशिष बर्डेकर, प्रा स्वप्नील सावळकर आणि डॉ आनंद देशमुख यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाचे नियोजन, गायकांची निवड, ध्वनी व्यवस्था, आणि मंच व्यवस्थापन यामध्ये त्यांनी सर्व बारकावे लक्षात घेतले.

कार्यक्रमाच्या शेवटी आयोजकांकडून उपस्थित सर्व मान्यवरांचे, गायकांचे, वादकांचे आणि प्रेक्षकांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. श्रोत्यांनी कार्यक्रम संपल्यानंतर आपल्या प्रतिक्रिया दिल्या, त्यामध्ये अनेकांनी अशीच संगीत मैफिल पुन्हा-पुन्हा अनुभवण्याची इच्छा व्यक्त केली

या कार्यक्रमाद्वारे Rhythm Divine Musical Group ने सिद्ध केले की, उत्तम नियोजन, संगीतावरील प्रेम आणि रसिक श्रोत्यांची साथ यामुळे अमरावती शहरात दर्जेदार संगीत कार्यक्रम घडवून आणणे शक्य आहे.

# बांधिलकी प्रतिष्ठानद्वारा पर्यावरण संरक्षण अभियान




अमरावती दि. १४ : बांधिलकी प्रतिष्ठान अमरावती द्वारा आयोजित पर्यावरण संरक्षण अभियानातर्गंत काल दिनांक १२ जुलै२०२५ रोज शनिवारला कापडी पिशवी दिनाच्या निमित्ताने जि. प .प्राथमिक मराठी शाळा गोविंदपूर तसेच जि. प. प्राथमिक शाळा उतखेड पं .स अमरावती येथे वृक्षारोपण तसेच कापडी पिशवी दिनानिमित्त प्लास्टिक निर्मूलन यावर मुलांना गाणी आणि कवितांच्या माध्यमातून माहिती देण्यात आली. त्याचबरोबर प्लास्टीकचा वापर टाळून कापडी पिशवीचा वापर करण्याबाबत मुलांशी संवाद साधला. बांधिलकी प्रतिष्ठान तर्फे विद्यार्थ्यांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

बांधिलकी प्रतिष्ठान तसेच बांधिलकी सार्वजनिक वाचनालय तसेच बालसंस्कार केंद्राच्या संचालिका सीमाताई भांदर्गे यांनी मुलांना कापडी पिशवी तसेच प्लास्टिकच्या पिशव्या ज्याला आपण पन्नी म्हणतो दोन्ही प्रकारच्या पिशव्या वापराचे फायदे तोटे उदाहरणासह समजावून सांगितले. बांधिलकी प्रतिष्ठानच्या कोषाध्यक्षा संगीत विशारद असलेल्या छायाताई पाथरे यांनी त्यांच्या गोड आवाजात पर्यावरणगीत सादर करून विद्यार्थ्यांनाही गीत शिकविले. बांधिलकी प्रतिष्ठानचे प्रसिद्धीप्रमुख अक्षरशिल्प प्रकाशनचे संचालक श्री. विकास राऊत तसेच सौ. हेमा राऊत यांनीही विद्यार्थ्यांशी पर्यावरण संरक्षणासाठी आपण काय काय करू शकतो या बाबत संवाद साधला.

बांधिलकी प्रतिष्ठानच्या संस्थापक अध्यक्षा ड. डॉ. नीता प्रफुल्ल कचवे यांनी मुलांना आपली जन्मदाती पालनपोषण करणारी आई तसेच पालनपोषणासाठी लागणारे अन्नधान्य , पाणी, ऑक्सीजन, देणारी पृथ्वी आई दोन्ही आपल्या आई असून जन्मदात्या आईप्रति जी भावना आहे ती पृथ्वी आई विषयी असावी याबाबत संवाद साधून मुलांना आवडेल असे पर्यावरणावरील स्वरचित एक गीत मुलांकडून नृत्यासह गाऊन घेतले.

गोंविदपूर तसेच उतखेड शाळेतील विद्यार्थ्यांचा विकास तसेच शालेय परिसर आणि विद्यार्थी व शिक्षक यांच्या संयुक्त विद्यमाने बनविलेल्या, शैक्षणिक साहित्याने सजलेल्या वर्गखोल्या पाहून शाळेचे मुख्याध्यापक तसेच शिक्षक यांच्या मेहनतीला सलाम करावासा वाटतो हे उल्लेखणीय.

जि .प . शाळा गोविंदपुरच्या मुख्याध्यापिका सौ . संध्या थोटांगे तसेच सहाय्यक शिक्षिका सौ. जयश्री गुल्हाने तसेच निशा दातिर युवा कौशल्य रोजगार शिक्षक तसेच सुखदेव पंधरे मदतनीस , त्याचप्रमाणे विद्यार्थांचे ,वृक्षारोपण तसेच पर्यावरण जागृती उपक्रम यशस्वी करण्यास मोलाचे सहकार्य लाभले.

तसेच उतखेड शाळेचे मुख्याध्यापक श्री. अभय मुळे, सहाय्यक शिक्षिका सोनाली पांडे,वनिताताई सोळंके अध्यक्षा शाळा व्यवस्थापण समिती, अनिताताई ब्राम्हणे माजी अध्यक्षा शाळा .व्यवस्थापन समिती, बेबी मेश्राम अंगणवाडी सेविका ,नंदा पाटील अंगणवाडी मदतनीस तसेच विद्यार्थ्यांच्या मोलाच्या सहकार्यामुळे जि .प.उतखेड शाळेत घेण्यात आलेला कार्यक्रम यशस्वी झाला.

जनसेवक महेश मुलचंदानी तसेच सौ. मंजू अडवाणी यांच्या सहयोगामुळे वृक्षारोपणाकरीता वृक्ष उपलब्ध झाले त्यामुळे बांधिलकी प्रतिष्ठानच्या अध्यक्षा ड .डॉ . कचवे यांनी त्यांचे विशेष आभार मानले.

# वडाळगव्हाणची मुलगी टि सिरीज कंपनीच्या मंचावर

(अनंत बोबडे)

येवदा दि. १४ : दर्यापूर तालुक्यातील वडाळगव्हाण या छोट्याशा गावातील मुलगी चित्रपट सृष्टीतील नामांकित असलेल्या टी सिरीज या कंपनीच्या मंचर पोचली आहे प्रीती तायडे अशी मुलीचे नाव असून ती दर्यापूर तालुक्यातील वडाळ गव्हाण लहानशा गावातील रहिवासी असून अत्यंत सामान्य कुटुंबातील आहे ,ती मेहनत व जिद्द व कलागुणांच्या जोरावर टि सिरीज सारख्या नामांकित कंपनीच्या मंचावर जाऊन पोहोचली आहे ग्रामीण भागातील मुलगी देखील पुढे जाऊन गावाचे नाव लौकिक करू शकते हे तिने दाखवून दिले आहे, तिचे सर्वत्र कडे अभिनंदन होत आहे.



## विठु तुझ्या हाकेवरी

चंद्रभागेच्या तीरी
दोन्ही हात कटीवरी,
युगे अठ्ठावीस झाली जरी
उभा आहे विटेवरी.
पांडुरंग माझा पंढरपुरी
पाहयचा आहे डोळेभरी,
बोलव मला एकदा तरी
ठेवायचे डोके चरणावरी.
भगवी पताका हातावरी
झोळी घेऊन खांद्यावरी,
विठ्ठल विठ्ठल तोंडावरी
येईल होऊनी वारकरी.
पांडुरंग, विठ्ठल, सावळा हरी
अखंड आशीर्वाद भक्तांवरी
सुख नांदावे शेतकऱ्यांच्या घरी
मागणं इतकेच तुझ्या पायरी.

**पवन नयन जायसवाल**
'पूर्णिमा', किशोर नगर,
अमरावती मो. ९४२१७८८६३०

## कृपावंत तू

कृपावंत तू
विनविते मी तुला
आशीर्वाद मला हवा
आधार मनाला
देवा तुझाच आहे
स्मरणात राहे
अनुभव
नामाची थोरवी
माहीत साऱ्या जगतात
तूच जीवनात
सोबतीला
चंचल मन
भटके ओढाळ गुराप्रमाणे
करते दिवाणे
मायाजाळात
माझी विनंती
तुला हात जोडून
घे सांभाळून
दीनानाथा

**प्रतिभा पिटके**
अमरावती मो. ९४२१८२८४१३

# निराधार मुलांना डॉ.चित्रा ढवळे यांचा हृदयस्पर्शी आधार




अमरावती दि. १४ : संत गाडगेबाबा यांच्या कृतीशील संदेशात प्रमाणे आधार फाऊंडेशनचा निराधार फासेपारधी बाल विकास संस्था,राजुरा येधे कार्यक्रम संपन्न झाला. अमरावती शहरात पासुन १० कि.मी.अंतरावर निराधार फासेपारधी (मुला-मुलींचे निवासी) विकास संस्था कार्यरत आहे. संस्था चालक सौ. निकीता पवार यांनी अतिशय कष्टातुन व जिद्दीने पारधी मुलांच्या कल्याणार्थ कार्यरत आहेत. त्यांच्याशी पवित्र कार्यात आधार फाऊंडेशन सतत मदतीचा आधार देत आहे. रवि. दि. १३ जुलै २०२५ ला स. १० वा. आधारच्या संचालक डॉ. चित्रा ढवळे यांनी चटई वर झोपणाऱ्या सर्व २० मुलांसाठी नविन गादया देऊन मायेची उब दिली.

या आगळ्यावेगळ्या मदतकार्या प्रसंगी डॉ चित्रा ढवळे व प्रा. सविता बाजड यांनी मुलांना शिक्षणाचे व स्वच्छतेचे महत्व सांगुन मार्गदर्शन केले. या प्रसंगी श्री प्रभुजी नरवणे , श्री अरविंदजी विंचुरकर , डॉ सुधीरजी बाजड ,श्री सुनिलजी फुसे , श्री राजेन्द्रजी शेगोकार , सौ.शेगोकार , प्रा. अनंतराव बाजड , प्रा. सविता बाजड , प्रदीप बाजड व सो. वैशाली बाजड, डॉ. अनिल ढवळे यांच्या उपस्थितीत या निराधार मुलांच्या सोबत फराळ घेऊन आनंद निर्मीतीने कार्यक्रम संपन्न झाला.

# रायसोनीतुन एकदा घेतलेल्या कायद्याच्या शिक्षणाचा सूगंध किर्तीही थांबवला तरी थांबणारा नाही : डीन डॉ. निता नाथ



अमरावती दि.१४ : चंदन कापला तरी सुगंध सोडत नाही.ऊस गाळला तरी गोडवा सोडत नाही.झाड जरी फळ नसलं देत तरी सावली देणं कधी सोडत नाही.सूसंस्कारी मनुष्य कोणत्याही परिस्थितीत आपले संस्कार सोडत नाही.त्याचप्रमाणे प्रामाणिकपणे कायद्याचे शिक्षण घेउन सामाजिक ऋण फेडण्यासाठी सर्वकाळ स्वतःसह सर्व सामान्य माणसापर्यंत न्याय कसा पोहचणार आणि आजच्या काळात गुंतागुंतीच्या समस्या कायद्याच्या चौकटीत राहून कशा सोडविता येतील याचे कौशल्यपूर्ण कायद्याचे शिक्षण घेतांना विद्यार्थ्यांनी प्रत्येक प्राध्यापकांच्या शिकविण्याची शैली ओळखून एकरुप व्हावे म्हणजे आयुष्यभर तुमच्यातील कायद्याचा सूगंध कितीही थांबवला तरी कधीच थांबणार नाही अशा आशयाचे विचार नुकतेच रायसोनी स्कूल ऑफ लॉ अर्थात एस एल ओ च्या माननिय डीन डॉ.निता नाथ यांनी कायद्याच्या विद्यार्थ्यांना संबोधीत करतांना व्यक्त केले.त्या येथील विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात बोलत होत्या.याप्रसंगी प्रा.डॉ.रंजन डूबे,डॉ.मिनाक्षी काळे,प्रा.शितल वरणकर,प्रा.कोमल खाजोने,प्रा.रेणु मोहोड,प्रा.क्षितिजा देशमुख आदी शिक्षक गणं प्रामुख्याने उपस्थित होत्या.प्रा.कोमल खाजोने यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या सदर कार्यक्रमात मोठ्या उत्साहाने विद्यार्थ्यांनी भाग घेतला असून लायब्ररीचे महत्व जाणून कायद्याच्या विद्यार्थ्यांसाठी आता पूर्ण वेळ ग्रंथालयाचे प्रचंड भांडार उघडे ठेवून ज्ञानाचा लाभ कसा घेता येईल असा प्रयत्न डीन डॉ.निता नाथ यांनी केलेल्या सातत्यातून साकारल्या गेला.त्यांच्या या विशेष प्रयत्नाचे विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्तपणे स्वागत करण्यात आले हेही येथे उल्लेखनीय आहे.आदरणीय डीन डॉ.निता नाथ यांनी नुकत्याच हाती घेतलेल्या सदर लॉ कॉलेज च्या कार्यभाराने तसेच त्यांच्या मनमिळावू व समयसूचक स्वभावामुळे समस्त प्राध्यापक गण आणि कर्मचारी वर्ग तथा विद्यार्थी विद्यार्थीनी जाम खुश आहेत.

# नगरपंचायत तर्फे वृक्ष दत्तक योजना सुरू

## पर्यावरणाशी जपली बांधिलकी मुख्याधिकारी निवृत्ती भालकर यांची माहिती

नांदगाव खंडेश्वर दि. १४ : नगरपंचायत कार्यालय नांदगाव खंडेश्वर यांच्यातर्फे सर्व शहरवासीयांसाठी वृक्ष दत्तक योजना सुरू करण्यात आली आहे . या योजनेच्या माध्यमातून नगरपंचायत तर्फे मागणी केल्यानुसार नागरिकांना एक झाड दत्तक म्हणून दिले जाणार आहे . या झाडाचे संगोपन ही संबंधित नागरिकांची जबाबदारी असणार आहे.पर्यावरण संरक्षणासाठी सामाजिक सहभाग वाढावा यासाठी मुख्याधिकारी श्री निवृत्ती सिंधुबाई गणेश भालकर यांनी ही योजना राबविली आहे . या योजनेच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती वाढावी आणि पर्यावरणाप्रती संवेदनशीलता निर्माण व्हावी असा प्रयत्न असल्याचे मुख्याधिकारी श्री. निवृत्ती भालकर यांनी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना सांगितले . वर्षभर झाडांची योग्य काळजी घेणाऱ्या नागरिकांना नगरपंचायत सन्मानित करणार आहे . या योजनेमध्ये जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग नोंदवून वाढणाऱ्या पर्यावरणीय समस्यांवर उपाय म्हणून आपले नैतिक कर्तव्य पार पाडावे , असे आवाहन मुख्याधिकारी निवृत्ती भालकर व सर्व नगरपंचायत अधिकारी व कर्मचारी यांच्या माध्यमातून करण्यात आले आहे.




# घरकुल मोफत रेती योजना नावापुरतीच

## दलाल अन् माफियांचाच फायदा, एका ब्रास रायल्टीवर अनेक ब्रास रेती उत्खनन सूरू



नांदगाव खंडेश्वर दि. १४ : शासनाच्या विविध घरकुल योजनांसाठी मोफत रेती देण्याची योजना सरकारकडून आणण्यात आली. नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील प्रत्यक्षात मात्र या योजनेची अंमलबजावणी होताना दिसून येत नाहीये घरकुल धारकांना मोफत रेती भेटण्याऐवजी त्यांच्या खिशावर मोठा भार पडत आहे.वाळू मोफत मिळेल असं सरकार सांगतंय पण वस्तुस्थिती वेगळीच आहे,

तालुक्यातील बेबळा नदी नाले तून रेती काढण्यासाठी एक ट्रॅक्टर ट्रीपचं दर २००० रुपये आहे.असे ५ ट्रॅक्टर लागतात ज्याला खर्च १०,००० रुपये येतोय. यानंतर याप्रमाणे सामान्य नागरिकाला तब्बल ३० हजार ते ३५ हजार रुपये मोजावे लागत आहेत.खरं तर मोफत रेती योजना जनतेच्या फायद्यासाठी होती.पण सध्या ती खासगी दलाल आणि ट्रॅक्टर मालकांच्या फायद्याची बनली आहे.आता तरी याकडे तहशिदार यांनी लक्ष घालावं,आणि वाळूचा हा 'रेतीमाफिया'चा बाजार बंद करावा अशी मागणी होत आहे.

### खासगी दलाल, एजंट अन, ट्रॅक्टर मालकाचा वाटा

शासनाने जाहीर केलेल्या मोफत रेती योजनेचा उद्देश म्हणजे आर्थिकदृष्ट्या दुर्बळ नागरिकांना घरबांधणीसाठी मदत मिळावी. पण इथे ही योजना दलाल आणि माफियांकडून हडप केली जात असल्याचा आरोप होत आहे. मोफत रेतीचे नियमानुसार वितरण न होता तीच रेती नागरिकांना पैसे मोजून खरेदी करावी लागत आहे. काही ठिकाणी तर यासाठी हप्ते पद्धतीनेही पैसे घेतले जात असल्याचे सांगण्यात येत आहे?

रेती मोफत असल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात असला तरी प्रत्यक्षात नागरिकांना एका ट्रॅक्टर रेतीसाठी तब्बल ७ हजार ते १० हजार रुपये मोजावे लागत आहेत. एका हायवासाठी सुमारे ५ ट्रॅक्टर गरज भासते. एका ट्रिपसाठी साधारण २००० रुपये घेतले जातात. यावरच सुमारे १०,००० रुपये खर्च होतो. त्यानंतर या रेतीचं ट्रॅक्टर भरणं, त्याचं ट्रान्सपोर्टिंग यासाठी अतिरिक्त ५००० रुपये आकारले जातात. त्यात ट्रॅक्टर मालक, दलाल, खाजगी एजंट यांचाही वाटा असतो. या सगळ्या प्रकारामुळे घरकुल योजनेचे मूळ उद्दिष्टच हरवत चालले आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी असलेल्या योजनेचा लाभ खाजगी ट्रॅक्टर मालक आणि रेती दलाल घेत असल्याने नागरिकांमध्ये संताप आहे.

# चांदूर रेल्वेत दोन दिवसीय विदर्भस्तरीय अभया परिषद उत्साहात

## महाराष्ट्रातील ६० सेवाभावी संस्थांच्या प्रतिनिधींचा सहभाग

(उत्तमराव गावंडे)

चांदूर रेल्वे दि. १४ : स्थानिक साईबाबा ग्रामीण विकास संस्था, वंचित विकास - पुणे, उदयकाळ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय अभया एकल महिला परिषद ही शाश्वत कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र, सोनंगाव रोड, चांदूर रेल्वे येथे १२ व १३ जुलै ला मोठ्या उत्साहात पार पडली.



या परिषदेचे उद्घाटन १२ जुलै ला सायंकाळी ४ वाजता जेष्ठ समाजसेविका रजिया सुलताना, प्राचार्य विश्वास दामले, सुचिता बर्वे, मीनाक्षी नवले (पुणे), मयूर बागुल (पुणे), बंडू आंबटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. या दोन दिवसीय परिषदेला मीनाक्षी नवले (वंचित विकास पुणे), मयूर बागुल (पुणे), अजय डबले (जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, अमरावती), प्राची साळवे, प्रा. घनश्याम दरणे (यवतमाळ), अमोल रसे, प्रा. अनिता धुर्वे, सारिका वानखडे, निरूपमा देशपांडे यांचे मार्गदर्शन लाभले. या परिषदमध्ये महाराष्ट्र मधील ६० सेवाभावी संस्थांच्या प्रतिनिधींचा सहभाग होता. अभया अभियान हे एकल महिलांच्या विविध विकासात्मक कार्य करण्यासाठी विचार मंथन व दिशा ठरविण्यात आली. या दोन दिवशीय परिषद मध्ये कृतीशील एकल महिला भारती डोंगरे, संगीता ठाकूर, सुनीता वासनिक, गीता साठवणे, अनिता धाबर्डे यांना अभया नारी सन्मान देऊन सन्मानित करण्यात आले. महिला विकासावर कार्य करण्याऱ्या कार्यकर्त्या रंजिता तराळे (अमरावती), संगीता गायकवाड (अचलपूर), आरती कारंजेकर यांना नारी सन्मान, तसेच एकल महिलांच्या विकासवर कार्य करणारे संस्था प्रतिनीधी दिलीप बिसेन (ग्रामविकास संस्था भंडारा), तुषार हांडे (सेवाधर्म संस्था अकोला) यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या परिषदेचे प्रास्तविक बंडू आंबटकर, सूत्रसंचालन पल्लवी यादगिरे, आभार अनिता कांबळे यांनी केले. तसेच ही परिषद यशस्वीरित्या पार पडण्यासाठी हर्षाली आंबटकर, योगेश कांबळे, ओम गड्डीनकर, राजीव शिवणकर, अनुसया निशाद व इतरांचे सहकार्य लाभले.

# हरीसाल नजीक वाघाचा धुमाकूळ; माणसं भयभीत, बंदोबस्तासाठी तीन हत्ती तैनात

(पाराशर बुलबुले)

धारणी, १४ : मेळघाट व्याघ्र सीमेवर वसलेल्या हरिसालच्या नैसर्गिक जंगलात एक मादी वाघीन दोन पिल्लांसह आश्रयास आली असून ती मुक्त सौराचार करतांना आढळून आली. यादरम्यान तीने काही पाळीव गुराढोरांवर हल्ला चढवून भक्ष्य बनवल्याची ओरड आहे. त्यामुळे माणसं भयभीत आहेत.



यापूर्वी कारा, केशरपूर, हरीसाल आणि खोंगडा अश्या चार वेगवेगळ्या घटनेत दोन वर्षात चार माणसं वाघाने जीवानिशी ठार केली आहेत. त्यामुळे हरिसाल आणि रोरा अश्या दोन व्याघ्र सीमेत वसलेल्या दोन्ही गावी गावकऱ्यांमध्ये प्रचंड भीतीचं वातावरण पसरलेलं असून सतत रात्रीच्यावेळी गुरांच्या शिकारीसाठी शेतशिवारात फिरणाऱ्या या वाघीनीमुळे नागरिकांची झोप उडाली आहे. व्याघ्र विभागाने वाघीनीची वाढती हालचाल लक्षात घेता परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी अखेर तीन प्रशिक्षित हत्तींची तातडीने हरिसाल परिसरात तैनाती केली आहे.

हरिसाल आणि रोरा या दोन गावी रात्री अपरात्री वाघ आल्याची नागरिक ओरड असून गावकऱ्यांमार्फत प्रचंड भीती व्यक्त करण्यात आली आहे. मागील दोन आठवडाभरात दोन बैल व एक गाय फस्त केल्याचे स्पष्ट झाले आहे. स्थानिक लोकांच्या मते, वाघ रात्रीच्या सुमारास रस्त्यावर, शिवारात तसेच वस्तीच्या परिसरात फिरताना दिसून येतो. त्यामुळे शेतकरी, गुराखी आणि महिलांना दिवसाढवळ्या घराबाहेर पडण्यास धास्ती वाटत आहे. त्यामुळे परिस्थितीची गंभीरता ओळखून मेळघाट व्याघ्र प्रकल्प प्रशासनाने तातडीने विशेष पथकाची नियुक्ती केली असून, वाघाच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी ट्रॅप कॅमेरे बसवण्यात आले आहेत. या मोहिमेस अधिक बळकटी देण्यासाठी तीन प्रशिक्षित हत्ती हरिसाल परिसरात तैनात करण्यात आले आहेत. हे हत्ती वाघ शोध मोहीमेसाठी महत्त्वाचे ठरणार असून वाघ गाव वस्ती पासून नक्कीच दूर जंगल अरण्यमार्गे निघून जाईल असा कयास व्यक्त करण्यात आला आहे.

वाघीन व तिच्या बछड्यांचा शोध आणि संरक्षणासाठी जंगल परिसरात ट्रॅकिंग सुरू असून नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता व्याघ्र विभागाला सहकार्य करावे, असे आवाहन उपवनसंरक्षकांसह हरिसालचे वनपरिक्षेत्राधिकारी प्रदीप भड यांनी केले आहे. व्याघ्र कर्मचाऱ्यांच्या सतर्क गस्तीसोबतच रोरा, हरिसाल अश्या दोन्ही गावी ड्युटीवर असणाऱ्या व्याघ्र कर्मचार्यांच्याकडून लाऊडस्पीकरद्वारे जनजागृती सुरू करण्यात आली आहे.

**दीर्घकालीन उपाययोजना अपेक्षित**

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील जैवविविधतेचे संवर्धन करतांना मानव-प्राणी संघर्ष वाढत चालल्याचे वास्तव पुन्हा एकदा समोर आले असून अशा विपरित परिस्थितीत व्याघ्र विभागाच्या तात्काळ कारवाईची दिशा योग्य असली, तरी दीर्घकालीन उपाययोजना आणि गावकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी ठोस यंत्रणा निर्माण करणे अपेक्षित आहे, अशी प्रतिक्रिया प्रदीप भड, व्याघ्र परिक्षेत्र हरिसाल. गुगामल वन्यजीव मेळघाट. यांनी दिली.

# सूर्यकांत जोग दीपशिखा गुरुकुल सैनिक शाळेत गुरुपौर्णिमा साजरी

चिखलदरा दि. १४ : चिखलदरा येथील सूर्यकांत जोग दीप शिखा गुरुकुल सैनिक शाळेत नुकताच गुरु पौर्णिमेचा कार्यक्रम प्रभारी प्राचार्य श्री संदीप सावरकर यांच्या अध्यक्षते खाली संपन्न झाला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून श्री प्रवीण कराळे हे होते. प्रारंभी विद्यार्थ्यांनी सरस्वती व स्वर्गीय सूर्यकांत जोग यांच्या प्रतिमेच्या सामवेतच समस्त गुरुजनांचे पूजन केले.



श्रीकांत पुरी, गौरव बैस, माधुरी किटुकले, अनिरुद्ध चौधरी, युवराज मोहोड, हिमांशू वनवे यांनी याप्रसंगी गुरूंच्या प्रती आपली आदरयुक्त भाव सुमनांजली शब्द रूपाने अर्पित केली. तत्पश्चात गुरु पौर्णिमा उत्सवाचे प्रमुख अतिथी श्री. प्रवीण कराळे यांनी विद्यार्थ्यांना गुरुचे महात्म्य विविध उदाहरणांनी विशद करून गुरूंच्या प्रती आपण सदैव नतमस्तक व्हावयास पाहिजे, असे मार्गदर्शनात्मक उद्बोधन आपल्या मनोगतातून केले.

गुरुपौर्णिमा उत्सवाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य श्री संदीप सावरकर यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून गुरु शिष्य परंपरा ,आध्यात्मिक, भारतीय, संस्कृती, आणि गुरु शिष्याचे अभूतपूर्व नाते व ज्ञानसंपादनातील गुरु शिष्याची भूमिका आपल्या दृष्टांतात्मक प्रबोधनातून विद्यार्थ्यांना केली. सूर्यकांत जोग दीपशिखा गुरुकुल सैनिक शाळा ही गुरुकुल प्रणालीवर आधारित ज्ञान मंदिर असल्याकारणाने येथील गुरु शिष्यांचे नाते हे कृष्ण सांदिपनी, राम वसिष्ठ, चंद्रगुप्त चाणक्य, विवेकानंद रामकृष्ण, नामदेव विसोबा ,शिवाजी जिजाऊ , सचिन तेंडुलकर रमाकांत आचरेकर, अर्जुन द्रोणाचार्य ,अशा अनेकविध आध्यात्मिक, ऐतिहासिक, आणि सद्यस्थितीतील गुरु शिष्यांची मालिकाच आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांपुढे शब्द चित्राद्वारे उभे केली. गुरुपौर्णिमेच्या दिनी आपल्या गुरुजनांच्याप्रती आपला आदर हा सदैव व्यक्त होणारा असावा. त्याचप्रमाणे गुरूंनी दिलेल्या ज्ञानाचे आपल्या जीवनातील प्रत्येक क्षणामध्ये आंतरिक दैदीप्यमान अंतकरण प्रकाशमान होण्याकरिता व या ज्ञानाचा आपल्या उत्कर्षाकरिता आणि देशाच्या प्रगती करिता आपण उपयोग करावा तेव्हाच खरे गुरु चे ऋण फेडण्याचा आपला प्रयास पूर्ण होईल. गुरुचे ऋण आपण कदापिही फेडू शकत नाही पण त्यांच्या उपकाराची जाणीव ठेवून येणाऱ्या भावि काळात आपला व आपल्या देशाच्या सर्वांगीण प्रगती करिता आपण आपल्या प्राप्त ज्ञानाने झटावे हीच त्या गुरू च्या ऋणातून मुक्त होण्याचा एक अल्पसा प्रवास आणि प्रयास होऊ शकतो. मातृदेवो भव, पितृ देवो भव, आणि आचार्य देवो भव या अर्चनेतून आपण सदैव, निरंतर ,अव्यहतपणे मातृ, पितृ, आणि गुरु यांनी आपल्यात रुजवलेल्या ज्ञानाचा दीपक सदोदित प्रज्वलित ठेवावा असा मौलिक गुरु आदेश याप्रसंगी व्यक्त केलेल्या आपल्या मनोगताद्वारे श्री संदीप सावरकर यांनी विद्यार्थ्यांना दिला. कार्यक्रमाचे संचालन कुलदीप ढोरे याने केले, तर आभार वैभव नासरे याने मानले.

याप्रसंगी सूर्यकांत दीपशिखा गुरुकुल सैनिक शाळेचे समस्त गुरुजन, आणि विद्यार्थी गण मोठ्या संख्येने उपस्थित होते. अत्यंत भावस्पर्शी अशा वातावरणात या गुरुपूजन सोहळ्याची सांगता झाली.

# ‘ज्ञानगंगा घरोघरी’ हे ब्रीद मुक्त विद्यापीठाने सार्थक केले

## अभ्यासकेंद्र कार्यप्रणाली मार्गदर्शन कार्यशाळेचे डॉ.कुलट यांच्या हस्ते उद्घाटन

अमरावती दि. १४ : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने ज्यांच्यासाठी शिक्षणाची दारे बंद झाली होती अशांसाठी शिक्षणाची दारे खुली करून समाजातील शिक्षणापासून वंचित अशा मोठ्या समाज घटकाला शिक्षणाच्या प्रवाहात आणले.आज संपूर्ण महाराष्ट्रभर या विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्रांना विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद लाभत आहे. ‘ज्ञानगंगा घरोघरी’ हे ब्रीद विद्यापीठाने सार्थक केले आहे, असे मत श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अंबादास कुलट यांनी व्यक्त केले.



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अमरावती विभागीय केंद्राच्या वतीने स्थानिक श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या डॉ,पंजाबराव देशमुख सभागृहात आयोजित प्रवेश प्रक्रिया जून २०२५ व अभ्यासकेंद्र कार्यप्रणाली मार्गदर्शन कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे अमरावती विभागीय संचालक तथा वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार डॉ.जयवंत वडतेयांच्या अध्यक्षतेत आयोजित या कार्यशाळेला मुक्त विद्यापीठ नाशिकचे विद्यार्थी सेवा विभाग संचालक डॉ.प्रकाश देशमुख प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

या कार्यशाळेत विद्यार्थी सेवा विभाग संचालक डॉ.प्रकाश देशमुख यांनी विद्यापीठाच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या सर्व कार्याची माहिती दिली तसेच पीपीटी सादरीकरण केले.त्यांच्या सहकारी डॉ.पूनम वाघ आणि अक्षय गामणे यांनी प्रवेशासंबंधीच्या सॉफ्टवेअर बाबत माहिती दिली.

या कार्यशाळेत मुक्त विद्यापीठाचे नवनियुक्त विभागीय केंद्र संचालक तथा वरिष्ठ शैक्षणिक सल्लागारडॉ.जयवंत वडते यांचा श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ.अंबादास कुलट यांनी शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.तर अमरावती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ.नितीन चांगोले, मुक्त विद्यापीठाच्या सल्लागार समितीचे सदस्य विवेक जाधव व सुधन्वा हांडे यांच्या डॉ.वडते आणि डॉ.देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.उद्घाटन कार्यक्रमाचे संचालन डॉ.चतुर्भुज कदम यांनी व पाहुण्यांचे स्वागत सौ.सुनिता कानडे यांनी केले. डॉ.राजेश मिरगे यांनी आभार मानले.

डॉ.जयवंत वडते यांनी विद्यापीठाच्या विभागीय केंद्राचे संचालक तथा वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर अमरावती विभागात प्रथमच अशा प्रकारच्या कार्यशाळेचे आयोजन केले असल्याने या कार्यशाळेला अमरावती जिल्ह्यातील पाचही जिल्ह्यातील अभ्यासकेंद्र संयोजक, समन्वयक केंद्र सहकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# संत नरहरी अनासक्त कर्मयोगी : डॉ.सतीश तराळ



अमरावती दि. १४ : महामुनी संबोधले जाणारे संत नरहरी प्रज्ञावान ,प्रतिभा संपन्न कवी होते. ते उत्कृष्ट कलावंत ,प्रामाणिक सुवर्णकार, अनासक्त वृत्तीचे महान कर्मयोगी व वारकरी संप्रदायातील श्रेष्ठ संत होते अशा आशयाचे उद्धार डॉ सतीश तराळ यांनी काढले.

संत नरहरी माळवी सोनार संघातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी संत नरहरी सभागृहात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष माननीय राजूभाऊ अनासने होते. डॉ. सतीश तराळ पुढे म्हणाले कडवे शिवभक्त असणारे नरहरी विठ्ठल भक्त झाले व त्यांनी सगुणातून निर्गुण प्राप्तीचा मार्ग स्वीकारला. सभोवतांच्या प्राणी मात्रात ईश्वराचा शोध घेत त्यांनी भक्त आणि भगवंत यांच्यातील द्वैत दूर करून अद्वैतभाव निर्माण केला. ते उत्कृष्ट कलावंत, प्रामाणिक सुवर्णकार , अनासत्व वृत्तीचे महान कर्मयोगी व वारकरी संप्रदायातील श्रेष्ठ संत होते. आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने त्यांचे संतकाव्य श्रेष्ठ दर्जाचे आहे. सत्संग ,नामस्मरण व उत्कट भक्ती यातुन त्यांना आत्मसाक्षात्कार झाला व त्यांचा प्रपंच परमार्थमय झाला. याप्रसंगी सुवर्णकार समाजातील दहावी व बारावीत गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र, गुलाब पुष्प व शालेय साहित्य देऊन अतिथींच्या हस्ते सत्कार करण्यात आला .याप्रसंगी विचार पिठावर श्री राजाभाऊ धररमकर, डॉ. विनोद गुहे, श्री नितीन खांडेकर, प्रा. रवींद्र भाऊ प्रांजळे, मंगेश नेरकर प्रा. रवींद्र प्रांजळे आदी मंडळी उपस्थित होती .कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. रवींद्र प्रांजाळे सचिव नरहरी माळवी सोनार संघ यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्राचार्य अनिल प्रांजळे यांनी करून दिला .डॉ. सतीश तराळ यांचा सत्कार संस्थेचे उपाध्यक्ष राजाभाऊ धरमठोक व डॉ. विनोद गुहे यांनी केला. आभार प्रदर्शन डॉ. उमेश खांडेकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ संगीता ताई माथने व सौ निलिमाताई माथने यांनी केले. यावेळी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# रोटरी क्लब अचलपूरच्या नवीन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा उत्साहात संपन्न

## वंचितांच्या कल्याणासाठी रोटरीचे कार्य प्रशंसनीय : उपविभागीय अधिकारी बलवंत अरखराव

अचलपूर दि. १४ : येथील रोटरी क्लबच्या २०२५-२६ या कार्यकालातील नवीन कार्यकारिणीच्या पदग्रहण सोहळ्याचे आयोजन मोठ्या उत्साहात पार पडले. या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी (एसडीओ) बलवंत अरखराव आणि तहसीलदार संजय गरकल उपस्थित होते. कार्यक्रमात गौरव बन्सल यांनी अध्यक्षपदाची आणि ऋषी शाह यांनी सचिवपदाची सूत्रे स्वीकारली.



एसडीओ बलवंत अरखराव यांनी आपल्या भाषणात सांगितले की, रोटरी क्लब अचलपूरद्वारे मागासलेल्या, उपेक्षित आणि हाशियावर असलेल्या घटकांच्या कल्याणासाठी केले जाणारे कार्य अत्यंत स्तुत्य आहे. नव्या कार्यकारिणीने नवीन जोश व उमंगाने सामाजिक कार्यात आपली छाप नक्कीच उमटवावी अशी अपेक्षा आहे.

या कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्य म्हणजे रोटरी क्लबच्या ५० वर्षांच्या इतिहासात प्रथमच एखाद्या महिलेने सूत्रसंचालनाची जबाबदारी पार पाडली. प्रीती वर्मा खोजरे यांनी हे सूत्रसंचालन प्रभावी पद्धतीने पार पाडले.

रोटरी क्लबचे माजी गव्हर्नर निखिलेश त्रिवेदी यांनी आपल्या भाषणात रोटरी ही एक आंतरराष्ट्रीय पातळीवरील महत्वाची संस्था असून, तिचे कार्य सामाजिक बदलासाठी प्रभावी असल्याचे सांगितले. संस्थेच्या विस्तारासाठी युवक-युवतींना आणि महिलांना अधिक संधी देणे आवश्यक आहे, असेही त्यांनी नमूद केले.

तहसीलदार संजय गरकल यांनी रोटरी क्लबच्या कार्याची प्रशंसा करताना सांगितले की, राज्य सरकारच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी रोटरी क्लब प्रशासनासोबत नेहमी खांद्याला खांदा लावून कार्य करत आले आहे. या सेवांचे महत्त्व कधीच नाकारता येणार नाही. अभिनंदन बँकेचे अध्यक्ष ॲड. विजय बोथरा यांनी रोटरी क्लबच्या पन्नास वर्षांच्या कार्याचा आढावा घेत सांगितले की, समाजातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय दृष्ट्या वंचित घटकांना मदतीचा हात देण्याचे कार्य रोटरीने सातत्याने केले आहे.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्यांसह अनेक मान्यवर आणि रोटरी सदस्य उपस्थित होते. यामध्ये एसडीओ बलवंत अरखराव तहसीलदार संजय गरकल अभिनंदन बँक अध्यक्ष ॲड. विजय बोथरा डॉ. जुगल चिरानिया (अकोला) नंदू शेकोकार (आकोट) नीलेश परतानी (अमरावती) नवीन अध्यक्ष गौरव बन्सल सचिव ऋषी शाह कोषाध्यक्ष कैलाश खंडेलवाल रोटेरियन सदस्य दीपक गुल्हाने, पंकज मालवीय, राम ककरानिया, संतोष नरेडी, राजकुमार बर्डिया, कमल केजडीवाल, महेंद्र राठी, पंकज गुप्ता, सुरेंद्र बर्डिया, संजोग वैष्णव, विवेक लष्करी, मनीष खंडेलवाल, ललित राठी, श्याम मालू, रूपेश जैन नवीन प्रवेशित सदस्य: सारांश चौहान, मनीष सोनी, डॉ. निखिल गोतमारे, डॉ. श्रेयस कितुकुळे, डॉ. वैभव बर्डिया, संदीप गुप्ता, अश्लेष लोढे, आदेश बर्डिया, कमल बन्सल, घनश्याम शाह, धर्मेंद्र जैन, सर्वेश अग्रवाल, हर्ष हार्ले, परेश भंसाली, राजाभाऊ महाजन, राजेश अग्रवाल, पंकज शर्मा, पंकज गुप्ता

# सीताबाई संगई कन्या शाळा अंजनगाव सुर्जीच्या १५ विद्यार्थिनी शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी



अंजनगाव सुर्जी दि. १४ : सीताबाई संगई कन्या शाळा, अंजनगाव सुर्जी येथील इयत्ता ८ वी व इयत्ता ५ वी च्या विद्यार्थिनींनी महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षा २०२४-२५ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचा नावलौकिक वाढविला आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या या परीक्षेत शाळेतील एकूण १५ विद्यार्थिनींनी यश मिळवले आहे.

इयत्ता ८ वीच्या खालील विद्यार्थिनींनी ही परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण केली: पूर्वा रवींद्र येऊल, वसुंधरा मोहन पाटील, आनंदी नितीन गोळे, वैधवी रमेश ताळे, आस्था अशोक येऊल, स्वरा शशिकांत फुलंबरकर, खुशी प्रकाश अस्वार, मैथिली विशाल पटेल. तसेच इयत्ता ५ वी मधून : दिया विनोद माकोडे, गौरी नीलेश पायघन, हर्षदा रवींद्र पाटील, रिया नरेश टिपरे, सानिका निलेश धांडे, संस्कृती अरविंद वरधे, उन्नती गोपाल सगणे, या विद्यार्थिनींनी अत्यंत उत्तम गुणांसह ही परीक्षा पास केली. या यशाबद्दल शाळेचे, सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अविनाश संगई , उपाध्यक्ष डॉ. उल्हास संगई ,सचिव विवेक संगई, सहसचिव अजय संगई व प्रसाद संगई व सर्व व्यवस्थापन समिती सदस्य, मुख्याध्यापक श्री. मुरकुटे सर, पर्यवेक्षिका सौ. सांगोळे मॅडम आणि शाळेतील सर्व शिक्षकांनी विद्यार्थिनींचे हार्दिक अभिनंदन व कौतुक केले.

# लेडी गव्हर्नर डॉ. कमलताई गवई यांचे उत्साहात अभिष्टचिंतन



अमरावती दि. १४ : माझी लेडी गव्हर्नर आचार्य डॉ. कमलताई गवई यांचे ८३ व्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चाचे शहर जिल्हा सरचिटणीस संजय आठवले यांनी सपत्नीक वाढदिवसानिमित्त शाल व पुष्पगुच्छ देऊन माजी लेडी गव्हर्नर डॉ. कमलताई गवई यांना पेढा भरविला. आणि त्यांना दीर्घायुष्य लाभो त्यांच्याकडून समाजातील दलित शोषित पीडित व अन्यायग्रस्त व्यक्तींना मार्गदर्शन तथा दिलासा मिळो त्यांचे शरीर स्वास्थ्य सुदृढ व निरोगी राहो. तथागताच्या बौद्ध धम्मा चा प्रचार व प्रसार करण्यासाठी आणि बौद्ध धम्म वृद्धिंगत होण्यासाठी सत्कार घडो यासाठी संजय आठवले आणि सुनिता आठवले यांनी तथागत चरणी प्रार्थना केली.

माजी लेडी गव्हर्नर यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यासाठी प्रचंड गर्दी जमली होती समाजातील अनेक प्रतिष्ठित शीलवंत आणि गुणवंत गणमान्य व्यक्तींनी यावेळी प्रचंड उत्साहात काँग्रेस नगर स्थित कमलपुष्प या ठिकाणी हजेरी लावली होती.

भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चाचे शहर जिल्हा सरचिटणीस संजय आठवले, सुप्रसिद्ध ज्येष्ठ समाजसेवक डॉ. गोविंद कासट,सुनिता आठवले, समाजसेविका प्रभाताई आवारे,समाज भूषण कमलताई कांबळे, वैशालीताई प्रधान, प्रमोद कांबळे, मनोज थोरात, डॉ. धनराज चक्रे, पवन शेंडे, रजनीताई आमले,प्रवीण सरोदे, रोशन जंगम, यांच्यासह अनेक गणमान्य प्रतिष्ठित प्रतिभावंत महानुभावांनी माजी लेडी गव्हर्नर आचार्य डॉ. कमलताई गवई यांचे अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त आशीर्वाद घेतले आणि त्यांना निरोगी व सुदृढ दीर्घायुष्य लाभो यासाठी तथागत चरणी प्रार्थना केली.

# माहेर बहुद्देशीय संस्थेच्या वतीने सहल



अमरावती दि. १४ : महिलांच्या व मुलींच्या उत्थानासाठी गेल्या अनेक वर्षापासून काम करणाऱ्या माहेर बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने नुकतीच माहेर पदाधिकाऱ्यांची पावसाळी सहल काढण्यात आली. या सहलीमध्ये कोराडीची महालक्ष्मी मातेचे दर्शन तसेच विद्याभारती सांस्कृतिक भवन व नागपूर अमरावती रोडवरील सुराबर्डी येथील महादेवाचे दर्शन व गुफा बघण्यात आली. ही सहल माहेरच्या अध्यक्ष सौ सुरेखाताई लुंगारे यांच्या नेतृत्वात काढण्यात आली. यामध्ये पद्मा महल्ले ,मंदाकिनी ठाकरे, गीता चिमोटे, निशा तरोडकर, शितल चिमोटे, प्राध्यापक अलकनंदा तुळजापूरकर, वैशाली आरोकर ,ज्योती सालबर्डी ,माला दळवी, अनुराधा तांबट ,साक्षी मेसरे ,प्राध्यापक शीला काळपांडे, आदिती गुडदे, नीलिमा नागापुरे, आशा ठुशे, करुणा विटाळकर, अनिता खडतकर आदी महिला उपस्थित होत्या.

# ‘विरक्त नदीचा काठ’ कवितासंग्रहाचे प्रकाशन

अमरावती दि. १४ : लेखक कवी आणि चित्रकार सुनील यावलीकर यांच्या 'विरक्त नदीचा काठ ' या कवितासंग्रहाचे प्रकाशन बुधवारी (ता . १६ ) ला श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती येथील डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात सायंकाळी पाच वाजता मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यशवंतराव चव्हाण सेंटर अमरावती आणि मराठी विभाग श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूरचे कुलगुरू डॉ . अविनाश आवलगावकर राहतील.प्रमुख पाहुणे म्हणून कवयित्री व लेखिका डॉ. प्रभा गणोरकर, लेखक डॉ . रमेश अंधारे, प्राचार्य डॉ. अंबादास कुलट उपस्थित राहतील. अमरावतीकरांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन मराठी विभाग प्रमुख डॉ . सुवर्णा गाडगे, तसेच प्रकाशक सचिन सुकलकर आणि सुशील सुकलकर यांनी केले आहे.




# आणीबाणीतील कारावास भोगलेल्यांच्या हयात जोडीदारांनी अर्ज करण्याचे आवाहन

अमरावती, दि. १४ : आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेली व्यक्ती दि. २ जानेवारी २०१८ पुर्वी ह्यात नसल्यास त्याच्या पश्चात ह्यात जोडीदार पती, पत्नी केवळ अशा व्यक्तींनी मानधन मिळविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेली व्यक्ती दि. २ जानेवारी २०१८ पुर्वी ह्यात नसल्यास त्याच्या पश्चात ह्यात जोडीदार पती, पत्नी केवळ अशा व्यक्तीच अर्ज सादर करू शकतील. दोघेही ह्यात नसल्यास त्यांचे कायदेशीर वारसदार सदर योजनेंतर्गत मानधन किंवा थकबाकी मिळण्यासाठी अर्ज करू शकणार नाहीत. अर्जदारांनी अर्जामधील क्र. १२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मीसा, डीआयआर आणीबाणीखाली राजनैतिक अथवा सामाजिक कारणासाठी अटक झालेल्या आणीबाणी धारकाबाबतचे संबंधित पोलिस आयुक्त आणि जिल्हा पोलिस अधिक्षक, कारागृह अधिक्षक यांचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावेत.

# गुरुपौर्णिमेनिमित्त मुकुंद सराफ यांचे शिष्यांकडून गुरुपूजन सोहळा संपन्न



अमरावती दि. १४ : स्थानिक दस्तुर नगरात उस्ताद लड्डूमिया खां साहेब प्रतिष्ठान आणि सर्व शिष्य परिवाराच्या वतीने गुरुपौर्णिमा उत्सवाचा मंगलमय सोहळा शहरातील सुप्रसिद्ध तबलावादक मुकुंद सराफ यांचे प्रमुख उपस्थितीत रविवार, १३ जुलै रोजी 'प्रयास' सभागृहामध्ये मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला.

कार्यक्रमात मुंबई येथील उ.अल्लारखा साहेब आणि अमरावतीचे उ.लड्डूमिया खां साहेब यांचे शिष्य, सुप्रसिद्ध तबला नवाज मुकुंद सराफ सर व सौ.अर्चना सराफ यांचे सपत्नीक गुरुपूजन सोहळा शिष्य परिवारातर्फे करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी आकर्षक तबलावादन सादर करून गुरूंना अभिवादन केले. चि. शौर्य गुहे, तारक दलाल, मोहक घाटोळ, आराध्य गायकवाड, प्रसाद पांडे, प्रशांत दुधे, राहुल बलखंडे, स्वप्निल सरदेशमुख, स्वरांग केतकर, सोहम् जगताप, सिद्धेश टिकार, प्रथमेश गई, ओम् तायडे यांनी सादर केलेल्या तबलावादनाला गजानन पळसकर यांनी संवादिनीवर उत्कृष्ट साथ केली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून 'प्रयास' संस्थेचे संचालक डॉ.अविनाश सावजी, प्रा.नारायण दरेकर, प्रा.सुहास उमाळे, बच्चू पुंडलिक, श्री घाटोळ, श्री गुहे व प्रा.गजानन केतकर आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत दुधे यांनी तर आभार प्रदर्शन मीनल जगताप यांनी केले तर आयोजन अनामय पवार, समीर जगताप, राहुल बलखंडे, प्रशांत दुधे, स्वप्नील सरदेशमुख, स्वरांग केतकर, प्रीती बलखंडे, संपदा पवार व वैशाली दुधे यांनी केले. गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने झालेला हा कार्यक्रम अध्यात्म, कला आणि संस्कृतिच्या संगमाचे उत्तम उदाहरण ठरला.

# बाल मैत्रीपूर्ण आश्रमशाळेंतर्गत प्रकल्प अधिकारी व अपेक्षा होमीओ सोसायटीची समन्वय बैठक संपन्न

(पाराशर बुलबुले)

धारणी दि. १४ : मेळघाटातील आदिवासी जनजमातीय विद्यार्थ्यांसाठी नव्यानेच स्थापन करण्यात आलेल्या 'बाल मैत्रीपूर्ण आश्रमशाळा प्रकल्प' संदर्भात प्रकल्प कार्यालय तथा अपेक्षा होमीओ सोसायटीची मासिक आढावा समन्वयक बैठक ११ जुलै रोजी प्रभारी प्रकल्प अधिकारी नितीन व्यवहारे यांच्या अध्यक्षतेखालील संपन्न झाली.



याप्रसंगी प्रकल्पस्तरिय आश्रमशाळेचे संबंधित मुख्याध्यापक, वस्तीगृह अधीक्षक, बाल मैत्रीपूर्ण प्रकल्प समन्वयक तथा अपेक्षा होमिओ सोसायटीच्या प्रकल्प समन्वयिका ज्योत्स्ना मेहेकरे, आश्रम शाळा मोबिलायझर सौरभ यावलकर, नरेश साळवी, नितीन खटोले, सोमेश्वर चांदुरकर इत्यादींसह इतर तज्ज्ञ मंडळी उपस्थित होती.

या मासिक आढावा बैठकीमध्ये शालेय शिक्षणाव्यतिरिक्त इतर शैक्षणिक निर्मिती संदर्भात आवश्यक असणाऱ्या नानाविध विषयांवर साधकबाधक चर्चा घडवून आवश्यक त्या सर्व सोईसुविधा तातडीने सोडण्यासंदर्भात चर्चा घडवून आणण्यात आली ज्यामध्ये डिसें. २०२४ ते जाने. २०२५ यादरम्यान आश्रम शाळेच्या गरजा आधारित मूल्यांकनाच्या अभ्यासातून समोर आलेल्या मुद्यावर 'ट्रॅफिक सिग्नल' कलर तीव्रतेनुसार प्राधान्य क्रमनिश्चित करण्यात आला असून त्या गरजा आधारित मूल्यांकनावर शाळेच्या भौतिक व इतर सोयीसुविधांवर विस्तृत चर्चा करण्यात आली. सध्या स्थितीत काय बदल शाळांमध्ये गरजा आधारित मूल्यांकनानंतर दिसून आले आहेत यावर देखील चर्चा करण्यात आली. शाळेमध्ये तृतीय श्रेणी व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणात असलेली कमतरता, पहिली ते सातवीसाठी एकच शिक्षक, औषधांचा तुटवडा, एएनएम यांची नियुक्ती तर झाली मात्र औषधांची पर्यायी किट अध्यापही देण्यात आलेली नाही, विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र रुग्णवाहीका नाही, नवी शैक्षणिक सत्र सुरू होऊनही अध्याप विद्यार्थ्यांना पुस्तके, गणवेश व इतर शैक्षणिक साहित्य मिळालेले नाहीत. अनेक ठिकाणी स्वतंत्र भोजनगृह नाही. संख्येच्या तुलनेत पुरेसे बाथरूम व शौचालय सेवा उपलब्ध नाही, वॉल कंपाऊंड, संरक्षण भिंतींचे काम अर्धवट आहे. शाळेमध्ये मुलांची संख्या भरपूर आहे मात्र ऐन शाळेच्या वेळात लाईट नसते त्यावेळी पर्यायी व्यवस्था सोलर सुविधेद्वारे करण्यात यावी, शाळेतील वस्तीगृहांचे काम सुरू आहे मात्र फंड प्राप्त होऊ न शकल्यामुळे काम स्थगित झाले आहे, हजार विद्यार्थ्यांच्या मागे ८०० मुलांकरिताच बेड उपलब्ध आहे, काही शाळांमध्ये एक ते दहा वर्ग असून एकही शिक्षक उपलब्ध नाही अशी स्थिती आहे.

याचप्रमाणे शाळा स्तरावर असलेल्या शाळा व्यवस्थापन समितीला पत्रव्यवहार करून त्वरित शाळा व्यवस्थापन समितीचे प्रशिक्षण घेऊन समितीला सक्षम करण्याची गरज आहे. अशा अनेक विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.

# चांदूर रेल्वेत वृक्षारोपण व वृक्ष वाटपाचा कार्यक्रम संपन्न

## मराठी पत्रकार संघ व जि.प. शाळेचे संयुक्त आयोजन



(उत्तमराव गावंडे)

चांदूर रेल्वे दि. १४ : चांदूर रेल्वे तालुका मराठी पत्रकार संघ व जिल्हा परिषद माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ७ जुलै रोजी जिल्हा परिषद शाळेत वृक्षारोपण व वृक्ष वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला.



देवराई फाउंडेशन, पुणे व्दारे संचालित अमरावती जिल्हा शाखेतर्फे संपूर्ण जिल्ह्यात वृक्ष वाटप करून वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन कार्यक्रम राबविण्यात येत असून चांदूर रेल्वे मराठी पत्रकार संघ व जिल्हा परिषद शाळेच्या वतीने शाळेच्या मैदानात आमंत्रित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण व वृक्ष वाटप करण्यात आले. यावेळी उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे, डॉ. राजेश शेरेकर, तहसीलदार पुजा माटोडे, वनपरिक्षेत्र अधिकारी शितल घुटे, गटशिक्षणाधिकारी संदीप बोडके, स्टेशन प्रबंधक दिपिका वाजपेयी आदींची उपस्थिती होती. उपस्थितांनी वृक्ष लागवड व वृक्षसंवर्धन होत नसुन सृष्टीवरील पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज आहे म्हणून प्रत्येकांनी वृक्षारोपण वृक्षसंवर्धन करावे असा संदेश दिला. देवराई फाउंडेशन चे जिल्हा प्रभारी डॉ. राजेश शेरेकर यांनी सांगितले की, जिवंत असे पर्यंत भूतलावर १ लाख वृक्ष लागवड करण्याचा संकल्प केला. यावेळी उपअभियंता मनिषा खरय्या, ठाणेदार अजय आकरे, वैद्यकीय अधीक्षक आतिश पवार, गट शिक्षणाधिकारी संदीप बोडके, पंचायत समितीचे सुशिल यादव, रविंद्र दिवान आदी सुध्दा प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण शर्मा, सचिव बंडू आठवले राजेश सराफी, अभिजित तिवारी, प्रा. सुधिर तायडे, प्रा. प्रमोद इंगळे,अतुल उज्जैनकर, मंगेश बोबडे, मनोज गवई,अमोल ठाकरे,हरीश ढोबळे,सुभाष कोटेजा,दिनेश जगताप तर जि.प. शाळेतील मुख्याध्यापक डॉ. श्रीकांत देशमुख,अतुल शिरभाते,मनिषा देशमुख,साधना देशमुख,मनिषा यावले,विजया राऊत,नितिन येवतकर, मनोहर गभते,प्रियंका येवतकर,प्रकाश ठाकरे,सविता मळसणे,रूपाली सपाटे, सय्यद उमेर अहमद यांनी अथक परीश्रम घेतले.या वृक्षारोपण कार्यक्रमाला शहरातील प्रतिष्ठित नागरीक बच्चू वानरे, प्रविण्य देशमुख,डॉ वसंत खांडार,ॲड. राजेश अंबापुरे,अमोल देशमुख,डॉ सुषमा खंडार, सतिश देशमुख, बचपन इंटरनेशनल स्कूल फाउंडर मिनाक्षी रॉय, पीएसआय नंदलाल लिंगोट, हे.कॉं.शिवाजी घुगे, एपीआय शरद अहीरे, पीएसआय नितेश आंदळे, पंडे मॅडम, प्रविण मेश्राम, नगरपालिका कार्यालय अधीक्षक योगेश वासनिक,आशिष कुराडे,पल्लवी जांमोदकर,शारदा कावळे,मनिष कनोजे,बबलू इमले,देवराई समन्वयक बिपिन देशमुख,बाधकाम विभाग मंजूषा येवले,सुरभी सोनटके,गटसमन्वयक मंगेश उल्हे, विषयतज्ज्ञ श्रीनाथ वानखडे,केंद्रप्रमुख किरण पाटील, सुभाष सहारे आदी कार्यक्रमात उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुधीर तायडे, प्रास्ताविक बंडू आठवले तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक डॉ. श्रीकांत देशमुख यांनी केले.

### १००० रोपट्यांचे वाटप

जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना व बचपन स्कूल ५० रोपटे, समाजसेवक प्राविण्य देशमुख २० रोपटे तर चांदूर रेल्वे तालुक्यातील शिरजगावं केंद्रातील १४ शाळांना रोपटे भेट देण्यात देण्यात आली. केंद्रप्रमुख किरण पाटील व विषयतज्ज्ञ श्रीनाथ वानखडे यांचे हस्ते हे रोपटे शाळांना हस्तांतरित करण्यात आले. जि.प. शाळा मांडवा, जि.प. शाळा टेंभुर्णी, जि.प. शाळा दिलावरपूर, जि.प. शाळा तुळजापूर, जि.प. शाळा पाथरगावं, जि.प. शाळा सालोरा, जि.प. शाळा उमरपूर, जि.प. शाळा अमदोरी, जि.प. शाळा आमला, जि.प. शाळा शिरजगाव, जि.प. शाळा जळका, समता विद्यालय जळका, श्रीकृष्ण विद्यालय आमला, इंदिरा कन्या विद्यालय आदी शाळांना रोपटे वाटप करण्यात आले.

# पुरोगामी विचारांना दडपण्याचा अघोरी प्रयत्न सहन केल्या जाणार नाही

## कायद्याच्या राज्यात कायद्याचा धाक निर्माण झाला पाहिजे : संजय गुप्ता



मुर्तिजापुर दि. १४ : पुरोगामी विचारांना घेऊन चालणारी प्रखर वक्ता आणि महाराष्ट्रातील युवा वर्गाचे संघटन असलेल्या संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या मुर्तीजापुर येथील संभाजी ब्रिगेड च्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. पुरोगामी विचारांना असे हल्ले करून दडपण्याच अघोरी प्रयत्न सहन केला जाणार नाही असा इशारा देण्यात आला आहे. दोषींवर तात्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी उपविभागीय अधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.संविधानाच्या चौकटीत राहून सामाजिक आणि ऐतिहासिक सत्यांचा पुनर्विचार करून विचार मांडणे हे भारतीय नागरिकाचे मूलभूत अधिकार आहेत. संभाजी ब्रिगेडचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रवीणदादा गायकवाड यांच्यावर काही तथाकथित हिंदुत्ववादी संघटनांनी हल्ला करत काळे फासले. ही घटना अत्यंत निंदनीय, असंवैधानिक व लोकशाही मुल्यांना पायदळी कचाकचा तुडवणारी आहे.आजवर ऐतिहासिक आणि सामाजिक विषयांवर विचारपूर्वक भाष्य केले आहे. समाजातील वंचित घटकातील होतकरू तरुणांना रोजगाराचे एक मोठे व्यासपीठ त्यांनी तयार करून दिले. अशा व्यक्तीवर काळी शाही फेकून ध्यान हल्ला होणे हे निषेधार्थ आहे. उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देऊन सदर घटनेची सखोल चौकशी करून संबंधित सराईत गुन्हेगारावर कठोर कारवाई करण्यात यावी,अशा प्रकारच्या घटना पुन्हा होऊ नयेत प्रशासनाने विशेष दक्षता घ्यावी,व्यक्तिस्वातंत्र्य आणि विचारस्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी राज्य सरकारने जनजागृती मोहीम हाती घ्यावी,अशा हिंसक घटनांमुळे सामाजिक सलोखा बिघडू शकतो म्हणून दोषींवर कायदेशीर कठोर कारवाई करण्यात यावी या संदर्भात निवेदन सादर करण्यात आले.

यावेळी संभाजी ब्रिगेड विभागीय कार्याध्यक्ष संजय गुप्ता,संदीप जळमकर, तालुकाध्यक्ष उज्वल ठाकरे, धम्मरत्न वाहने,वैभव वानखडे, निखिल किर्दक,अतुल गावंडे,प्रवीण नवले, प्रज्वल ठाकरे ,पवन तळोकार ,एल.डी.सरोदे,मुकुंद काळे,दिवाकर सोनोने,हर्षल जाधव, तथा संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मार्की-वातोंडा पुलाचे तीन तेरा

## ग्राम सडक योजना; दोन महिन्यापूर्वीच पुलाचे बांधकाम पूर्ण



> ग्रामस्थांसोबत घटनास्थळी जाऊन कामाची पाहणी केली. या दरम्यान डांबराचे पोपळे निघत असून पुलाला बऱ्याच ठिकाणी तळे गेले आहे. भविष्यात फुल हा धोकादायक झाला असून मोठ्या दुर्घटनेची शक्यता नाकारता येत नाही.
>
> **सौ. रोशनी उमेश सुरूसे**
> **सरपंच ग्रामपंचायत मार्की**

> पुलाचे काम दोन वर्षांपूर्वीच २०२३ च्या अखेरीस झाले आहे. पावसाळ्यापूर्वी रिपेरिंग काम करण्यात आले.
>
> **अमित सांगानी**
> **(अभियंता) पंतप्रधान**
> **ग्राम सडक योजना**

(किशोर मोकलकर)

आसेगाव पूर्णा दि. १४ : भातकुली तालुक्यातील मार्की-वातोंडा रस्त्यावरील नाल्यावर नुकताच प्रधानमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत रस्ताचे व नाल्यावरील पूलाचे बांधकाम पावसाळ्या लागण्यापूर्वीच झाले असून निकृष्ट झालेल्या कामाचे पितळ उघडे पडून पुलाच्या बांधकामाचे पहिल्याच पावसात तीन तेरा वाजले आहे.

मार्की-वातोंडा रस्त्याच्या कामासोबतच मार्की गावाला लागूनच असलेल्या मोठ्या नाल्यावरील पुलाचे बांधकाम प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत पावसाळा लागण्यापूर्वीच झाले असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. सदर पुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचा ग्रामस्थांनी आरोप केला असून याकडे सबंधितांनी लक्ष दिले नाही. मात्र गेल्या आठवड्यापासून सतत सुरू असलेल्या पावसामुळे नवीन बांधकाम केलेल्या पुलाचे तीन तेरा वाजले. दरम्यान या पुलाचे काम साधारण दोन महिन्यापूर्वीच पूर्ण झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. पुलाला तळे गेले असून पुला जवळील रस्त्यावरील डांबराचे हातांनीच पोपळेच्या पोपळे निघत असल्याचा आरोप केला. त्यामुळे निकृष्ट झालेल्या या रस्त्याचे पितळ पहिल्याच पावसात उघडे पडल्याचे चित्र आहे.

### पुलाच्या कामाची चौकशीची मागणी

ग्राम पंचायतने रस्त्यावरील पुलाच्या कामात भ्रष्टाचार झालेल्या कामाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली असून दोषींवर कारवाई करण्याची मागणी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

### संबंधितांचे दुर्लक्ष

रस्त्याचे काम सुरवातीपासूनच निकृष्ठ होत असल्याचा आरोप होत असतांनाही संबंधित अधिकारी व लोकप्रतिनिधींनी सदर ठेकेदाराला पाठिशी घालून प्रवाशी व वाहनधारकांच्या जिवाशी खेळ चालवित निकृष्ठ कामाकडे दुर्लक्ष केले. पुल कामात भ्रष्टाचार झाल्याचा एक मुखी ग्रामस्थांमधून सूर निघत असून पुल असुरक्षित झाला आहे. तेव्हा संबंधित अधिकारी व लोकप्रतिनिधी हा प्रकार किती गांभीर्याने घेतात? किंवा मोठ्या दुर्घटनेची भविष्यात वाट बघतात? हे बघावे लागणार आहे.

# युवा स्वाभिमान महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाची कार्यकारिणी जाहीर



अमरावती, दि. १४ - महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ युवा स्वाभिमान पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आमदार रवि राणा यांच्या प्रमुख उपस्थितीत युवा स्वाभिमान महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ कर्मचारी संघटना रवि राणा यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्याची कार्यकारिणी स्थापन करण्यात आली. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे सर्व कर्मचारी हे सातत्याने कामगारांसाठी व त्यांना विविध योजना देण्यासाठी तत्पर असतात परंतु एवढे झटून सुद्धा पूर्णवेळ व अर्धवेळ कर्मचारी बंधु, भगिनी हे त्यांच्या हक्कापासून वंचित आहे. हि बाब अमित देशे स्वा.सु.र.काम. न्या.संघटना महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष यांनी आ. रविभाऊ राणा यांच्या निदर्शनास आणुन दिली व त्यांनी सांगितले की, महाराष्ट्रातला कोणताच पूर्णवेळ व अर्धवेळ कर्मचारी हा त्यांना मिळणाऱ्या लाभा पासून वंचित राहणार नाही.तसेच त्यांच्यावर होणारा अन्याय सुद्धा सहन केला जाणार नाही. त्यासाठीच युवा स्वाभिमान महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ पुर्णवेळ/ अर्धवेळ कर्मचारी संघटना संपूर्ण महाराष्ट्रामध्ये स्थापन करण्यात आली आहे. या संघटनेच्या अध्यक्षपदी सुनिल चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर उपाध्यक्ष सचिन खारोडे, तर सरचिटणीस सतिश कुटे, तर सचिव रितेश गुजर, तसेच कार्याध्यक्ष म्हणून कांचन वाणी, तर सदस्य म्हणून पंकज हांडे व अनिल जीवतोडे यांची नियुक्ती करण्यात आली याप्रसंगी महाराष्ट्र सेल चे अध्यक्ष विलास वाडेकर, तसेच अमित देशे अमित काळे यांच्या हस्ते युवा स्वाभिमान पार्टी सलग्न महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ पुर्णवेळ अर्धवेळ कर्मचारी संघटनेचे कार्य करणाऱ्या नियुक्ती पत्र व युवा स्वाभिमान पार्टी दुपट्टा देऊन प्रवेश निश्चित करण्यात आला या प्रसंगी असरत अली व रजत यावलीकर , इत्यादी सदस्य व युवा स्वाभिमान पार्टी पद अधिकारी उपस्थिताचे नवनिर्वाचित अध्यक्ष सुनील चव्हाण यांनी आभार मानले.

**झाडे लावा झाडे जगवा**

# निर्दयीपणे गोवंशाची अवैध वाहतूक करणाऱ्या अशोक ले-लँड ट्रक मोर्शी पोलिसांच्या ताब्यात



मोर्शी दि. १४ : मध्यप्रदेशातून निर्दयीपणे गोवंश लादून त्यांची अवैध वाहतूक करणाऱ्या अशोक लेलँड ट्रकला आज मोर्शी पोलिसांनी मोर्शी चांदूरबाजार रोड वरील आष्टगाव जवळ ताब्यात घेतले असून तब्बल पन्नास गोवंशाला जीवदान मिळाले आहे.

मोर्शीतील स्थानिक गोरक्षकांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे त्यांनी मोर्शी पोलीस स्टेशनला सूचना देऊन मोर्शी चांदूरबाजार रोडवर गोवंशाची तस्करी करणारे वाहन जात असल्याच्या माहितीवरून मोर्शी पोलिसांनी केलेल्या धडक कारवाई मध्ये येथून दहा किलोमीटर अंतरावरील अष्टगाव जवळ सदर अशोक लेलँड ट्रक क्र.एम. एच. ४० सी. टी. ४८११ याला पकडण्यात आले असून चौकशी दरम्यान या ट्रकला मध्ये मचान बांधून व मागच्या बाजूला कुटाराचे पोते लावून चोरट्या पद्धतीने गोवंशाची तस्करी करत असल्याचे लक्षात आल्याने त्यांनी सदर ट्रक ताब्यात घेतला असूनत्यात एकूण ४३ गोवंश भरलेला असून त्यातील ९ गोवंश मृतावस्थेत सापडला. त्यातील जनावरांच्या सेवा व सुश्रुतेसाठी डवरगाव येथील श्री सिद्ध बाल हनुमान गोरक्षण संस्था येथे रवानगी करण्यात आली आहे. यावेळी मोर्शी पोलिसांनी सिद्दीकी रईस खान व युसूफ कुरेशी आरिफ कुरेशी दोघेही राहणार मध्य प्रदेश यांना ताब्यात घेतले असून पुढील चौकशी सुरू आहे.

राज्यात लागू असलेला गोवंश हत्या बंदीचा कायदा धाब्यावर बसवून सर्रास गोवंशाची तस्करी सुरू असल्याने गोरक्षकांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत असून यामध्ये गाडीमालक कोण ? जनावरांची खरेदी कुठून व कोणी केली होती ? गोवंश कुठे चालला होता ? त्याला इअर टॅगिंग केलेले आहे का ? तसेच या अवैध तस्करीत कोण कोण गुंतले आहे याची सखोल चौकशीची मागणी बजरंग दलाचे संयोजक पंकज पवार यांनी केली आहे.

याप्रकरणी मोर्शीचे ठाणेदार सुरज बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर वाहन चालकांविरुद्ध गोवंश प्रतिबंधक कायद्याअन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक विशाल आनंद,अप्पर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सुरज बोंडे यांचे नेतृत्वात पो.स्टे.मोर्शी येथील पोउपनी आकाश शिवणकर,तुषार चव्हाण,पो.कॉ.छत्रपती करपते,स्वप्नील बायस्कर,अथर्व कोहळे यांनी केली आहे.

# चिमूटभर फक्त हा सिंदूर नाही...

लक्षात घ्या वैऱ्यांनो! चिमूटभर फक्त हा सिंदूर नाही
ना उराल चिमूटभरही वैऱ्यांनो, तो दिन दूर नाही...
कुरापती नित्याच्या त्यांच्या, नित्याचीच त्यांची क्रूर कृत्ये
संयम संपता संपेल सारे,असत्य हे जरूर नाही...
चिमूटभर फक्त हा सिंदूर नाही...
पाणी वीरांनी मस्त पाजले,पळवले तोंडाचेही पाणी
डोळ्यांतून पाण्याचा पुन्हा, तो लोटणार इथे पूर नाही...
चिमूटभर फक्त हा सिंदूर नाही...
मागता - मागता मागेच आहे, मागूनही 'ते ' अजूनही
भिक सुद्धा साधी कधी,भविष्यात त्यांना मिळणार नाही...
चिमूटभर फक्त हा सिंदूर नाही...
दुष्मनांना पोसणारे नांदवले, देशात गद्दार कोणी ?
ते 'हात ते चेहरे ' लपवणारा, आता तो अंधार नाही...
चिमूटभर फक्त हा सिंदूर नाही...
उत्तर ते वीरांगणानी दिले,'त्या' सिंदूर 'पुसणाऱ्यांना ' ?
पेटतील अशा लक्ष मशाली, काजव्यांचा बाजार नाही...
चिमूटभर फक्त हा सिंदूर नाही...
नेत्र तिसरा जर का कधी, उघडला तिनही दलांनी
नकाशात पार(क) नावालाही,उरणार ते अक्षर नाही...
चिमूटभर फक्त हा सिंदूर नाही...
प्रखर देशभक्ताच्या 'त्या', अद्याप तिथे प्रतिक्षेत अस्थी
विसर्जना सिंधूतत्या,धरायचा फार काळ धीर नाही...
चिमूटभर फक्त हा सिंदूर नाही...
'शास्त्र' आम्ही जाणतो, आम्ही 'शस्त्रही' उत्तम तसे जाणतो
शिव्यांची संपता संधी, 'चक्रधर' होतो मुरलीधर नाही...
चिमूटभर फक्त हा सिंदूर नाही...

● आरती बी.मोरे
वृंदावन कॉलनी, कॅम्प, अमरावती.
मो. ८६६८८५२५५१

**राघव** तळेगावमध्ये रोज ४ शो १२,३,६,९




भरती जाहिरात २०२५-२६

**बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागरी अमरावती उत्तर**

एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत कार्यरत बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय, नागरी अमरावती उत्तर भागातील रिक्त असलेल्या नगर परिषद अचलपूर, अंजनगांव सुर्जी येथील अंगणवाडी मदतनीस पदासाठी नगर परिषद क्षेत्रातील फक्त महिला स्थानिक रहिवासी उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

**अर्जाचा कालावधी :-** दि. १५/०७/२०२५ ते २८/०७/२०२५ कार्यालयीन दिवशी (वेळ सकाळी १२.०० ते ५.००) अधिक माहितीसाठी खालील कार्यालयात संपर्क साधावा तसेच सर्व माहिती amravati.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. (अर्ज अंगणवाडी सेविकांकडे व्हॉटस्ॲपवर उपलब्ध आहे त्याचा फोटो घ्यावा.)

**पदाचे नाव :-** अंगणवाडी मदतनीस अल्पसंख्यांक महिला - ४ पदे
सर्वसामान्य महिला - ३ पदे

**शैक्षणिक अहर्ता :-** किमान १२ वी पास

**वयोमर्यादा :-** किमान १८ ते कमाल ३५ वर्ष पर्यंत (विधवा उमेदवारांसाठी कमाल ४० वर्षांपर्यंत) शासन निर्णयातील अटी व शर्ती लागू राहतील.

- कार्यालयाचा पत्ता -

**बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागरी अमरावती उत्तर**
विलास ई. काळे यांची इमारत, रुख्मिणी नगर, अमरावती रोड (देवमाळी), परतवाडा, ता. अचलपूर, जि. अमरावती.

**बाल विकास प्रकल्प अधिकारी**
(नागरी) अमरावती उत्तर

वि.मा.का./अम.जाहि./३२१/२०२५-२०२६

# अमरावती सीए शाखेच्या वतीने औद्योगिक भेटीचे यशस्वी आयोजन




अमरावती, दि. १४ : अमरावती शाखेचे अध्यक्ष सीए अभय साहू यांच्या नेतृत्वाखाली, रविवार, ०६ जुलै २०२५ रोजी चार्टर्ड अकाउंटन्सीच्या विद्यार्थ्यांसाठी सिम्प्लेक्स केमो पॅक प्रायव्हेट लिमिटेड, नागपूर येथे यशस्वी औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले. या भेटीत अमरावतीच्या विविध विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. सिमरन बत्रा (उपाध्यक्षा), रिद्धी हलवाडिया (कोषाध्यक्ष) यांच्यासह इतर अनेक विद्यार्थी यावेळी उपस्थित होते ज्यांनी या औद्योगिक भेटीत सक्रिय सहभाग घेतला आणि ज्ञान मिळवले.

या औद्योगिक भेटीत सिम्प्लेक्स केमो पॅक प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापक श्री. मिश्रा यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आणि कारखान्यातील विविध उत्पादन प्रक्रियांबद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना प्लास्टिक फॅब्रिक आणि प्लास्टिक पॉली बॅग्ज तयार करण्याचे तंत्रज्ञान, निर्यात प्रक्रिया, परदेशी व्यापाराच्या अटी आणि आर्थिक पैलूंबद्दल व्यावहारिक ज्ञान दिले.

विद्यार्थ्यांनी औद्योगिक भेटीबद्दल प्रचंड समाधान व्यक्त केले आणि सांगितले की त्यांना प्लास्टिक उत्पादन उद्योगातील बारकावे समजून घेण्याची संधी मिळालीच, शिवाय आंतरराष्ट्रीय व्यापाराशी संबंधित अनेक महत्त्वाच्या संज्ञा आणि प्रक्रियांबद्दलही माहिती मिळाली. सीए अभय साहू म्हणाले की, अशा औद्योगिक भेटींचा उद्देश विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकीय ज्ञानासोबत व्यावहारिक अनुभव देणे आहे जेणेकरून ते भविष्यात उद्योग आणि व्यवसायातील खऱ्या आव्हानांना समजून घेऊन चांगले व्यावसायिक बनू शकतील.

## मायेच्या अतूट बंधनात

ज्यांनी आपल्या घरासाठी
कष्ट उपसले आयुष्यभर
तेच कष्टणारे हात आता
असहाय होतात पूर्ण थकल्यावर
हे कष्टणारे हात आईचे असोत
की ते असोत आपल्या वडिलांचे
त्यांचे शरीर पूर्ण थकल्यावर
उपेक्षित होते जीवन त्यांचे
पिढ्यान् पिढ्या ही उपेक्षा
आता अशीच चालू राहणार
आणि वृद्धाश्रमांची संख्या
दिवसेंदिवस इथे वाढीला लागणार
मग वृद्धाश्रमात असलेल्या
आजीआजोबांना
दिवस आठवतील नातवंडांच्या
लहानपणाचे
आणि त्या दिवसांची आठवण
होताच
डोळे भरुन येतील त्यांचे
मायेची ही बंधने तुटत नाहीत
हे म्हणणे आहे किती खरे
मायेच्या या अतूट बंधनात
आपण अडकून असतो सारे

**हेमंत देशपांडे**
अकोला
मो. ९४२०४१८३१३


**NISHANT JOSHI CONSULTANCY** NRI MEDICAL ADMISSION EXPERT Guidance | Counseling | Assistance
आजच भेट द्या आणि डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण करा
Pre Booking Started for NRI Quota Admissions in MBBS & MS/MD for Reputed Colleges in India.
Amravati : 15, Monalisa Complex, Oppsite Rajapeth Police Station 444601
9890272799 / 9890186581/ 9823003200

**दुध चाहीए**
म्हैस का दुध चाहीये रोज १००० लीटर दुध की आवश्यकता, सिर्फ १०० लीटर क्षमता के उपर वाले ही संपर्क करें.
– संपर्क –
9405975197

**प्रवेश देणे सुरु आहे**
आय. टी.आय. पॅटर्न कोर्सेस
१) इलेक्ट्रिशियन – २ दोन वर्ष
२) कन्स्ट्रक्शन सुपरवायझर –१ वर्ष
शैक्षणिक पात्रता दहावी पास
– संपर्क –
स्नेहदीप इन्स्टिट्यूट
8087958087

**प्रवेश देणे सुरु**
कोणताही कोर्स करा – १९९९/- मध्ये
१) CSC सेंटर प्रशिक्षण
२) Youtube Mystery
३) Ms Office
४) CCC
५) C, C++
६) शेयर मार्केट
७) MSCIT - ४४९९/-
नवीन कॉम्पुटर ९९९९/-
I3 2nd 4 GB 128GB 22INCH MONITER 1 YEAR WARRANTY
ऑफर फक्त ५ दिवस..!
संपर्क - 9689822867

**प्रवेश देणे सुरु**
सरकार मान्य कोर्स
DMLT - 2 वर्ष
पदविका अभ्यासक्रम
सरकारी नोकरी व पॅथॉलॉजी लॅब व्यवसाय करीता उपयुक्त कोर्स तसेच PMC रजिस्ट्रेशन लायसन्स करीता व लॅब टेक्निशियन पदभरती करीता पात्र कोर्स
भेटा – आर्टीझन इनस्टीट्युट, अम.
9422955131

**Sale Sale Sale**
MARUTI
Four Layer 1000 Lit. Rs. 4.25 Lit. Sober Colour 10 Yr. Warrenty
रेणुका इंडस्ट्रीज
प्लॉट नं. ऐ-८, एम.आय.डी.सी. अमरावती.
9422156794, 9403622532

**पाहिजे**
ऑफिस मॅनेजमेंट+बिझनेस डेव्हलपमेंटसाठी मुले, मुली व महिलांची आवश्यकता आहे. ट्रेनिंग मध्ये पगार ७५००/- ते १२०००/- राहणे फ्री + बोनस ट्रेनिंग नंतर ऑफिशियल परमनंट जॉब
पोस्ट ब्रांच मॅनेजर पगार ३०,०००/- ते ४०,०००/- हजार रुपये शिक्षणाची अट नाही, १० वी पास/नापास
8208692112

**NISHANT JOSHI CONSULTANCY** NRI MEDICAL ADMISSION EXPERT Guidance | Counseling | Assistance
आजच भेट द्या आणि डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण करा
Pre Booking Started for NRI Quota Admissions in MBBS & MS/MD for Reputed Colleges in India.
Amravati : 15, Monalisa Complex, Oppsite Rajapeth Police Station 444601
9890272799 / 9890186581/ 9823003200

**NISHANT JOSHI CONSULTANCY** NRI MEDICAL ADMISSION EXPERT Guidance | Counseling | Assistance
आजच भेट द्या आणि डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण करा
Pre Booking Started for NRI Quota Admissions in MBBS & MS/MD for Reputed Colleges in India.
Amravati : 15, Monalisa Complex, Oppsite Rajapeth Police Station 444601
9890272799 / 9890186581/ 9823003200

**पाहिजे**
कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे
दैनिक वृतपत्रात डाटा एंट्री, टाइपिंगसाठी ऑपरेटर पाहिजे
– संपर्क –
9370154566

**पाहिजे**
मार्केटींग मॅनेजर
Plastic Water Tank, Plastic Desart Cooler
अनुभव २ वर्षे कमीत कमी
पगार : योग्यतेनुसार
रेणुका इंडस्ट्रीज
प्लॉट नं. ए-८ एमआयडीसी
9422156794
9403622532

**माणुस पाहिजे**
फुटपाथवरील स्टॉलच्या कामासाठी सुशिक्षित माणूस पाहीजे.
स. ११ ते रा. ८ पर्यंत
– संपर्क –
9325770525

**पाहिजे**
ई बाईक शोरुम मध्ये गाडी रिपेअर करण्यासाठी मुलगा अथवा माणूस पाहिजे
– संपर्क –
हसनजी ऑटोमोटिव
सहकार नगर MRF टायर न्यु कॉटन मार्केट समोर,अम.
7249359506

**पाहिजेत**
१) वायरिंग कामासाठी हेल्पर –२ जागा
२)इलेक्ट्रॉनिक टेकनिशियन
– संपर्क –
टेलिटेक सिस्टिम
दुसरा मजला, गुलशन प्लाझा राजापेठ बडनेरा रोड अमरावती
मोबाईल :9370856877

**व्यवसाय**
काम करा, अतिरिक्त कमाई करा. कोणीही करू शकतो अनुभवाची अवश्यकता नाही फावल्या वेळाची गुंतवणूक प्रति महिना २०००० रुपयापर्यंत कमाई करा अधिक माहितीसाठी व्हाट्सअप करा
संपर्क –7709388503

**NISHANT JOSHI CONSULTANCY** NRI MEDICAL ADMISSION EXPERT Guidance | Counseling | Assistance
आजच भेट द्या आणि डॉक्टर होण्याचे स्वप्न पूर्ण करा
Pre Booking Started for NRI Quota Admissions in MBBS & MS/MD for Reputed Colleges in India.
Amravati : 15, Monalisa Complex, Oppsite Rajapeth Police Station 444601
9890272799 / 9890186581/ 9823003200

**व्यवसाय संधी**
कामाचे तास : २–३ तास
आवश्यक : व्यवसाय करू इच्छिणारे लोक
काम प्रकार : पार्टटाइम, फुलटाइम
अनुभव: कोणालाही करता येईल (अनुभव आवश्यक नाही)
मासिक कमाई: १५००० पर्यंत
अधिक माहितीसाठी व्हॉट्स अप करा किंवा कॉल करा
9765357896
9970716661

**पाहिजे**
✻ पाणीपुरी कारागीर–१ जागा
✻ ज्युस कारागीर – १ जागा
✻ सेल्समेन – १ जागा
✻ किचन सुपरवाईजर – १ जागा
✻ हेल्पर – १ जागा
✻ वेटर – १ जागा
✻ बाई – १ जागा
– संपर्क –
सुख सागर हॉटेल
सिटी कोतवाली समोर, अमरावती.


**NEWS PAPER ADVERTISEMENT FOR CHANGE OF NAME**

1. **ANIKET KHANGAR** (Name recorded in service documents) Wife/Son/ daugher of Army No. Army No.**15396433X** Rank Ex-Hav Name **K R SAMPAT** resident of **SHARDHA VIHAR COLONY** PO VMV AMRAVATI ....(Address have Changed my name from **ANIKET KHANGAR TO ANIKET RAJU KHANGAR** My date of birth is 01.07.2025

**NEWS PAPER ADVERTISEMENT FOR CHANGE OF NAME**

1, **SHEETAL** (Name recorded in service documents) Wife/Son/ daughter of Army No Army No **15396433X** Rank Ex-Hav Name resident of **SHARDHA VIHAR COLONY PO VMV AMRAVATI...** (Address have Changed my name frm **SHEETAL TO SEETAL RAJU KHANGAR** My date of birth is 28/07/1981 vide affidavit date 14/7/2025

**NEWS PAPER ADVERTISEMENT FOR CHANGE OF NAME**

1, Army NO **15396433X** Rank Ex-Hav Name : **K R SAMPAT** resident of **SHARDHA VIHAR COLONY PO-VMV** District Amravati Amravati 444709 have changed name of my following MINOR Sons/ Daughters as under vide affidavit date 14/7/2025
i) from **YESH RAJU KHANGAR** TO **YASH RAJU KHANGAR** His/her date of birth is 13 Aug-2008 14/ 07/2025
ii) from -X- to -X- His/her date of birth is -X-


**वाचकांना विनम्र सुचना**
हिंदुस्थान वृत्तपत्रातुन प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहीरातींमधील मजकुराची व फोटोची शहानिशा करुनच वाचकांनी त्यांसबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहीरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहीरातदार जे दावे करतात त्याची हिंदुस्थान वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहीरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहीरात दारांकडून व बातमी देणाऱ्याकडून न झाल्यास व बातमीत त्याच्या परिणामाबद्दल हिंदुस्थान वृत्तपत्र समुहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक, श्रम प्रतिष्ठान प्रा.ली. हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**शेती विकणे आहे**
मौजे दत्तापुर (धामणगांव रेल्वे) येथे समृध्दी रोडपासुन २ कि.मी. यवतमाळ रोडवर केला ले–आऊट लागून आशिष जिनसमोर प्रोजेक्ट व वखार उपयुक्त भोग. वर्ग १ चे विहीर, मोटार पंपासह ४ एकर शेत विकणे आहे
संपर्क–9890455820

**भाड्याने देणे आहे**
१) खापर्डे बगीचा येथील तळमजला हॉस्पिटलसाठी
२) राजापेठ चौक येथील दुकान गुलशन प्लाझामध्ये तळमजल्यावर
३) कलेक्टर ऑफिसमागे, परांजपे कॉलनी मधील पहिल्या मजल्यावर २८०० स्क्वे. फुट कोचिंग क्लास किंवा ऑफिस करिता
संपर्क–डॉ. पुंडकर
9922445944

**वातरोग शिबिर**
✻ सर्व वातरोग ✻ संधीवात ✻गुडघ्याचे ऑपरेशन टाळणे ✻ पाठीच्या मणक्याचे आजार ✻Osteoporosis निशुल्क तपासणी शिबिर १० जुलै ते ३१ ऑगस्ट पंचकर्मावर (बस्ती चिकित्सेवर) २५ % Off
संपर्क–वैद्य पंकज कावरे
वातरोग तज्ञ, कावरे आयुर्वेद पंचकर्म, गाडगेनगर,अमरावती.
मो. 7066652551

**पाहिजे**
हेल्पर पाहिजे
–संपर्क–
सिंध होजिअरी डेपो
जवाहर रोड, अमरावती.
वेळ १.३० ते ३.३०
मो. 9422767330
9823996730

**पाहिजेत**
1) Receptionist (Female)
Eligibility - Any Graduate, Computer Knowledge
2) Sister-2 Post
(ANM/GNM/B.Sc.Nursing)
-Contact-
Khatri Hospital
Sharda Nagar,Amravati.
Mob. 9823148595

**वॉटर प्रुफींग/रीनोव्हेशन**
श्री गजानन वॉटर प्रुफिंग
लिखीत गॅरंटी अमरावती, अकोला, यवतमाळ, वर्धा जिल्ह्यात कुठेही सर्विस. बिना तोडफोड, संडास, बाथरुम, पाणी टाकी, भिंत सरदावा, गच्ची, फायबर मेश जाळी, केमिकल कोटिंग, बिल्डींग, बेसमेंट, पी.यू. ग्राऊटिंग पध्दतीने १००% लिकेज बंद.
संपर्क–तुळशीदास गुरव
(२० वर्ष अनुभवी) 9518943078, 9422782147, रवि नगर

**विकणे आहे**
2 BHK Duplex House
भुते ले–आऊट, धनश्री विहार जवळ, तुळजाभवानी मंगल कार्यालय समोर,शेगांव ते रहाटगांव रोड,अमरावती.
संपर्क–8208264121

**पाहिजेत**
किराणा दुकान मे काम करने के लिए मेहनती लडके–आदमी चाहिए. अनुभवी को प्राथमिकता. मिलने का समय–दोपहर ११ से २ बजे तक
–संपर्क–
मो. 9823712520
फोन–2575309

**मौकेशीर प्लॉटस् विकणे आहे**
मौजे सातुर्णा गावंडे लेआऊट मध्ये प्लॉट विकणे आहे. दक्षिण मुखी तसेच विठ्ठल नगर सर्व्हे नं. ४–१ मौजे अकोली मध्ये प्लॉट विकणे आहे १९४० चौ. फुट
संपर्क–रामकिशोर करवा
मधुरम शाळेजवळ, घनश्याम नगर,अमरावती.
मो.9823026429

**पाहिजेत**
शिकागो पिझ्झा फास्ट फुड रेस्टॉरेंटमध्ये पिझ्झा बनविण्याकरिता व इतर कामासाठी मुलगा पाहिजे. अनुभवाची गरज नाही.
संपर्क–शिकागो पिझ्झा
पोटे कॉलेज रोड, कठोरा नाका, रोहिणी पार्क समोर, अमरावती.9370470069

**पाहिजे**
दुकान कामासाठी माणुस किंवा मुलगा पाहिजे. अनुभवी व्यक्तिस प्राधान्य.
–संपर्क–
महालक्ष्मी सिड्स कॉर्पोरेशन
नविन कॉटन मार्केट (APMC) शॉप नं.२३ व २४, अमरावती.

**पाहिजेत**
1) O.T. Assistant/ Compoundar –१ जागा
2) RMO (Lady)–२ जागा
3) ANM/GNM सिस्टर–१ जागा
Biodata, Certificate व आधार कार्ड सहित भेटा.
संपर्क–डॉ.एम.एम.बूब
डायरेक्टर, शुभम हायटेक हॉस्पिटल, देवरणकर नगर, मंत्री मोटर्स समोर, बडनेरा रोड,अमरावती.
वेळ–दुपारी ४ ते ५ पर्यंत

**चाहिए**
एपी सिल्व्हर शोरुम के लिए सेल्समन/ सेल्सगर्ल्स चाहिए. मिलने का टाईम–१ से ३
संपर्क–ए.पी.सिल्व्हर
सराफा बाजार, कालाराम मंदिरजवळ, अमरावती.

**पाहिजेत**
पंचकर्म थेरपिस्ट २ महिला/२ पुरुष ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट–२ (महिला/पुरुष)
कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
–संपर्क–
माधवबाग क्लिनीक
अमरावती.
9860634252

**गाडी विकत घेणे आहे**
Wagon-R
Maruti Omni
Alto-Indica
गाडी विकत हवी
–संपर्क–
9067971740

**पाहिजेत**
रिसेप्शनिस्ट (मुलगा)
पात्रता–१२ वी पास (MSCIT)
–संपर्क–
लाईफ केअर हॉस्पिटल
सोमेश्वर मार्गदर्शन केंद्र, रुख्मिनी नगर,अमरावती.
7875879801
भेटण्याची वेळ ११ ते १२ am

**JOB ZONE**
काय तुम्हाला अर्जंट JOB हवाय? काय टेन्शन फ्री OFFICE JOB हवाय? चांगल्या कंपनीत मोठ्या पगाराचा JOB हवाय? आपण EDUCATED आहात. सर्व प्रयत्न करुन सुध्दा JOB मिळत नाही चिंता सोडा नोकरी हवी तर आमचेकडे या आम्ही देतो EDUCATION नुसार JOB
–संपर्क करे–
7875379810/8421420415

**Required**
Technician Required - we are looking Technican for DTH fitting and wifi installa-tion work
Location - Prashant Nagar, Amravati
Contact-8261927132
9096359315
9322740024

**Anand Associates**
Office Boy of Sales Marketing Person Needed work Banking and Finance
-Office-
Anand Associates
Gulshan Arcade, Railway Station Square, Amravati.444606
8149684582
8788818623

**पाहिजे**
दुकानात कामासाठी हेल्पर पाहिजे
(वय–१८ ते २५ वर्ष)
(पगार ९००० ते १०,०००)
–संपर्क–
आहुजा इलेक्ट्रॉनिक्स
जयस्तंभ चौक,अमरावती.
9850300300

**पाहिजे**
नामांकित कंपनीमध्ये काम करण्यासाठी मुले पाहिजे. १२ वी पास+नापास व ITI Elect + Electro + Fitter ला प्राधान्य.
नोट : टू व्हिलर आवश्यक आहे.
–संपर्क–
8329304498
9421741037

**पाहिजेत**
ऑफिस मध्ये Online Working आणि Accounting साठी मुलगी पाहिजे. ग्रॅज्युएशन आणि अनुभव असलेल्यांना प्रथम प्राधान्य.
Best Salary+Best Incentive
8888860494
या नंबरवर Resume Send करावे.

**पाहिजे**
TELECALLING करिता मुली पाहिजे
Rs.6000+ Incentive
–संपर्क–
गाडगेनगर,अमरावती
9011955813
7385714756

**व्यवसाय**
काम करा,अतिरिक्त कमाई करा. कोणीही करु शकतो. अनुभवाची आवश्यकता नाही. लवचिक वेळ, प्रति महिना रु. २०,००० पर्यंत. अधिक माहितीसाठी व्हॉटस् अप करा.
–संपर्क–
9422894782

**पाहिजे**
दुकानात काम करण्यासाठी मुलगा पाहिजे
–संपर्क–
कलाश्री एम्पोरियम
राजकमल चौक, नमुना,बडनेरा रोड, अमरावती.
9096914424

**पाहिजे**
ऑफिस कामासाठी मुलगा पाहिजे (कम्प्युटरचे ज्ञान असणे आवश्यक)
संपर्क–9765555639

**पाहिजेत**
महाजनी वहीखाते करणारा अनुभवी अकाऊंटंट पाहिजे (पार्ट टाईम) योग्य पगार देण्यात येईल.
–संपर्क–
मो.9823712520
फोन नं.2575309

**Required**
Tally Operator-2
Billing Clerk-2
Contact- 1 To 4 Pm
-Contact-
Modern Electronic Mall
Rukhmini Nagar, Amravati.


**जाहीर सुचना**

सर्व आम जनतेस या जाहीर सुचनेद्वारे सुचित करण्यात येते कि, माझे पक्षकार हे खालील वर्णन केलेल्या प्लॉटचे नोंदणीकृत खरेदी दस्त क्र.३५९७/१९८० व ३९१३/२००१ नुसार मालकी हक्क व ताब्यात आहे.

मालमत्तेचे वर्णन :

नोंदणी पोट तुकडी अमरावती यांचे कक्षेतील व म.न.पा. अमरावती चे हद्दीतील मौजे–नवसारी, प्र. नांदगांव पेठ, ता.जि. अमरावती येथील शेत स.क्र.३४/२ मधील क्षेत्र ५ ए ४३ आर जमिनीचे मा. सहायक संचालक, नगर रचना अमरावती यांचे पत्र क्र. संसनरअ/अभि/नवसारी/११६४ दि.१२/०४/१९७७ नुसार निवासी प्रयोजनार्थ अकृषक झालेल्या व वि.एस.डी.ओ. साहेब, अमरावती यांनी रे.के.नं. एन.ए.पी.३४/नवसारी/२६/७६–७७, नि.ता. ३०/५/१९७७ नुसार लेआऊट कन्व्हर्शन मंजुर झालेल्या "उज्वल कॉलनी" या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जागेतील लेआऊट मधील;

१) प्लॉट क्र.१९ (एकोणवीस) (संगणकीय भुमापन क्रमांक व उपविभाग–३४/२/१९) याची साईज पू.प. उत्तर बाजु–५० फुट, व दक्षिण बाजु–५१.५० फुट, उत्तर–दक्षिण पूर्व बाजू–७३ फुट, व उत्तर–दक्षिण प. बाजू–६६ फुट असुन याचे एकुण क्षेत्रफळ ३४७५ चौ. फुट (३२२.८३७ चौ.मी.) आहे. या प्लॉटची चतु:सिमा मंजुर नकाशाप्रमाणे खालील प्रमाणे : पुर्वेस–प्लॉट नं. २०, पश्चिमेस–प्लॉट नं.१८–ए, उत्तरेस–४० फुटाचा रोड, दक्षिणेस–२० फुटाची गल्ली.

२) प्लॉट नं.२०–ब (बीस–ब) (संगणकीय भुमापन क्रमांक व उपविभाग–३४/२/२०/ब) याची साईज २२.५X७६ फु. याचे एकुण क्षेत्रफळ १५८.५८ चौ.मी. (१७१० चौ.फु.) आहे. या प्लॉटची चतु:सिमा मंजुर नकाशाप्रमाणे खालीलप्रमाणे : पुर्वेस–श्री. ठाकरे यांचे घर, पश्चिमेस–प्लॉट क्र.२१, उत्तरेस–लेआऊट मधील रोड, दक्षिणेस–सर्व्हिस लाईन.

वरील वर्णन केलेली मालमत्ता हे माझ्याच पक्षकाराचे मालकी व ताब्यात असुन अन्य कोणासही कोणतेही लेखाने लिहून दिलेली नाही किंवा विक्री करण्याचे उद्देशाने इतर कोणतेही व्यक्तिशा कोणतेही व्यवहार किंवा करार केलेले नाही. तरी कोणीही वरील मालत्तेबाबत कोणतेही प्रकारचे व्यवहार करु नये. केले असल्यास किंवा करीत असल्यास ते माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही व परिणामी होणारे नुकसानीस तेच सर्वस्वी जबाबदार राहतील. करिता ही जाहीर सुचना दिली असे.

दि. १२/०७/२०२५
अमरावती.

अॅड. एन.बी. जोशी
रा. ४६, महेश नगर, डी–मार्टच्या मागे,
साईनगर, अमरावती
मो. ८८०५६७४०८९

**जाहीर सुचना**

सर्व जनतेस प्रस्तुत जाहीर सुचनेनुसार सुचित करण्यात येते कि,

ज्याअर्थी, माझे पक्षकार यांनी अमरावती ग्रामीण कचेरीचे कक्षेतील व जिल्हा परिषद अमरावती यांच्या हद्दीतील मौजे–वाघोली, ता.जि. अमरावती येथील शेतजमिनीचे मालक १) सौ. छाया कैलास गिरोळकर, वय–५२ वर्षे, २)श्रीमती जसुमतीजी रामकिसनजी पनपालिया, वय–७८ वर्षे, तर्फे-श्री मनीष रामकिसनजी पनपालिया ३) मयूर अशोकराव जिरापुरे, वय–२९ वर्षे ४) रोशनी बाबाराव मेश्राम, वय–३४ वर्षे यांच्याकडुन सदर शेतजमिनीबाबत १) कविता सुदामा पारवानी, वय–५८ वर्षे २) भरत जगतमल तलडा, वय–५० वर्षे ३) संदीप अशोककुमार तलडा, वय–३८ वर्षे आणि ४) मुकेश भगवानदास कामदार, वय–४८ वर्षे यांनी दि. ०५/१०/२०२३ रोजीच्या मुद्रांक पत्र क्र. ७०–ए–ए–५९६१३५ नुसार शेतमालक यांचेसोबत केलेल्या रक्कम भरणा व ताबा पावती अन्वये वरील सौ. छाया कैलास गिरोळकर व इतर ३ या शेतमालकांच्या मालकी व ताब्यातील खालील वर्णन असलेली शेतजमीन वरील नमूद भरणा व ताबा पावतीनुसार दि. १०/०७/२०२५ रोजी खरेदी करण्याचा करार केला आहे. सदर शेतजमिनीचे वर्णन येणेप्रमाणे–

करार केलेल्या शेतजमिनीचे वर्णन :

अमरावती ग्रामीण कचेरीचे कक्षेतील व जिल्हा परिषद अमरावती यांच्या हद्दीतील मौजे–वाघोली, ता.जि. अमरावती येथील भूमापन व उपविभाग क्र.२९०/१, भोगवटदार वर्ग १, एकुण क्षेत्रफळ २ हे. ९३ आर व सरकारी मोजणी प्रमाणे २ हे. ६९ आर (६.६४ एकर शेतजमीन), खाते क्र. ७६७, आकारणी १२ रु. ०० पै. शेतजमीन ज्याची चतु:सिमा येणेप्रमाणे –
पुर्वेस–पांदण रस्ता व डॉ. फरतोडे यांचे शेत,
पश्चिमेस–मोर्शी रोड
उत्तरेस–पांदण रस्ता व फडके यांचे शेत
दक्षिणेस–बोरकर यांचे शेत

ज्याअर्थी, वरील वर्णीत शेतजमीन वर्तमान परिस्थितीत वरील नमूद मूळ शेतमालकांच्या निरंकुश मालकी व ताब्यात आहे.

त्याअर्थी, सर्व जनतेस सुचित करण्यात येते कि, वरील मालमत्तेवर कोणाचाही कुळ, गहाण, जप्ती, बोजा, वारसहक्क, कर्ज, आरक्षण, ताबा, डी.पी., कचेरीवाद, अपील, हितसंबंध वा इतर कुठल्याही प्रकारचा अधिकार असल्यास प्रस्तुत सूचना प्रकाशित झाल्यापासुन एक महिन्याच्या आत खालील दिलेल्या पत्त्यावर कार्यालयीन वेळेत सर्व कागदपत्रासह लेखी संपर्क साधावा अथवा प्रत्यक्ष भेटावे. असे न केल्यास माझे पक्षकार वरील नमुद शेत जमीन खरेदी करतील व त्यानंतर सदर शेत जमिनीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा उजर मान्य होणार नाही.

(कार्यालयीन वेळ : सकाळी ९.०० ते १०.३० व सायंकाळी ०७.०० ते १०.०० वाजेपर्यंत)

दिनांक : /०७/२०२५
अमरावती

पत्ता :
अॅड. डॉ. कृष्णकुमार एस. उपाध्याय
भारद्वाज कुटी, यशोदा नगर नं.२,
जुना बायपास रोड, अमरावती–444606
मो.9604274767

www.dainikhindusthan.com
हिंदुस्थान

सराफा बाजार सोने १० ग्रॅम ९९,८८०.०० चांदी किलो १,१५,०००.००

मुद्रा बाजार अमेरिकन डॉलर ८५.९९ रुपये

शेअर बाजार बीएसई ८२,२५३.४६ निफ्टी २५,०८२.३०




# चोरी प्रकरणातील विधीसंघर्षीत निघाला मारेकरी

अमरावती, दि.१४ : चोरीच्या तपासाकरिता ताब्यात घेण्यात आलेला विधी संघर्षीत बालक हा त्याच्या मित्राचा मारेकरी असल्याची धक्कादायक बाब पोलीसांच्या निदर्शनास आली. विधीसंघर्षीत बालकाने दिलेल्या माहीतीवरून गाडगेनगर पोलीसांनी यानंतर तात्काळ फ्रेजरपुरा पोलीसांच्या सोबतीने घटनास्थळ गाठले. पोलीसांना एसआरपीएफ कॅम्प परिसरातील मागील बाजूस एका युवकाचा मृतदेह आढळून आला. यामुळे पोलीस देखील चक्रावून गेले होते.

याप्रकरणातील मृत युवक हा पुणे येथील रिजवान असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले आहे. त्याची हत्या विधीसंघर्षीत बालकाने केल्याचे आज सोमवारी उघड झाले. गाडगेनगर पोलीसांचे पथक आज सोमवारी त्यांच्या हद्दीत गस्त घालत होते. यावेळी त्यांना एक अल्पवयीन युवक संशयास्पदरितीने फिरतांना आढळून आला.पोलीसांनी त्याला थांबविले. परंतु युवक पसार झाला. यानंतर पोलीसांनी सदर युवकाचा पाठलाग केला. त्यास ताब्यात घेवून पोलीस ठाण्यात आणण्यात आले. युवकाने चोरी केली असावी असा संशय पोलीसांना होता. परंतु चौकशीदरम्यान विधी संघर्षीत बालकाने आपण दहा ते बारा दिवसापूर्वी आपल्या तीन सहकाऱ्यांच्या मदतीने एका मित्राची हत्या केल्याचे सांगितले. मृत मित्राचा मृतदेह एसआरपीफ कॅम्प मागील एका गटरच्या टाकीत टाकल्याचे सांगितले. सदर हद्द ही फ्रेजरपुरा पोलीसांची येत असल्याने पोलीसांनी फ्रेजरपुरा पोलीसांना देखील याबाबत माहीती दिली.

यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलीसांना घटनास्थळी पाण्यात सडलेला मृतदेह आढळून आला. गाडगेनगर पोलीस ठाण्याचे ठाणेदार अतुल वर यांच्या नेतृत्वात पोलीसांनी हत्येचा छडा लावला. पोलीसांनी विधी संघर्षीत बालकाची योग्य चौकशी केल्याने हत्याकाडाचे रहस्य उलगडले. दरम्यान, या घटनेमुळे शहरात चांगलीच खळबळ उडाली आहे. सदर विधी संघर्षीत बालकास फ्रेजरपुरा पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# हत्याप्रकरणातील आरोपींना अटक

अमरावती,दि.१४: शुक्रवारी मध्यरात्री नांदगांव पेठ हद्दीतील एका बियर बार समोर झालेल्या राजकुमार सुंदरानी हत्या प्रकरणात पोलीसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. आरोपींना राजस्थानातील कोटा येथून ताब्यात घेण्यात आले.

शुक्रवारी रात्री राजकुमार सुंदरानी (५४, रामपुरी कॅम्प) यांची नांदगांव पेठ येथील एका बियर बार समोर हत्या करण्यात आली होती. नांदगांव पेठ पोलीसांनी याप्रकरणी हत्येचा गुन्हा दाखल केला होता. यानंतर पोलीसांनी या परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली होती. पोलीसांना या प्रकरणातील दोन आरोपी राजस्थानातील कोटा येथे लपून बसल्याची माहीती मिळाली होती. माहीतीवरून पोलीसांनी तात्काळ राजस्थानातील कोटा गाठून दोन आरोपींना ताब्यात घेतले. दोन्ही आरोपींना अमरावतीला आणण्यात येत आहे.

# जिल्हा परमिट रूम असोसिएशनचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा



अमरावती,दि.१४ : शासनाच्या नव्या नियमास विरोध करण्यासाठी आज सोमवारी (ता.१४) जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढला. मोर्चामध्ये असोसिएशनचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. इर्वीन चौक परिसरातून हा मोर्चा काढण्यात आला होता. दरम्यान, आज असोसिएशनद्वारा दिवसभर बंद पाळण्यात आला.

डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्णकृती पुतळ्याला अभिवादन करून मोर्चाला सुरुवात करण्यात आली. नूतनीकरण फी आणि एक्साईज ड्युटीमध्ये झालेल्या वाढीसह विविध मागण्यांसाठी जिल्हा परमिट रूम असोसिएशन द्वारा मोर्चा काढण्यात आला. आज शहरातील सर्व मद्यविक्री दुकाने आणि बिअर बार बंद ठेवण्यात आले होते. करवाढीमुळे व्यवसाय संकटात आला असल्याचे आंदोलकांनी म्हटले आहे. अचानक १० टक्के वाढलेला वॅट, १५ टक्के वाढलेली नूतनीकरण फी आणि तब्बल ६० टक्के पर्यंत गेलेली एक्साईज ड्युटी यामुळे मद्यविक्री व्यवसाय अडचणीत सापडला आहे. हा निर्णय व्यवसाय उध्वस्त करणारा असल्याचे संघटनेचे अध्यक्ष नितीन मोहोड यांनी प्रसिद्धी माध्यमांना सांगितले. नितीन मोहोड यांच्या मार्गदर्शनाखाली मोर्चाने शांततेच्या मार्गाने जिल्हाधिकारी कार्यालय गाठले. आंदोलकांनी निषेधाचे फलक हातात घेत शासनाच्या निर्णयाविरोधात भूमिका मांडली. त्यानंतर जिल्हाधिकारी यांना करवाढ मागे घेण्याची मागणी करणारे निवेदन देण्यात आले.

या धोरणामुळे संपूर्ण उद्योग संकटात सापडला असून अनेक व्यावसायिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभे आहेत, असे निवेदनात (उर्वरित पान २ वर)

# घरात आढळला युवकाचा मृतदेह

अमरावती,दि.१४ : स्थानीक फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या सुंदरलाल चौक परिसरातील एका घरात वयोवृद्ध नागरिकाचा मृतदेह आढळून आला. राजेंद्र नामदेव मेटकर (६१) असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

आज सोमवारी दुपारी सुंदरलाल चौक परिसरातील सीएनजी गॅस पंपाच्या मागील बाजूस राहणाऱ्या एका व्यक्तीने पोलीस हेल्पलाईनवर फोन करून त्याच्या घरा शेजारी राहणाऱ्या व्यक्तीचा घरात मृतदेह असल्याची माहीती दिली होती. यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलीसांनी घरात जावून पाहणी केली असता घरात एका वयोवृद्ध व्यक्तीचा मृतदेह आढळला. व्यक्तीच्या शरीरावर व घरात काही ठिकाणी रक्त दिसून आले. सदर वयोवृद्ध व्यक्ती जखमी झाला असावा असाही अंदाज वर्तविला जात आहे. याप्रकरणाचा पोलीस तपास करीत आहे.

# बनावट वेडींग पार्टीवर पोलीसांची धाड दिडशेहून अधिक युवक-युवतींची चौकशी

अमरावती, दि.१४ : सध्या वेडींग पार्टीचे महत्व वाढले असतांनाच रविवारी रात्री पोलीसांनी राजापेठ पोलीस ठाणे हद्दीतील एरिया ९१ या हॉटेलमध्ये सुरु असलेल्या बनावट वेडींग पार्टीवर धाड टाकली. यावेळी दिडशेहून अधिक युवक व युवतींची चौकशी करण्यात आली. फेक मॅरेज पार्टीचा हा प्रकार पहिल्यांदाच पुढे आला असून यामुळे शहरात चांगलीच खळबळ उडाली आहे.

राजापेठ पोलीसांनी रविवारी रात्री साडे नऊ वाजताचे सुमारास एरिया ९१ या हॉटेलमध्ये सुरु असणाऱ्या फेक वेडींग पार्टीवर छापा टाकला. यावेळी एका लहान हॉलमध्ये दीडशे युवक व युवती संगीत वाद्यांसह नृत्य करीत होते. गुन्हे शाखेचे प्रमुख संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात पोलिसांनी धाड टाकून चौकशी सुरु केली. यावेळी २१ ते २२ वर्ष वयोगटात अनेक युवक युवती याठिकाणी मद्यधुंद होऊन नाचत असल्याचे त्यांना दिसले. त्यांनी सर्वांना पकडून त्यांची कसून चौकशी केली.

महत्वाचे म्हणजे पार्टीमध्ये सहभागी झालेल्या युवकांकडून प्रती युवक चारशे रूपये आकारण्यात आल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले आहे. परंतु युवतींना मोफत प्रवेश देण्यात आले होते. पोलीसांनी अचानक टाकलेल्या धाडीमुळे याठिकाणी चांगलाच गोंधळ उडाला होता. परंतु पोलीसांनी कारवाई केल्याचे समजताच अनेकजण घाबरले होते. याठिकाणी रात्री नागरिकांनी देखील मोठी गर्दी केली होती.




## मराठी भाषा विद्यापीठाला एक रुपयाही निधी नाही...

मराठी भाषा विद्यापीठ रिध्दपुरला स्थापनेपासन ते आजपर्यंत कोणताही निधी अथवा अनुदान देण्यात आला नसल्याबाबत उल्लेख असल्याचा फलक स्थगानिक राजकमल चौक येथे लावण्यात आले आहे. त्यावर महाराष्ट्र शासनाचे मातृभाषेकडे दुर्लक्ष असल्याचा मजकुर सुध्दा फलकावर लिहिण्यात आला आहे. भर राजकमल चौकात लावण्यात आलेले हे फलक कोणी लावले याबाबत कोणतिही माहीती नसुन मात्र खाली मात्रृभाषा प्रेमी अमरावती असे लिहीण्यात आले आहे.

# मराठी भाषा विद्यापीठाला ४.२५ कोटीचा निधी प्राप्त तर ३.२४ कोटी मंजूर

## मराठी भाषा विद्यापीठ रिध्दपुर प्रशासनाची माहीती

अमरावती दि.१४ : मराठी भाषा विद्यापीठ रिध्दपुरला स्थापनेपासुन ते आजपर्यंत कोणतेही अनुदान देण्यात आले नसल्याचा आरोप काही लोकांकडून करण्यात येत आहे. तर दुसरीकडे मराठी भाषा विद्यापीठ रिध्दपुरला शासनाकडुन ४.२५ रुपयांचा निधी प्राप्त झाला असुन ३.२४ कोटी रुपयांचा निधी मंजुर झाला असल्याची माहीती विद्यापीठ प्रशासनाने प्रसिध्दीसाठी दिली आहे.

शासनाने मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूरची स्थापना दिनांक १९.०१.२०२४ रोजी केलेली आहे. त्यानुसार प्रथम कुलगुरू मा. डॉ. अविनाश आवलगांवकर यांची नियुक्ती होऊन त्यांनी दिनांक ५.१.२०२४ रोजी पदभार स्वीकारला. त्यानंतर वर्षभरात व्यबस्थापनमंडळ, विद्यापरिषद, अभ्यासमंडळे इत्यादीच्या वेळोवेळी बैठका होऊन पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम निश्चित करण्यात आले व त्यानुसार प्रथम वर्षाकरिता प्रवेशप्रक्रिया सुरू झालेली आहे. (पान २ वर)

# अकोली ते साईनगर रस्ता व अंडरपासच्या कामांची आ. राणा व मनपा आयुक्तांकडून पाहणी

## कामाच्या गुणवत्तेची थर्ड पार्टी ऑडीट करण्याचे निर्देश



अमरावती दि. १४ : अकोली-साईनगर रस्ता १९ कोटी रुपये खर्चाच्या व ०९ कोटी रुपये अंडरपास बांधकामांची आमदार रवी राणा यांच्याकडून सोमवारी पाहणी करण्यात आली. थर्ड पार्टी ऑडिटचे निर्देश पाहणीदरम्यान कामात विविध त्रुटी आणि अपूर्णता निदर्शनास आल्याने भातकुली अंडरपास संदर्भात स्पॉटवरूनच डीइएन भुसावळ यांच्याशी थेट संवाद साधत तांत्रिक व प्रशासकीय पातळीवर निर्णय घेण्यासाठी तातडीने विशेष बैठक घेण्याच्या सूचनाही आ . रवी राणा व मनपा आयुक्तांनी दिल्यात.

साईनगर, आकोली, भातकुली रोड परिसर, येथील नागरिक महिला समस्या सोडविणेबाबत. नाली, रस्ता, साफसफाई ची पाहणी आ. राणा यांनी आयुक्त यांच्या उपस्थितीत केली पावसाळ्याचे ऊपाय योजना करण्याचे सूचना उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्यात.

अमरावती मनपा क्षेत्रातील अंदाजे १९ कोटी रुपये खर्चाच्या अकोली-साईनगर नगरोत्थान रस्त्याचे कॉंक्रिटीकरण, अकोली अंडरपास (४ कोटी रुपये) आणि भातकुली अंडरपास (५ कोटी रुपये) या महत्त्वाच्या विकासकामांची पाहणी आमदार तथा महाराष्ट्र विधानसभा आश्वासन समितीचे अध्यक्ष रवी राणा यांनी मनपा आयुक्त सौम्या शर्मा-चांडक, रेल्वे अधिकारी आजाद आणि संबंधित अधिकाऱ्यांसह केली.पाहणीदरम्यान रस्त्यांच्या कामात विविध त्रुटी आणि अपूर्णता निदर्शनास आल्याने आमदार रवी राणा यांनी या कामांचे थर्ड पार्टी एजन्सीमार्फत (पान २ वर)

# राजापेठ प्रभागातील नागरीकांना आ.रवी राणांकडून कोट्यावधीच्या विकास कामांची भेट




अमरावती दि.१४ : आ.रवि राणा यांच्या हस्ते प्रभाग क्र.१८ राजापेठ येथील १२ कोटी ४४ लक्ष रुपयांचा विकास कामांचा भव्य भुमीपुजन व लोकार्पण सोहळा नुकताच पार पडला. जनतेने दिलेल्या आशिर्वादाचे व ठेवलेल्या विश्वासाचे ऋण फेडणे हे माझे कर्तव्य असल्याचे मत आ.रवि राणा यांनी व्यक्त केले.

आमदारकिच्या २० वर्षाच्या कालावधीत मतदार संघातील प्रभागा- प्रभागात विकास कामांचा धडाका लावुन शहर असो वा ग्रामीण संपुर्ण चेहरा मोहरा आ.रवि राणा यांनी बदलुन टाकला. जनतेने दिलेला आशिर्वाद व जनतेने ठेवलेला विश्वास सार्थक ठरवत कोटयावधी रुपयांची विकास कामे मतदार संघात झाली.

त्या अनुषंगानेच प्रभाग क्र.१८ राजापेठ येथे १२ कोटी ४४ लक्ष रुपयांचा विकास कामांचे भुमीपुजन व लोकार्पण सोहळा आ.रवि राणा यांचा हस्ते संपन्न झाला. व राजापेठ मधिल नागरीकांना आ.रवि राणा यांनी कोटयावधी रुपयांच्या विकास कामांची भेट जनतेला समर्पित केली. या भुमिपुजन व लोकार्पण सोहळ्याला साई जशनलाल मोरडीया, श्री.साई राजेशलाल मोरडिया, महंत कारंजेकर बाबा, शिवधारा आश्रमचे रामकिशन नवलानी, सुनिल राणा, प्रशांत वानखडे, जयश्री मोरया, महेश मुलचंदानी, मंजु अडवानी, कवंर नगर पु.पं.अध्यक्ष संतोष सबलानी, राजा नानवानी, मुकेश हरवानी, जगदिश छतवानी, अनिल आडवानी, सुनिल शादी, मुकेश बख्तार, राजेश नानवानी, विशाल राजानी, शिव मंदिर समितीचे मनिष झांबानी, मनोहर झांबानी, गिरीश हरवानी, सनि मुलचंदानी, पवन झांबानी, अँड.किरण मिश्रा, सुधा तिवारी, (उर्वरित पान २ वर)

# नवोदय विद्यालयाच्या वस्तीगृहाला समस्यांचे ग्रहण पालकसभेत पालकांनी वाचला समस्यांचा पाढा




अमरावती दि.१४ : येथील पीएमश्री जवाहर नवोदय विद्यालयाच्या वस्तीगृहाला समस्यांचे ग्रहण लागले असुन, त्याबाबत पालकांनी नुकत्याच पार पडलेल्या सभेत प्रशासनाला जाब विचारला.

जवाहर नवोदय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या पालकांची सभा नुकतीच पार पडली. या बैठकीत पालकांनी विद्यालयाच्या वस्तीगृहातील समस्यांबाबत मुद्या विद्यालय प्रशासनासमोर मांडला. सोबतच अमरावती येथील जवाहर नवोदय विद्यालय येथे नियमांचे पालन न करता पालक -शिक्षक समितीचे गठन करण्यात आले. असल्याचा आरोप पालकांनी लावला आहे.

या बैठकीमध्ये प्रशासनाची हुकूमशाही दिसून आली पालकांनी मांडलेल्या वस्तीगृहातील गंभीर समस्यांना प्रशासनाने कानावर सुद्धा घेतल्या नाहीत. पालकांनी चालू वर्षापासून वारंवार समस्यांचे निवेदन देऊनही प्रलंबित राहिलेल्या वसतिगृहाच्या समस्याबद्दल विद्यालय प्रशासनाला जाब विचारला. मात्र प्रशासनाकडून कोणतेही ठोस उत्तर पालकांना देण्यात आले नाही. त्यामुळे एका आठवड्यापूर्वी जिल्हाधिकारी साहेबांना सुद्धा याच समस्यांचे पालकांच्या सहीचे लेखी निवेदन देण्यात आले होते. मात्र बातमी लिहेपर्यंत त्या समस्याच्या कोणतीही विचारपूस विद्यालय प्रशासनाला जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात आलेली नाही. आणि समस्यांचा पाठपुरावा पण करण्यात आलेला नाही. विद्यालयात व वस्तीगृहामध्ये घाणीचे साम्राज्य साठवलेले आहे. याची सुद्धा दक्षता घेण्यात आलेली नाही हा प्रशासनाचा हलगर्जीपणा आहे असे दिसून येते. तसेच मुलींच्या कनिष्ठ बालिका सदन मध्ये वेळोवेळी शॉर्ट सर्किट ची (उर्वरित पान २ वर)

# तेरवीनिमित्त श्रद्धांजली!!



स्व.अशोकराव रामचंद्रजी निर्मळ

ज्येष्ठ कॉंग्रेस नेते आणि वलगावचे माजी सरपंच तसेच सेवा सहकारी सोसायटीचे व आदर्श नागरी पतसंस्थाचे माजी अध्यक्ष होते. पीडीएमसीचे अधिक्षक डॉ. सोमेश्वर निर्मळ यांचे ते ज्येष्ठबंधू होत. तेरवीचा कार्यक्रम दि. १५ जुलै ला हरिकृष्ण मंगलम् कार्यालयात करण्यात येत आहे.

शोकाकुल : समस्त निर्मळ परिवार, वलगाव

# ड्रायव्हिंग स्कूलचे प्रशिक्षक म्हणजे जीवनदूत : उर्मिला पवार



अमरावती, दि. १४ : ड्रायव्हिंग स्कूलचे प्रशिक्षक हे केवळ प्रशिक्षण देणारे शिक्षक नसून, ते कुशल वाहनचालक घडवून अपघातांचे प्रमाण कमी करणारे 'जीवनदूत' आहेत, असे प्रतिपादन प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी केले.

प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या सभागृहात जिल्हा व शहरातील ड्रायव्हिंग स्कूल संचालकांसाठी आयोजित कार्यशाळेत त्या बोलत होत्या. या वेळी प्रभारी सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी विपिन लेदाडे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक शिवशंकर कातडे आणि सोहम हेमने उपस्थित होते. प्रशिक्षण देताना विद्यार्थ्यांना वाहनाचे तांत्रिक ज्ञान, रस्त्यावरील चिन्हांची माहिती, समृद्धी महामार्गासारख्या महामार्गांवर वाहन कसे चालवावे, वेग किती ठेवावा, घाट रस्ते व रात्रीच्या वेळी ड्रायव्हिंगचे नियम याचे मार्गदर्शन अत्यंत आवश्यक असल्याचे पवार यांनी सांगितले.

ङ्गप्रत्येक प्रशिक्षकाने प्रशिक्षणाच्या वेळी ओळखपत्र बाळगावे. वाहन प्रशिक्षण काळात योग्य सूचना व मार्गदर्शन केल्यास अपघातांवर नियंत्रण मिळवता येईल, (उर्वरित पान २ वर)

# थोडक्यात महत्वाचे

## शुक्रवारी श्याम झुलनोत्सवात भजने सादर करणार राष्ट्रीय भजनकार कनैय्या मित्तल

**प्रतिनिधी**, १४ जुलै

**अकोला -** महानगरात गत तीन वर्षापासून आगळावेगळा श्यामबाबांच्या भजने व दिव्य झाकीचा श्याम झूलनोत्सव साजरा करणाऱ्या महानगरातील अध्यात्मिक युवकांच्या शाम के दिवानेया युवक समूहाच्या वतीने शुवार दिनांक १८ जुलै रोजी सायं.६वाजता मुर्तीजापुर रस्त्यावरील सिटी स्पोर्ट क्लबच्या प्रांगणात विराट श्याम झूलनोत्सव आयोजित करण्यात आला असून यात हम राम को लाये है,हम राम को लायेगे हे गीत राष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध करणारे राष्ट्रीय भजनकार,श्याम भक्त हरियाणा येथील कनैय्या मित्तल यांची भव्य भजन संध्या व श्यामबाबांच्या दिव्य झाकीचा श्याम झुलनोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती शाम के दिवाने समूहाचे सेवाधारी अरुण शर्मा,सुमित शर्मा, कल्पेश खंडेलवाल यांनी दिली. गीतानगर परीसरातील रामदेवबाबा-श्याम बाबा मंदिरात सोमवारी आयोजित पत्रकार परिषदेत या महोत्सवाची माहिती देण्यात आली. चंदीगड येथील राष्टीय भजनकार कन्हैया मित्तल हे प्रथमच महानगरात येत असून देशभरात त्यांनी गायलेली श्यामबाबांची भजने व भक्ती गीते प्रसिद्ध असून त्यांच्या श्याम भजनाची झलक महानगरातील श्याम भक्तांना या महोत्सवात बघावयास मिळणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या श्याम झुलनोत्सवात कन्हैया मित्तल यांच्या समवेत उत्तर प्रदेश राज्यातील समस्तीपुर येथील राष्टीय भजन गायिका रेशमी शर्मा या साथ संगत करणार आहेत. महोत्सवाचा प्रारंभ खाटू शाम धाम राजस्थानच्या श्याम मंदिर ट्रस्टचे सेवक, पुजारी मानवेंद्र सिंह चौहान, खाटू श्याम धामचे पुरुषोत्तम शर्मा, सालासार धाम राजस्थानच्या नीज मंदिरचे पुजारी अभिषेक पुजारी आदींच्या उपस्थितीत होणार आहे.या उत्सवात खाटू नरेश यांची दिव्य झाकी,दिव्य ज्योत साकार करण्यात येणार असून अप्रतिम रोषणाई व अदभूत बाबांचा शृंगार राहणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. समूहाच्या वतीने या आधी पण अशा प्रकारचे झुलनोत्सव साजरे करण्यात आले असून प्रथम झुलनोत्सवात कोलकत्ता येथील राष्ट्रीय भजनकार प्रकाश मिश्रा, तुषार मिश्रा हे महानगरात येऊन त्यांनी श्यामबाबाच्या भजनांचा जागर केला होता. द्वितीय झुलनोत्सवात कोलकत्ता येथील राष्ट्रीय भजनकार संजय मित्तल यांनी महानगरात आपली उपस्थिती दर्शवीत श्यामबाबांच्या भक्ती पूर्ण भजनांचा वर्षाव श्यामभक्तांवर केला होता. त्याचप्रमाणे रामनवमी उत्सवात स्थानीय गांधी चौकात राम दरबार स्थापित करून गर्दीचा उच्चांक प्रस्थापित केला होता.यंदाच्या झुलनो त्सवात राष्टीय भजनकार कन्हैया मित्तल हे श्याम भक्तांच्या गर्दीचा उच्चांक निर्माण करतील अशी आशा यावेळी व्यक्त करण्यात आली. या विराट महोत्सवाची जय्यत तयारी समूहाच्या तरुणांनी केली असून श्याम भक्तांना भजने ऐकण्यासाठी बसण्याची उत्तम व्यवस्था करण्यात आली असून या महोत्सवाचा समारोप महाप्रसादाने होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. महानगरातील महिला, पुरुष,युवक युवतीं श्याम भक्तांनी या तृतीय झुलनोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन यावेळी करण्यात आले. संचालन एड सौरभ शर्मा यांनी व आभार अश्विन शर्मा यांनी मानलेत.या पत्रकार परिषदेत यावेळी शाम के दिवाने समूहाचे बहुसंख्य सेवाधारी उपस्थित होते

# बसंत बाछूका यांची कॅट संघटनेच्या प्रमुख पदी निवड



**प्रतिनिधी**, १४ जुलै

**अकोला -** सामाजिक राजकीय शैक्षणिक बँकिंग क्षेत्रासोबत व्यापाऱ्यांच्या समस्या व धार्मिक क्षेत्रामध्ये सातत्याने चाळीस वर्ष सेवा करणे आणि सातत्याने सर्वांना सोबत घेऊन बाछूका यांनी सामाजिक क्षेत्रामध्ये नावलौकिक केल्यामुळे व्यापारी संघटनेच्या सर्वात मोठी संघटनेने त्यांच्याकडे विदर्भाची जबाबदारी दिली भाजपाची कोषाध्यक्ष म्हणून सातत्याने २५ वर्षापासून धुरा सांभाळणारे नेतृत्व प्रत्येक क्षेत्रामध्ये आपल्या अथक परिश्रमाने अकोल्याचे नाव रोशन करत असल्याचे प्रतिपादन विजय अग्रवाल यांनी केले. भारतीय जनता पार्टी कार्यालया त विदर्भाच्या कॅट संघटनेचे प्रमुख पदी वसत बाछूका यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे सत्कार कार्यमात ते बोलत होते. कार्यमाचे अध्यक्ष म्हणून जयंत मसने हे होते तर मंचावर माधव मानकर चंदाताई शर्मा, रमेश अल्करी, सजयगोटफोडे, आम्रपाली उपरवट, संजय बडोणे , अंबादास उमाळे, आदी मंचावर विराजमान होते. प्रदेश सरचिटणीस तथा आ. रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, आ. वसंतजी खंडेलवाल, महानगर अध्यक्ष जयंत मसने, मा.अध्यक्ष विजयभाऊ अग्रवाल, वसंत बाच्छुका यावेळी संजय गोटफोडे, रमेश अलकरी, सौ आम्रपाली उपरवट, सौ चंदा ताई शर्मा, संजय बडोणे, राजेंद्र गिरी, संदीप गावंडे, रणजित खेडकर, गोपाळ मुळे, तुषार भिरड, नितेश पाली, अमोल गिते, नितीन राऊत, दिलीप भरणे, राजेश वगारे, प्रकाश घोगलिया, मनिष बाच्छुका, सागर शेगोकार, सिद्धार्थ उपरवट, विघाधर काकड, वैकूंठ ढोरे, सुरज शेळके, हर्ष चौधरी, मनिष बुंदेले, उज्वल बामनेट, संतोष बाभुळकर, शिवलाल इंगळे, राहुल चौरसिया, तसेच मंडळ संयोजक, मंडळा अध्यक्ष आदी उपस्थित होते.

# प्रा. डॉ. नितीन देऊळकार यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न पुरस्कार प्रदान



**प्रतिनिधी**, १४ जुलै

पुणे येथील मातृभूमी सोशल फाउंडेशन व झेप फाउंडेशन पुणे महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विघमाने दिला जाणारा महाराष्ट्र रत्न राज्यस्तरीय पुरस्कार अकोल्यातील प्रा डॉ नितीन देऊळकर यांना आज क्रीडा व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार कार्यक्रमाचे अध्यक्ष मा श्री निलेशजी लंके साहेब, खासदार यांचे हस्ते व मा ज्योती कदम उपजिल्हाधिकारी पुणे, मा राहुल आवारे सहायक आयुक्त स्वारगेट पुणे, मा सुरेखा भणगे सहायक आयुक्त पुणे महानगरपालिका व मोहन भदाणे उपविभागीय अधिकारी मुळा कालवा यांच्या उपस्थितीत पुणे येथे प्रदान करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल प्राचार्य डॉ यशवंत पाटील नागपूर, प्राचार्य डॉ भास्कर पाटील, डॉ उमेश राठी, डॉ सागर नारखेडे, डॉ संतोष तायडे, डॉ अमोल मेश्राम, प्रा नेमिचंद चव्हाण, तसेच अखिल भारतीय माळी महासंघाचे राष्टीय सरचिटणीस श्री सुभाषजी सातव, राज्य संघटक श्री गणेश काळपांडे, समाज भूषण श्री शंकररावजी गि-हे, श्रीकृष्णजी बिरकड, जिल्हाध्याक्ष प्रकाश दाते, प्रभाकर बोळे जिल्हाउपाध्यक्ष, प्रा अशोक रहाटे कोषाध्यक्ष, मनोहर उगले सचिव, सुनील जाधव कर्मचारी आघाडी, व जिल्हाध्यक्ष काँग्रेस शिक्षक सेल, संजय तडस कर्मचारी आघाडी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. ते आपल्या यशाचे श्रेय आई-वडील व सर्व सहकारी व मित्र परिवाराला देतात.

# २००५ पूर्वी नियुक्त कर्मचाऱ्यांचा जुनी पेन्शन लागू करण्यासाठी एल्गार – मुख्यमंत्र्यांना निवेदन



**प्रतिनिधी**, १४ जुलै

**मुर्तिजापूर -** जुनी पेन्शन २००५ पूर्वी नियुक्त व २००५ नंतर १००त्न टक्के अनुदानावर आलेल्या मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागणीसाठी येथील उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंर्त्यांना निवेदन देण्यात आलेले आहे.महाराष्ट शासनातर्फे सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आलेल्या सकारात्मक शपथ पत्राची प्रत मिळणे बाबत , तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना लवकरात लवकर पेन्शन लागू करून न्याय मिळवण्यासाठी ८ जुलै रोजी आझाद मैदान मुंबई येथे आंदोलन स्थळाच्या शिष्टमंडळाला सौं.संगितताई शिंदे,बोन्डे राज्याध्यक्ष जुनी पेन्शन कोअर कमेटी यांनी शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी दिलेले आश्वासनाबाबत २००५ नंतर शंभर टक्के अनुदानावर आलेल्या मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आज पर्यंत न्याय मिळाला नाही. त्यांची नियुक्ती २००५ पूर्वी असून सुद्धा केवळ शाळा १०० टक्के अनुदानित नसल्यामुळे त्यांना पेन्शन पासून वंचित ठेवण्यात आले. महाराष्ट्रातील २६,००० कर्मचाऱ्यापैकी बरेच कर्मचारी सेवानिवृत्त झाले.त्यांचे आज हाल होत आहेत.त्यापैकी काही मृत पावले तरी सरकारला जाग येत नाही.सर्वोच्च न्यायालयामध्ये हिवाळी अधिवेशनामध्ये माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांनी घोषणा केली होती की २००५ पूर्वी नियुक्त कर्मचाऱ्यांना विनाअट पेन्शन लागू करण्यात येईल व तसे सकारात्मक शपथपत्र सर्वोच्च न्यायालयात सादर करण्याची ग्वाही देण्यात आली होती. परंतु आजपर्यंत या कर्मचाऱ्यांना न्याय मिळाला नाही.त्यांच्या तोंडाला पाणी पुसली जावून त्यांची आश्वासन देवून बोळवण केल्या जात आहे. येत्या पावसाळी अधिवेशनात सकारात्मक शपथपत्र सादर करून जर त्यांना न्याय मिळवून दिला नाही तर सेवानिवृत्त मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी येत्या शिक्षकदिनी ५ सप्टेंबरला जलसमाधी आंदोलन करणार आहे.त्याकरिता आज उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार यांना शिक्षण संघर्ष संघटना व जुनी पेन्शन कोर कमिटीच्या मार्फत निवेदन देण्यात आले.



## श्री गाडगे महाराज महाविद्यालय, मुर्तिजापूर

उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (अनुदानित तासिका तत्वावर)

श्री गाडगे महाराज महाविद्यालय कारंजा रोड, मुर्तिजापूर, जि.अकोला च्या वर्ग ११ आणि १२ साठी घड्याळी तासाप्रमाणे खालील शिक्षकांची पदे भरावयाची आहे.

| अ. क्र. | पद | विषय | जागा | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | उच्च माध्यमिक शिक्षक | इंग्रजी | ०१ | एम.ए.द्वितीय श्रेणी बी.एड. |
| २ | | मराठी | ०१ | एम.ए.द्वितीय श्रेणी बी.एड. |
| ३ | | पायाभुत अभ्यासक्रम (जनरल फाऊंडेशन) | ०१ | B.C.A./M.C.A. किंवा B.E.(Comp.Sci.), M.Com., B.ed. |
| ४ | | पर्यावरण | ०१ | M.Sc.(Env.Sci./Biology) B.ed. |
| ५ | | आरोग्य व शारीरीक शिक्षण | ०१ | बी.पी.एड व एम.पी.एड |

मुलाखतीकरीता मुळ प्रमाणपत्र व अर्जासह इच्छुक उमेदवारांनी मुळ प्रमाणपत्रांसह दि.१८/०७/२०२५ ला सकाळी ११.०० वाजता महाविद्यालय स्वखर्चाने उपस्थित रहावे.

प्राचार्य, डॉ.बी.एम.ठाकरे



# स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी अवैध गुटका वाहनासह जप्त



**प्रतिनिधी दि २५**

**वाशिम :** वाशिम पोलीस घटकामध्ये जिल्हा पोलीस अधिक्षक अनुज तारे यांनी पदभार स्विकारल्यापासुन त्यांनी कोणत्याही प्रकारचे अवैध धंदे चालणार नाहीत, संपत्ती विषयक तसेच इतरही गुन्हे घडणार नाहीत, त्याला प्रतिबंध होईल याकरीता विशेष प्रतिबंधक उपाययोजना राबविल्या. सतत पेट्रोलींग, वेळोवेळी ऑपरेशन ऑल आउट, कोंबीग ऑपरेशन व नाकाबंदी सारख्या विशेष माहिमा राबवुन रेकॉर्डवरील व माहितगार गुन्हेगारांवर सतत पाळत ठेवुन आरोपीतांविरुध्द प्रभावी प्रतिबंधक कार्यवाहया करण्यात आल्या. दि.१४ जुलै रोजी प्रदीप परदेशी, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम यांना मिळालेल्या गोपणीय बातमीद्वारे वाशिम व अकोला जिल्हयाचे हद्दीवर स्थानिक गुन्हे शाखेची टिम तात्काळ रवाना केली. टिमला दिलेल्या सुचनेप्रमाणे पेट्रोलींग करीत असतांना संशयीत वाहन आढळुन आल्याने अकोला ते वाशिम रोड वरील मेडशी टि पॉईट वरील जयभोले धाब्यासमोर सदर वाहनाची पंचासमक्ष तपासणी केली असता वाहनामध्ये पान मसाला, सुगंधीत तंबाखु, मिळुन आल्याने आरोपी अब्दुल सादीक अब्दुल रफीक वय २६ वर्ष, रा. एकता चौक, शिवणी अकोला याचेसह वाहनामधील गुटखा पान मसाला व सुगंधीत तंबाखु किंमत ६,७६,४६०/- रुपये व महिंद्रा बोलेरो मॅक्स पिकअप वाहन किंमत ९,००,०००/- रुपये असे एकुण १५,७६,४६०/- रुपयांचा मुद्देमाल पुढील कारवाई करीता पोलीस स्टेशन मालेगाव यांचे ताब्यात दिला आहे. सदर कारवाई अनुज तारे, पोलीस अधिक्षक वाशिम, श्रीमती लता फड, अपर पोलीस अधिक्षक, नवदीप अग्रवाल, सहायक पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, श्री पदीप परदेशी, सपोनि. योगेश धोत्रे, अंमलदार विनोद सुर्वे, ज्ञानदेव म्हात्रे, अमोल इरतकर, गोपाल चौधरी, संतोष वाघ, सर्व स्थागुशा वाशिम यांनी मोलाची कामगिरी बजावली आहे. याबाबत वरीष्ठ पातळीवर सुध्दा दखल घेण्यात आली आहे.

# जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका: प्रारूप प्रभाग रचनेबाबत हरकती/सूचना मागवल्या




**प्रतिनिधी दि २५**

**वाशिम :** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ४५) च्या कलम ९२ पोट-कलम (१) अन्वये वाशिम जिल्ह्यातील आगामी सार्वत्रिक निवडणुकांसाठीच्या जिल्हा परिषद क्षेत्रांतील निवडणूक विभागांची व कलम ५८ (१) (अ) अन्वये पंचायत समित्यांमधील निवडणूक गणांच्या प्रारूप प्रभाग रचनेबाबत राज्य शासनाने प्राधिकृत केलेले अधिकारी जिल्हाधिकारी, वाशिम यांच्या क्रमांक २०२५/जि.प.नि./कावी- ४१९ दिनांक १४/०७/२०२५ च्या आदेशानुसार अधिसूचना जाहीर करण्यात आली आहे. या अधिसूचनेद्वारे प्रारूप प्रभाग रचनेवर हरकती व सूचना मागवण्यात आल्या आहेत. याबाबतची माहिती जिल्हाधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस. यांनी दिली आहे. अधिसूचनेनुसार, प्रारूप प्रभाग रचना पुढील ठिकाणी प्रसिद्ध करण्यात आली आहे:

(१) जिल्हाधिकारी, वाशिम यांचे कार्यालयातील फलकावर. (२) जिल्हा परिषद, वाशिम यांचे कार्यालयातील फलकावर. (३) तहसीलदार, कारंजा, मानोरा, मंगरुळपीर, मालेगाव, रिसोड व वाशिम यांचे कार्यालयातील फलकावर. (४) पंचायत समिती, कारंजा, मानोरा, मंगरुळपीर, मालेगाव, रिसोड व वाशिम यांचे कार्यालयातील फलकावर. या आदेशाच्या मसुद्यावर कुणाचीही हरकत किंवा सूचना असल्यास त्यासंबंधीची सविस्तर लेखी निवेदने किंवा हरकती जिल्हाधिकारी, वाशिम यांच्याकडे दिनांक २१ जुलै पर्यंत सादर कराव्यात. उपरोक्त तारखेनंतर जिल्हाधिकारी, वाशिम यांच्याकडे आलेली कोणतीही निवेदने, हरकती किंवा सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. नागरिकांनी या प्रारूप प्रभाग रचनेचे अवलोकन करून, आवश्यकतेनुसार आपल्या हरकती किंवा सूचना वेळेत सादर कराव्यात, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# २००५ पूर्वी नियुक्त शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागु करा



**प्रतिनिधी दि २५**

**कारंजा :** १ नोव्हेंबर २००५ पुर्वी नियुक्त व २००५ नंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागू होण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आलेल्या सकारात्मक शपथ पत्राची प्रत संघटनेला देण्यात यावी, तसेच लवकरात लवकर जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी,या संदर्भात वाशिम जिल्हा शिक्षण संघर्ष संघटेनेच्या वतीने मा. जिल्हाधिकारी वाशिम व माध्यमिक शिक्षणाधिकारी वाशिम यांना १४ जुलै २५ रोजी निवेदन देण्यात आले .

निवेदनात मागणी करण्यात आल्यानुसार सन १९८२ ची जुनी पेंशन लागु होण्याकरीता महाराष्ट्र शासनातर्फे सर्वोच्च न्यायालयात सकारात्मक शपथपत्र दाखल करण्यात न आल्यामुळे दि १४ व १५ जुलै २०२५ पासुन संघटनेच्या राज्यातील पेंशन पिडित बांधवांनी आझाद मैदान मुंबई येथे आंदोलन करण्याचा पवित्रा घेतला होता. परंतु अधिवेशन काळात मुंबई येथे संघटनेच्या अध्यक्षा डॉ सौ संगीता शिंदे बोंडे यांनी ८ जुलै रोजी शिक्षण मंत्री दादाजी भुसे साहेब यांची भेट घेतली असता शासनातर्फे जुन्या पेन्शन बाबत सकारात्मक शपथपत्र सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आले असून लवकरच जुनी पेन्शन योजनेबाबत कार्यवाही करणार असल्याचे आश्वासन दिले आहे. तसेच ७ व ८ जुलै रोजी आझाद मैदान येथे झालेल्या आंदोलनात शिष्टमंडळासोबत हाच पुनरुच्चार शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केला आहे.तसेच शिक्षण मंत्री मा. ना. पंकज भोयर यांनी सभागृहात सुद्धा असेच मत व्यक्त केले. परिणामी शिक्षण मंत्र्यांच्या शब्दाला मान देऊन दिनांक १४ व १५ जुलै रोजी चे नियोजित आंदोलन स्थगित करण्यात आले आहे. परंतु या सकारात्मक शपथपत्रात नेमके काय असेल? हे जाणून घेण्याची उत्सुकता राज्यातील शिक्षक तथा शिक्षकेत्तर कर्मचारी बांधवांना लागली आहे.तरी महाराष्ट्र शासनाने सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या सकारात्मक शपथपत्राची संघटनेला एक प्रत देण्यात यावी.तसेच जुनी पेन्शन योजना लवकरात लवकर लागू करावी.अन्यथा आमच्या पेन्शनची दखल न घेतल्यास २६००० प्राचार्य , मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचारी जलसमाधी आंदोलन करणार असल्याचा इशारा त्यांनी निवेदनात दिला आहे. निवेदनावर वाशिम जिल्ह्यातील शिक्षण संघर्ष संघटनाचे जिल्हाध्यक्ष प्रशांत कवर, जिल्हा सचिव नितेश भिंगे, जिल्हा कार्याध्यक्ष विजय भड, जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण कदम,यांच्यासह एस के. सोनोणे, प्रवीण सोनीवाल, अरविंद ठाकरे,यू.एन खीराडे, देविदास घेगाटे, बंडूभाऊ टापरे, डी.एम बांडे, लक्ष्मण धाडवे, संतोष वानखडे, सुनील गवइ, एस.आर सुर्वे, विठ्ठल भिसडे,जी.जी गोटे, एस. एस ताजणे, साहेबराव भगत, जे.व्ही कबाडे, संजय वानखेडे आदि पेन्शनग्रस्त उपस्थित होते.

# भाजपा वाशिम शहराच्या वतीने जल्लोष! थ्छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत

**वाशिम :** छत्रपती शिवाजी महाराज यांचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा असलेले १२ गड-किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट झाल्याची घोषणा होताच, वाशिम शहरात भारतीय जनता पार्टीच्या वतीने जल्लोष करण्यात आला. संपूर्ण शहरात शिवप्रेमी, नागरिक, कार्यकर्ते यांनी एकत्र येऊन अभिमानाने आणि आनंदाने या ऐतिहासिक क्षणाचा उत्सव साजरा केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे आणि दृढ इच्छाशक्तीचे हे यश आहे. २०१४-१५ मध्ये मुख्यमंत्रीपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर त्यांनी प्रथमच छत्रपतींच्या गडकोटांना जागतिक वारसा दर्जा मिळवून देण्याचा संकल्प व्यक्त केला होता. २०१८ साली केंद्रीय संस्कृती मंत्रालयाच्या समन्वयाने या प्रक्रियेला गती देण्यात आली आणि डिसेंबर २०२३ मध्ये अंतिम प्रस्ताव युनेस्कोकडे सादर करण्यात आला. राज्य सरकार, पुरातत्त्व विभाग व इतिहासतज्ज्ञांच्या संयुक्त प्रयत्नांतून युनेस्कोने अखेर ११ जुलै २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले जागतिक वारसा यादीत समाविष्ट केल्याची घोषणा केली.

या १२ किल्ल्यांची यादी पुढीलप्रमाणे: रायगड, राजगड, प्रतापगड, शिवनेरी, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी, जिंजी, पन्हाळा, लोहगड, साल्हेर आणि सिंधुदुर्ग या ऐतिहासिक निर्णयामुळे संपूर्ण महाराष्ट्राचा, विशेषतः शिवप्रेमींचा ऊर अभिमानाने भरून आला आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे प्रेरणास्थान आहेत, आणि आम्ही त्यांच्या गडकोटांचा केवळ गौरव केला आहे, राजकारण नाही, असे भावनिक उद्गार आमदार श्याम खोडे यांनी यावेळी व्यक्त केले. या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याचे मंत्री मा. श्री.संजय राठोड यांची विशेष उपस्थिती लाभली. वाशिम शहरात पार पडलेल्या जल्लोष कार्यक्रमाचे आयोजन आमदार श्याम खोडे यांच्या मार्गदर्शनामध्ये तथा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तमची चितलांगे यांच्या उपस्थितीमध्ये भाजपा शहराध्यक्ष मनिष मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. कार्यक्रमात भाजपा पदाधिकारी,



युवा मोर्चा, महिला मोर्चा, शिवप्रेमी, हिंदवी स्वराज्य परिवार, गजानन मेसरे सर तसेच शिव प्रतिष्ठानचे गणेश गायकवाड व इतर पदाधिकारी बजरंग दल, विश्व हिंदू परिषद आणि विविध हिंदुत्ववादी संघटनेचे पदाधिकारी व असंख्य नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमादरम्यान भगवा ध्वज फडकवत, जय भवानी जय शिवाजी च्या घोषणा देत सर्वत्र आनंदाचा आणि अभिमानाचा माहोल पाहायला मिळाला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला माल्यार्पण व अभिवादन करून फटाके फोडून ढोल च्या गजरात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. हा क्षण केवळ महाराष्ट्रासाठी नाही, तर संपूर्ण भारतासाठी गौरवशाली आहे.

# शिष्यवृत्ती परीक्षेत समृद्धी रत्नपारखी हिचे सुयश

**प्रतिनिधी दि २५**

**मानोरा :** येथील पत्रकार अशोक रत्नपारखी यांची मुलगी समृध्दी अशोक रत्नपारखी ही संत वामन महाराज इंग्लिश प्रायमरी स्कूल या शाळेत इयत्ता नववी वर्गात शिकत आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा पुणे अंतर्गत पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. आपल्या यशाचे श्रेय तिने मुख्याध्यापक,शिक्षक वृंद आईवडीलांना दिले. समृध्दी हीला



शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश मिळाल्याने तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक
हिंदुस्थान
मंगळवार दि.१५ जुलै २०२५
भारतीय सौर २५ आषाढ शके १९४७
Email: ytlhindu@gmail.com
www.dainikhindusthan.com

# यवतमाळ जिल्हा विशेष

# 'सातबारा कोरा'चे आंदोलन आणखी तीव्र करू

## बच्चु कडू यांचा सरकारला इशारा पदयात्रेचा अंबोडा येथे समारोप!

**महागाव, दि.१४ (तालुका प्रतिनिधी)**

निवडणूक काळात शेतकऱ्यांना कर्जमाफी देवून सातबारा कोरा करू अशी हमी देणाऱ्या भाजपा समर्थित सरकारने कर्जमाफी तर सोडाच पण शेतीमालाचा हमी दरही देण्यास नकार दिला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या विदारक स्थितीकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आमचे हे पदयात्रा आंदोलन होते. मात्र सरकारने अजुनही ठोस निर्णय घेतलेला नाही, त्यामुळे आता सातबारा कोराचे हे आंदोलन राज्यभरात अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा बच्चु कडू यांनी आज सोमवारी दिला.

सातबारा कोरा पदयात्रेचा आज महागाव तालुक्यातील अंबोडा येथे समारोप करण्यात आला. यावेळी हजारो शेतकऱ्यांना संबोधीत करतांना कडू यांनी शेतकऱ्यांसाठी आता रक्त सांडले तरी बेहत्तर, असे सांगत हे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला. यावेळी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे तरूण आमदार रोहित पाटीलही प्रामुख्याने उपस्थित होते. राष्ट्रवादी शरद पवार गटानेही कडू यांच्या आंदोलनाला समर्थन दिले आहे.

बच्चु कडू यांची ही यात्रा अमरावती जिल्ह्यातील पापळयेथून सुरू करण्यात आली होती. १३८ किमी अंतर पार करत आज सोमवारी चिलगव्हाण येथे या यात्रेचा समारोप झाला. तेथून नजीकच असलेल्या अंबोडा येथे समारोपाची विराट सभा पार पडली.



तत्पुर्वी पदयात्रेच्या मार्गात ३९ वर्षांपूवी सामूहिक आत्महत्या केलेल्या चिलगव्हाण येथील साहेबराव पाटील करपे यांच्या वाड्याला भेट देऊन बच्चू कडू यांनी त्यांच्या स्मृतींना अभिवादन केले.

गावातील सभागृह अपुरं पडल्यामुळे सभा थेट नागपूर तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरच घेण्यात आली. किमान ८ ते १० हजारांहून अधिक शेतकरी रस्त्यावर बसले.शिवाय त्यांनी सरकारविरोधात संघर्षाचा निर्धार करण्याचा प्रण यावेळी घेतला.

यावेळी दिवंगत आर आर पाटील यांचे सुपूत्र आमदार रोहित पाटील यांनी आपल्या ओघवत्या शैलीतून शेतकरी विरोधी धोरणाचे वाभाडे काढले. शेतकऱ्यांच्या आंदोलनासाठी आम्ही बच्चु कडू यांच्या आंदोलनासोबत कायम असल्याचे त्यांनी यावेळी निक्षुण सांगितले. यावेळी पोलिसांनी तगडा बंदोबस्त लावला होता.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी अंबोडा येथील अमृत पॅटर्न चे जनक अमृतराव देशमुख, माजी सभापती कृषी उत्पन्न बाजार समितीचे दीपक आडे, कैलासराव तायडे ,संजय पाटे, विजय सूर्यवंशी , संजय नागरगोजे , दत्तराव कदम, डॉ. संदीप शिंदे, नारायण पतंगराव, हनवंतर देशमुख, प्रवीण ठाकरे, तात्या शिन्दे, संदीप ठाकरे, अमोल आवटे यांच्यास विविध पक्ष, सामाजिक संघटनां तालुक्यातील शेतकरी हजारोच्या संख्येने उपस्थित होते.

# राज्यपाल हरीभाऊ बागडे यांची गुंज येथील नॅचरल शुगर युनिटला भेट

**यवतमाळ, दि.१४(कार्यालय प्रतिनिधी)**

राजस्थानचे राज्यपाल महामहिम हरीभाऊ बागडे यांनी महागांव तालुक्यातील गुंज येथील नॅचरल शुगर युनिटला भेट दिली. यावेळी उमरखेड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसनराव वानखेडे, नॅचरल शुगर युनिटचे अध्यक्ष बी. बी. ठोंबरे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

राज्यपालांनी नॅचरल शुगर युनिट मधील कर्मचाऱ्यांची भेट घेऊन तेथील विविध प्रक्रियांची माहिती जाणून घेतली. तसेच युनिटची पाहणी केली. तसेच युनिटच्या परिसरात त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. .यावेळी नॅचरल उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष कृषीरत्न बी. बी. ठोंबरे यांनी राज्यपाल महोदयांना गेल्या दहा वर्षात नॅचरल शुगरचे माध्यमातून मराठवाड्याप्रमाणेच विदर्भातही शेतकऱ्यांच्या हितासाठी केलेल्या कार्याची विस्तृत माहिती दिली .



यावेळी युनिटच्या अध्यक्षांसह उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे, उपविभागीय पोलिस अधिकारी हनुमंतराव गायकवाड, पोलिस अधिकारी थोरात, महागावचे तहसीलदार अभय मस्के, माजी जिल्हा परिषद सदस्य चिंतागराव कदम आदी उपस्थित होते.

# ग्रामपंचायत सदस्यांच्या कुटुंबाला मारहाण, गुन्हे दाखल

**उमरखेड, दि.१४ (तालुका प्रतिनिधी)**

आसोली ग्रामपंचायतमध्ये पाण्याच्या फिल्टरबाबत ग्रामपंचायतीचे सदस्य व ग्रामसेवक सभा घेत होते. तेवढ्यात तिथे आलेल्या एका आरोपीने सदस्याला शिवीगाळ करून सभेत राडा घातला. इतकेच नव्हे तर बेदम मारहाण केली. ही घटना १२ जुलैला सकाळी ९:३० ते ९:४५ वाजताच्या दरम्यान पुसद तालुक्यातील आसोली येथे घडली. यशवंत सुभाष कोल्हे (३४) रा. आसोली ता. पुसद असे फिर्यादीचे नाव आहे. तर सुधाकर उत्तम गायकवाड (३८) रा. आसोली ता. पुसद असे गुन्हे दाखल झालेल्यांचे नाव आहे. फिर्यादी हे ग्रामपंचायतीमध्ये उपस्थितीत पाण्याच्या फिल्टरबाबत सभा सुरू होती. तेवढ्यात आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करून फिर्यादीला फावड्याच्या दांडक्याने मारहाण केली.

# दारव्हा जवळा रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करा

## अन्यथा आंदोलनाचा इशारा



**दारव्हा, दि.१४ (तालुका प्रतिनिधी)**

दारव्हा ते जवळा या रस्त्याच्या नूतनीकरणाचे काम ब?याच दिवसापासून सुरूअसून कामाची गती मंदावली आहे. अनेक ठिकाणी रस्ता खोदून ठेवण्यात आला आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असून खड्ड्यांमध्ये पाणी साचून वाहनधारकांच्या अपघाताचे प्रमाण वाढले आहे. सदर काम तातडीने पूर्ण न केल्यास शिवसेना स्टाईलने आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

ईगल कन्स्ट्रक्शन कंपनीच्या माध्यमातून सदर काम हे अत्यंत मंद गतीने सुरूआहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असून खोदकाम करून ठेवलेल्या रस्त्यांवर ठिकठिकाणी खड्डे पडलेले आहेत. त्यात पावसाचे पाणी साचून वाहन धारकांना मार्गक्रमण करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिणामी ब?याच ठिकाणी या रस्त्यावर अपघात घडत आहेत. सदर रस्त्यावरील बागवाडी नजीक, दहेली जवळ या रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. या रस्त्याचे काम करणारी इगल कन्स्ट्रक्शन कंपनी मात्र नागरिकांच्या मुळावर उठली असून नागरिकांमधून संताप व्यक्त करण्यात येत आहे. सदर काम तातडीने पूर्ण करावे अशी मागणी उपविभागीय अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. हे काम त्वरित पूर्ण न केल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे .

निवेदन देताना शिवसेना शहरप्रमुख राजू दुधे,नामदेव जाधव, उपशहर प्रमुख एकनाथ माहुरकर,आनंद झोळ,दीपक जाधव,योगेश गवळी,विवेक जाधव,वैभव निमकर,सचिन ताजने,अभी शिंदे,श्रावण दाढे,राम मते आदी उपस्थित होते.

# सन्मानाने जगण्यासाठी ज्ञानाची गरज -प्रा.विठ्ठल कांगणे

**आर्णी, दि.१४ (तालुका प्रतिनिधी)**

समाजामध्ये पद, प्रतिष्ठा, व सत्ता हे केवळ पैशानेच नव्हे तर आपल्या शैक्षणिक व बौद्धिक क्षमतेनुसारही प्राप्त करता येते म्हणूनच सन्मानाने जीवन जगण्यासाठी ज्ञानाची गरज आहे त्याकरिता विद्यार्थ्यांनी आपल्या डोळ्यापुढे उद्दिष्ट ठेवून यश संपादन करणे गरजेचे आहे असे प्रतिपादन विवेकानंद करिअर अकॅडमी परभणीचे संचालक प्राध्यापक व वक्ते विठ्ठल कांगणे यांनी केले.

ते गायडन्स कोचिंग क्लासेस च्या वतीने महालक्ष्मी लॉन येथे दिनांक १३ जुलै रोजी आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळ्यात बोलत होते पुढे कांगणे म्हणाले की विद्यार्थी दहावीला यशस्वी होणे म्हणजेच आयुष्यात यशस्वी होणे नव्हे तर दहावीचे वर्ष हे टर्निंग पॉईंट आहे. भविष्यात आपले कुटुंबीय सन्मानाने जीवन जगण्याकरिता परिस्थितीची जाणीव ठेवून सातत्यपूर्वक अभ्यास करणे गरजेचे आहे तेव्हाच यशाचे शिखर गाठता येईल .

गायडन्स क्लासेसचे संचालक साजिद शेख यांनी तेरा विद्यार्थ्यांना शंभर पैकी १०० गुण प्राप्त करून दिलेत सोबतच ९० गुणाच्या वर ८० विद्यार्थी घडविले गाईडन्सच्या सर्व टीमचे व विद्यार्थ्यांचे यावेळी त्यांनी अभिनंदन केले.



या कार्यक्रमाचे अध्यक्ष विधान परिषदेचे माजी सदस्य आमदार ख्वाजा बेग यांनी जिद्द , चिकाटी व उद्दिष्ट जर असेल तर व्यक्तीला कुठलेही यश संपादन करता येते हे त्यांनी आपल्या शालेय जीवनातील घटनाक्रम सांगून त्याची प्रचिती दिली .

यावेळी क्लासेसचे संचालक साजिद शेख यांनी केवळ पैसा मिळवणे हा उद्देश नसून एक सामाजिक दायित्व समजून आपल्या हातून सुसंस्कारित पिढी निर्माण व्हावी याकरिता गायडन्स क्लासेसची संकल्पना प्रामाणिकपणे पूर्णत्वास नेण्याचा माझा मानस असल्याचे सांगितले.

यावेळी येथील पोलीस स्टेशनचे एपीआय देशमुख तसेच डॉ. अशोक कोठारी, आदींनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. मंचावर किशोर रावते विजय ढाले ,गावंडे बावने सर, इम्रान पठाण , मनोहर तायडे ,चव्हाण उपस्थित होते.

प्रास्ताविक उंभाड यांनी केले तर संचालन वसीम शेख व शेख यांनी केले तर आभार शिवकुमार राठोड यांनी मानले. यावेळी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध



**उमरखेड, दि.१४ (तालुका प्रतिनिधी)**

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर दि १३ जुलै रोजी अक्कलकोट येथे विकृत मनोवृत्तीच्या लोकांकडून शाई फेक करण्यात आली .त्याचा उमरखेड संभाजी ब्रिगेडच्या वतीने उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देऊन निषेध करण्यात आला आहे .

शिव फुले शाहू आंबेडकर यांचा विचार समाजात रुजविण्यासाठी आणि बहुजन समाजात अनेक उद्योगपती घडविण्यासाठी प्रवीण गायकवाड यांचे योगदान आहे .त्यांनी आपल्या कार्यातून अनेकांची नेहमी पोलखोल होत असते त्यामुळे चिडलेल्या गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी त्यांच्यावर शाई फेक करून भ्याड हल्ला केला त्याचा उमरखेड तालुका संभाजी ब्रिगेडच्या वतीने उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देऊन निषेध करण्यात आला .यावेळी गुणवंत सूर्यवंशी ,प्राचार्य वि.ना. कदम चक्रधर पाटील देवसरकर ,देवानंद मोरे ,एड शिवाजीराव वानखेडे,सुरेश कदम ,राम कदम ,शिवाजी माने,विठ्ठल हनवते ,बालाजी वानखेडे गजानन चव्हाण आदींनी उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे यांना निवेदन देऊन निषेध नोंदविला आहे.

# व्हॉइस ऑफ मीडियाच्या तालुकाध्यक्षपदी धर्मराज गायकवाड तर सचिवपदी आजीस शेख



**दिग्रस, दि.१४ (तालुका प्रतिनिधी)**

पत्रकारांच्या हक्कांसाठी आवाज उठवणारी अग्रगण्य राष्ट्रीय स्तरावरील संघटना असलेल्या 'व्हॉइस ऑफ मीडिया दिग्रस तालुका शाखेची नवी कार्यकारिणी औपचारिकरित्या गठीत करण्यात आली आहे. या बैठकीत पत्रकार बांधवांनी एकत्र येऊन नव्या कार्यकारिणीला एकमुखी पाठिंबा दर्शवला.

या कार्यक्रमाचे आयोजन दिग्रस शहरात करण्यात आले होते. यावेळी संघटनेचे जिल्हा कार्यकारिणी सदस्य जय राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीसह अनेक पत्रकार आणि इलेक्ट्रॉनिक, प्रिंट मीडियाचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी दिग्रस तालुकाध्यक्षपदी धर्मराज गायकवाड, उपाध्यक्ष प्रशांत झोळ,सचिव आजीस शेख,कार्याध्यक्ष सैय्यद शोएब,प्रसिद्धी प्रमुख साजिद पतलेवाले,संघटक सदानंद जाधव,कायदेशीर सल्लागार ॲड.वैभव गव्हाणे आणि सदस्य म्हणून जुबेर खान,पृथ्वीराज चव्हाण,विठ्ठल राठोड,संतोष राठोड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

संघटनेच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी नव्या कार्यकारिणीला शुभेच्छा देत सांगितले की, 'पत्रकार हा समाजाचा आरसा आहे. त्यांच्या हक्कांचे संरक्षण होणे अत्यंत आवश्यक आहे. व्हॉइस ऑफ मीडियाचा हेतू केवळ संघटना वाढवणे नसून, पत्रकारांच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेणे हे आमचे ध्येय आहे.

## सातबारा कोरा करण्यासाठी राळेगावत पथ्य नाट्यातून केली जनजागृती

**राळेगाव, दि.१४ (तालुका प्रतिनिधी)**

बच्चूभाऊ कडू यांच्या नेतृत्वात ७/१२ कोरा करण्यासाठी सोमवार दिनांक ७ जुलै २०२५ पासून पापळ ते चिलगव्हाण, १३८ किमीची पदयात्रेला सुरुवात केली असून त्याबाबत राळेगाव येथे सातबारा कोरा करा कोरा करा अशी जनजागृती आज दिं.१३ जुलै २०२५ रोज रविवारला गजानन वानखेडे यांनी आपल्या पथनाट्यातून सादर केली आहे.

यावेळी उपस्थित भय्यासाहेब गावंडे,मंगेश राऊत,नगरसेवक संजय दुरबुडे,प्रहार तालुका अध्यक्ष, गणपतराव ताटेवार,दिलीप कींनाके, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष(शरद पवार गट)तालुकाअध्यक्ष अरविंद तामगाडगे , नितीन कोमेरवार, भारत ठुने, प्रवीण काकडे,दिलीप मानकर,मंगेश पिंपरे, वसंत कोमेजवार, शुभम चिडाम,रुपेश कोठारी,रोहित वर्मा,अशोक भागवत, अशोक पिंपरे,फिरोज शेख,संदेश शेंडे,सूरज रामगडे, शखिल शेख,रविंद्र रामगडे,नानाजी तोडासे,राजेश काकडे,महेश तोडासे,सुरज कोवे,सुनील मोकडे,आयुश मेसरे,अनुप मेसरे,पिंपळखुटी तसेच राळेगाव येथील शेतकरी होते.

**प्रवेश देणे सुरु आहे**

श्री. कळमेश्वर बहु. ग्राम विकास संस्था यवतमाळ
र. नं. एफ-११८२२ द्वारा संचालित

**माऊली मागास वर्गीय मुलींचे वसतीगृह**
**नातुवाडी, दारव्हा जिल्हा. यवतमाळ**

येथे सन २०२५-२६ या शैक्षणिक सत्राकरीता वर्ग ५ते १० च्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना खालील वर्गवारीनुसार प्रवेश देणे सुरु आहे.

| अ.क्र. | संवर्ग टक्केवारी | टक्केवारी | मान्य संख्या |
|---|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती | ३२% | १३ |
| २. | अनुसूचित जमाती | ३८% | १५ |
| ३. | विमुक्त भटक्या जाती | २८% | ११ |
| ४. | विशेष मागास वर्ग | ०२% | ०१ |
| ५. | इतर मागास वर्गीय | २०% | ०८ |
| ६. | अपंग | ०३% | ०१ |

टिप-वरील संवगतिील विद्यार्थ्यांनांना वर्ग ५ते १० करीता प्रवेश देणे सुरु आहे.

अधिक्षीका
माऊली मा. व. मुलीचे वसतीगृह
नातुवाडी दारव्हा, मो. ९४२३६६५६५६

**श्री. जी.सी. फुलझळके साहेब दिवाणी दिवाणी न्यायाधिश क. स्तर, यांचे न्यायालय नेर**

**जाहिर नोटीस** दिवाणी किरकोळ अर्ज ११४/२०

श्रीमती अनुराधा सुरेश सांगळे अधिक २ -वि कोणीही नाही
नेता. १४/०८/२०२५

याव्दारे सर्वत्र जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार श्रीमती अनुराधा सुरेश सांगळे अधिक २ वि. कोणीही नाही रा.उदापुर ता.नेर जि. यवतमाळ यांनी हया न्यायालयात बॉम्बे रेगुलेश ॲक्ट १८२७ अंतर्गत वारसाचे प्रमाणपत्र मिळणकरीता दिवाणा किरकोळ अर्ज ११४/२०२५ अन्वये अर्ज दाखल केला आहे

अर्जदारांचे असे म्हणने आहे की, अर्जदार क्र. १ श्रीमती अनुराधा सुरेश सांगळे, अर्जदार क्र.२ वैभव सुरेश सांगळे, अर्जदार क्र.३ कु.वैष्णवी सुरेशा सांगळे मयत नामे सुरेश गोविंदराव सांगळे याचा मृत्यू दि. २६/०५/२०१९ रोजी उदापुर ता. नेर जि. यवतमाळ येथे झाला. मयत सुरेश गोविंदराव सांगळे यांच्या मृत्युनंतर अर्जदार क १ ते ३ हेच त्यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्र.१ ते ३ व्यतीरीक्त मयत सुरेश गोविंदराव सांगळे यांचे इतर कोणीतरी वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणने आहे. यावर कुणाला काही आक्षेप असल्यास त्यांनी आपला आक्षेप अर्ज स्वतः किवा आपल्या वकीलामार्फत हा जाहीरनामा प्रसिध्द आल्यापासून एक महीन्याचे आत पुराव्यानिशी या न्यायालयात नोंदवावा अन्यथा अर्जदारांचा अर्ज नियमाप्रमाणे निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि. ०९/०७/२०२५ रोजी माझ्या सहि व कोर्टाचे शिक्यानिशी दिले
दिनांक ०९/०७/२०२५

आदेशानुसार
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, नेर

**बाभुळगांव नगर पंचायत, बाभुळगांव**

जि. यवतमाळ- पिन ४४५१०१
दुरध्वनी क्रमांकः- ०७२०३ २७०२४१ ई-मेल: :npbabhulgaon@gmail.com
क्रमांक/नपंबा / आ वि/निविदा सूचना क/४२६/२०२५ दिनांक १४/०७/२०२५

**निविदा सुचना (आरोग्य विभाग)**

नगर पंचायत बाभूळगाव द्वारा माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत खालील नमूद कामाच्या द्विलीफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे. तरी निविदा धारकांनी कोरे निविदा फॉर्म दिनांक १५/०७/२०२५ ते २४/०७/२०२५ पर्यत कार्यालयीन वेळेस सायंकाळी ४.०० वाजेपर्यत अनामत रक्कमसह जमा करून रोखपाल यांच्याकडून प्राप्त करून घेता येईल. सदर निविदा दिनांक २४/०७/२०२५ ला शक्य झाल्यास सायंकाळी ५.०० वाजता उघडण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा किंमत | अनामत रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | प्रेशर कुकरचे दर पुरविणे (अंदाजित ७०० नग) | ५००/- | १०००/- | ३० दिवस |
| २ | पिठाची गिरणी १ नग | २००/- | ५००/- | ३० दिवस |
| ३ | शिलाई मशीन १ नग | २००/- | ५००/- | ३० दिवस |
| ४ | शेवई मशीन १ नग | २००/- | ५००/- | ३० दिवस |

१) सदर साहित्य नामांकित कंपनीचे असणे आवश्यक राहील. दर नमूद करताना कंपनीचे नाव नमूद करावे लागतील.
२) सदर कूकर ३ ते ५ kg चे असणे आवश्यक राहील.
३) अंदाजित ७०० नग प्रेशर कुकरचा पुरवठा असल्याने त्याबाबतचे Specifiction सोबत जोडावे लागेल.
४) सदर कामातील अटी व शर्ती नगर पंचायत बाभूळगाव आरोग्य विभागात पाहावयास मिळतील याची नोंद घ्यावी.

| स्वा/- | स्वा/- | स्वा/- | स्वा/- |
|---|---|---|---|
| सौ. संगीता सुधाकर माळकुरे | श्याम शिवशंकर जगताप | शेख कादर शेख रहेमान | डॉ. पल्लवी सुरेश सोटे |
| नगराध्यक्ष | उपाध्यक्ष | आरोग्य सभापती | मुख्याधिकारी |
| नगरपंचायत, बाभूळगाव | नगरपंचायत, बाभूळगाव | नगरपंचायत, बाभूळगाव | नगरपंचायत, बाभूळगाव |

**नगर परिषद कार्यालय, दिग्रस जि. यवतमाळ ४४५२०३**

जा.क्र.नपदि/बाजार वि./ई-लिलाव १४३/२०२५
दिनांक :- १४/०७/२०२५

**जाहीर ई-लिलाव सूचना (तिसरी वेळ)**
**बाजार विभाग न.प. दिग्रस**

नगर परिषद दिग्रस येथील न.प. अधिनस्थ प्र. क्र. ०५ आरक्षण क्र. ३२ येथील घंटीबाबा व्यापारी संकुल या ठिकाणी एकूण ११ दुकान गाळ्यांचा न्यूनतम शासकीय मासिक भाड्याच्या रक्कमेवर पुढील तीन वर्ष कालवधी करिता दिनांक २५/०७/२०२५ रोजी जाहीर ई-लिलाव करण्यात येत आहे.

**- जाहीर ई-लिलाव प्रक्रियेचा तपशील -**

| अ.क्र | जाहीर ई-लिलावाचा तपशील | दिनांक पासून | दिनांक पर्यत |
|---|---|---|---|
| १) | जाहीर ई-लिलाव प्रसिद्धीचा दिनांक | दिनांक १५/०७/२०२५ | दिनांक १९/०७/२०२५ सायं. ५.०० वाजेपर्यत |
| २) | आवश्यक दस्त ऐवज व डी. डी. Online अपलोड करण्याची मुदत. | दिनांक १५/०७/२०२५ | दिनांक १९/०७/२०२५ सायं. ५.०० वाजेपर्यत |
| ३) | आवश्यक दस्तऐवज व डी.डी. (धनाकर्ष) न. प. कार्यालयात आणून देण्याचा दिनांक | दिनांक १५/०७/२०२५ | दिनांक २२/०७/२०२५ सायं. ५.०० वाजेपर्यत |
| ४ | ई-लिलावा मध्ये पात्रता ठरविण्याचा कार्यालयीन कालावधी | दिनांक २३/०७/२०२५ सकाळी १०:०० पासून ते | दिनांक २४/०७/२०२५ सायं ५.०० पर्यत |
| ५ | ई-लिलावात पात्र झाल्यानंतर प्रत्यक्ष जाहीर ई-लिलावात बोली बोलण्याचा कालवधी | दिनांक २५/०७/२०२५ सकाळी ११:०० पासून ते | दिनांक २५/०७/२०२५ सायं ४:०० पर्यत |

ई-लिलावाबाबत सविस्तर माहिती करिता शासनाच्या www.eauction.gov.in या संकेतस्थळावर तसेच बाजार विभाग, नगर परिषद दिग्रस येथे उपलब्ध आहे.

स्वा/-
मुख्याधिकारी
नगर परिषद दिग्रस